मेहता मराठी

ग्रंथजगत

फेब्रुवारी २०१३

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०१३ ◆ वर्ष तेरावे ◆ अंक दुसरा

अनुक्रमणिका

संपादकीय	**४**
साहित्यवार्ता	**१२**
साहित्य चिंतन	**४४**
पुरस्कार	**५०**
पुस्तक परिचय	**६४**
व्यक्तिविशेष	**९८**
इंग्रजी पुस्तक परिचय	**१०१**
श्रद्धांजली	**१०८**
बालनगरी	**१११**

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत : १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - **२२७/२४३**

E-mail : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १५०रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.
३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट!

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

चिपळूणचे संमेलन

नेहमीप्रमाणेच संभाजी ब्रिगेड, लक्ष्मण माने, विद्रोही वगैरेंच्या उधळून टाकू, बहिष्कार टाकू वगैरेंचा गदारोळ होत, गाजत गर्जत चिपळूणचे साहित्य संमेलन अखेर 'निर्विघ्नपणे' पार पडले. आणि आयोजकांनी एका दिव्यातून पार पडल्याचा सुस्कारा सोडला. मराठी भाषेचा आणि साहित्याचा उत्सव वर्षातून एकदा तरी साजरा करायचा हा साहित्यसंमेलनाचा मूळ हेतू. पण तो आनंद उत्साहाने खेळीमेळीने, सर्वांना सामावून घेत, एकमेकांची वास्तपुस्त करीत, सुसंवाद साधत, एकमेकांतील दुरावे दूर करीत गोडीगुलाबीत साजरा करायचा हे काही कधी सुरळीत, सुविहितपणे आपल्याला जमत नाही, असे समजायचे का? वादविवाद, धमक्या, काळे फासू, आलात तर खबरदार, व्यासपीठावर अमक्यातमक्याचे काय काम, एवढा मोठा मंडप कशाला, सरकारचे अनुदान कशाला अशा मतमतांतरांनी प्रत्येक संमेलनाच्या आधीचे एकदोन महिने वृत्तपत्रे आणि वाहिन्या वाचक-रसिकांना झुलवत ठेवतात. करमणूक करतात. सस्पेन्स वाढवतात. टीआरपी वाढवतात. आपल्याकडे लोकशाही आहे, प्रत्येकाला आपले मत मांडण्याची मुभा आहे, यात शंकाच नाही. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने ही लोकशाहीची आपली प्रक्रिया आणि बांधिलकी दृढ होत असेल तर ती चांगलीच गोष्ट आहे. परंतु लोकशाहीत सहमती आणि सहकार्यही अभिप्रेत असते; एखादी गोष्ट बहुमताने मान्य केली की तिच्या परिपूर्तीसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे, उत्तम प्रकारे ती सिद्धीला नेणे हेही आपले उत्तरदायित्व ठरते.

चिपळूण हे तसे छोटे शहर. तेथे होणाऱ्या संमेलनाला येणाऱ्या रसिकांची गर्दी तशी सीमितच असणार. परंतु तरीही दोन कोटींचा मंडप उभारणे, खेडे उभे करणे वगैरे चैन करण्याची गरज नव्हती. महाराष्ट्र शासनाचे २५ लाखांचे अनुदान, परंतु कोकणातील १५ आमदार खासदारांनी आपल्या निधीतून प्रत्येकी ५ लाख संमेलनाला देऊन ७५ लाख रुपयाची भर घातली. इतरही प्रायोजक देणगीदार पुढे आले.

त्यामुळे एकूण ही चैन वा उधळपट्टी शक्य झाली, हे खरे असले तरी साहित्य संमेलनात नामवंत आणि मातब्बर साहित्यिकांची उपस्थिती तुरळकच होती. माजी अध्यक्षांपैकी फार थोडे हजर होते. त्यांना आवर्जून बोलावले गेले असते तर संमेलनाची शान वाढली असती. साहित्य अकादमीचे चार पुरस्कार नुकतेच जाहीर झालेले होते. त्या मानकऱ्यांचा विशेष कार्यक्रम एकूण नव्या पिढीला प्रेरणादायक ठरला असता. लोकप्रिय, गाजलेल्या लेखकांना भेटावे, बघावे, ऐकावे अशी ओढ वाचकांना असते. साहित्य संमेलन म्हणजे लेखक वाचक यांच्या भेटीचे, संवादाचे, सौहार्दाचे स्थान असे समजून आपल्या आवडत्या लेखकांशी अनौपचारिकपणे भेटण्याकरिता खास स्वतंत्र दालने असायला हवीत... सात परिसंवाद. त्यात तीस चाळीस वक्ते, दीडदोनशे कवी एवढी भाऊगर्दीतीही आपापल्या भागातल्या लोकांची वर्णी लावण्यासाठी, ती संमेलनाला 'युनिकनेस' देऊ शकत नाही. काही उत्तम अभ्यासू आणि नवीन विचार देणारे पट्टीचे वक्ते व लेखक हे परिसंवादात दहापंधरा मिनिटात आपला विषय खुलवू शकतातच असे नाही. तशा दोनतीन वक्त्यांना तास दीड तास तरी द्यायला हवा. निमंत्रित कवी मोजकेच असले तर कविसंमेलन रंगते. भाराभर कवींमुळे कुठल्याच कवीचा वा कवितेचा प्रभाव श्रोत्यांवर पडत नाही. नवोदित कवींचा कट्टा वेगळा असावा. गेल्या तीन चार वर्षांतील कथा, कादंबरी, वैचारिक वाङ्मय या क्षेत्रातील उत्तम योगदान करणाऱ्या लेखकांची आणि रसिकांची गाठ घालून देऊन, नव्या साहित्याकडे त्यांचे लक्ष वेधायला हवे. त्यांच्या पुस्तकांचे एका वेगळ्या दालनात प्रदर्शन मांडून त्यांचे वेगळेपण दाखवणारे कार्यक्रम करायला हवेत.

संमेलनाचे उद्घाटक मा. शरदराव पवार यांनी उद्घाटनाच्या भाषणात मराठीतील 'एका अवकाळी पावसाची गोष्ट'च्या आनंद विंगकर पर्यंतच्या नवीन कादंबरीकारांच्या कलाकृतींचा त्यांच्या वैशिष्ट्यांसह उल्लेख करून जाणकारांनाही चकित केले.

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी काही विशिष्ट वैचारिक सामाजिक, तात्त्विक भूमिका किंवा दृष्टिकोन असल्याशिवाय कुठल्याही लेखकाच्या साहित्याला गांभीर्य व कसदारपणा लाभणार नाही यावर भर दिला. अशी भूमिका नसेल तर काटलेल्या पतंगासारखा तो लेखक भरकटत जाईल; साहित्याच्या रणभूमीवर पराक्रम गाजवायचा असेल तर भूमिका घ्यावीच लागेल. ती नसल्यास त्याच्या साहित्याचा समाजधारणेसाठी आणि समाजसौख्यासाठी काहीच उपयोग असणार नाही असे ठासून त्यांनी सांगितले. विविध ज्ञानशाखा मराठीत फुलल्या पाहिजेत, लोकभाषा समृद्ध झाल्या पाहिजेत, प्रारंभिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा म्हणजे मराठीच असले पाहिजे, मराठीतील चांगल्या कलाकृतींचे इंग्रजी आणि अन्य भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले पाहिजेत असे आग्रहाने प्रतिपादन केले. शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजीला महत्त्व दिले जात आहे; त्यामुळे सामाजिक विषमता वाढून

भयावह परिस्थिती निर्माण होईल असा इशाराही त्यांनी दिला. समारोपाच्या भाषणातही या मुद्द्यांचा पुनरुच्चार करून साहित्यसंमेलन हे धर्मनिरपेक्ष हवे, संमेलनाच्या व्यासपीठावर कुठलीही धार्मिक प्रतीके नसावीत, एका लेखकाने दुसऱ्या लेखकाला धमक्या देऊ नयेत; ''मी झेड सुरक्षा घेतलेली नाही; घेणारही नाही; मी एकटा फिरतो. माझ्याभोवती कार्यकर्त्यांचा गराडा नसतो; मला काळे फासायची धमकी कशाला देता? माझ्या घरी हवे तर या आणि मला काळे फासा. माझी तयारी आहे.'' असेही ते बाणेदारपणे म्हणाले. प्रस्थापितांविरोधी भाषा करणारे सत्ताधाऱ्यांभोवती गोंडा घोळतानाच जास्त दिसतात असा टोलाही त्यांनी कोणाचे नाव न घेता लगावला. कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो या लहान वयात ऐकलेल्या लोकगीतामुळे कोकणबद्दलची आत्मीयता बालपणापासूनच निर्माण झाली असे त्यांनी पुन:पुन्हा सांगितले. मी पुढाऱ्यांमागे हिंडणारा लेखक नाही असेही सांगून टाळ्या घेतल्या. एकूण डॉ. कोत्तापल्ले यांनी अध्यक्षपदाचा गरिमा राखला.

संमेलनाच्या निमित्ताने भरणाऱ्या ग्रंथप्रदर्शनाबाबत दरवेळी बराच घोळ होतो. स्टॉल घेणाऱ्यांच्या सोयीसुविधांकडे आणि मांडणीकडे दर ठिकाणी कमालीची अनास्था आणि अव्यवस्था आढळते. चिपळूण संमेलन हेही या अनुभवाचीच पुन:प्रचीती देणारे ठरले. विशिष्ट मांडणीमुळे आत प्रवेश करताना जे स्टॉल जवळ होते, तेथेच रसिक थांबत होते. आतल्या वर्तुळात असणाऱ्या स्टॉलपर्यंत फारसे रसिक पोचतच नव्हते. स्टॉलना नंबर देण्यातही काही ताळतंत्र वा शिस्त नव्हती. त्यामुळे अनेक स्टॉलधारकांना मोठा फटका बसला. त्यांचा खर्च भागेल एवढीही विक्री झाली नाही. संमेलनाला गर्दी चांगली होती. वीसतीस हजार तरी विद्यार्थी, स्त्रीपुरुष हजेरी लावून गेले. परंतु स्टॉलकडे त्यातील फार थोडे लोक रेंगाळले. पुस्तके चाळणाऱ्यांपैकी फारच थोडे लोक पुस्तके विकत घेणारे होते. कोकणमध्ये पुस्तकविक्रेते फारच अल्प आहेत. या संमेलनाच्या निमित्ताने ग्रंथप्रदर्शनात एरव्ही सहजी बघायला न मिळणाऱ्या पुस्तकांचा खजिनाच खुला झाला होता. परंतु विकत घेणारे कमी होते. दिनांक ४ ते ८ जानेवारीला सातारा ग्रंथमहोत्सवात सहभागी झालेले बरेच स्टॉलधारक तेथून परस्पर चिपळूणला आले होते. सातारला जेवढी विक्री झाली तिच्या निम्मीही विक्री चिपळूणला एवढे मोठे संमेलन असूनही झाली नाही असे बहुतेक स्टॉलधारक म्हणाले. कोकण म्हणजे बुद्धिमान कर्तृत्ववान नररत्नांची खाण, असे असून पुस्तकखरेदीबाबत कोकण इतका पिछाडीवर का असा प्रश्न पडला. कोकणमधील साहित्यिकांची पुस्तकेही विक्रीत मागेच होती. संमेलनाचे यश मांडव किती लाखांचा यावर ठरतं नाही; लोकांना साहित्याबद्दल वाटणाऱ्या आस्थेवर आणि पुस्तकांच्या उलाढालीवर ठरते. पुस्तकांचे तेथील लोकांमध्ये असणारे जे स्थान, त्यावर ठरते.

चिपळूण संमेलनाच्या निमित्ताने एका बाबतीत मात्र चिपळूणकर सुखावले. चिपळूणमध्ये वर्षानुवर्षं दुर्लक्षित असलेले रस्ते चकचकीत झाले. स्वच्छता झाली.

पर्यटकांसाठी सोयीसुविधा हव्यात याची जाणीव शासकीय अधिकाऱ्यांना झाली. व्ही आय पींच्या स्वागताची, आतिथ्याची सद्य:कालीन व्यवस्थाप्रणाली अवगत झाली. रेस्टहाऊस, गेस्टहाऊस यांना रंगरूप लाभले. नवे फर्निचर आले. निधी भरपूर उपलब्ध झाल्यामुळे बरीच रेंगाळलेली कामे मार्गी लागली. मागे रत्नागिरीला साहित्य संमेलन झाले. मधू मंगेश कर्णिक अध्यक्ष होते. त्यावेळीही रत्नागिरीचा असाच कायापालट झाला होता. सांगलीला राष्ट्रपती प्रतिभाताई संमेलनाच्या उद्‌घाटनाला आल्या होत्या. त्यावेळी सांगलीनेही अशीच कात टाकली होती. साहित्य संमेलने आपल्या गावात व्हावीत असा आग्रह धरणाऱ्यांना साहित्याबद्दल भले कमी जास्त प्रेम असो, आपल्या गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी काही ठोस करायची उर्मी प्रबळ असेल तर साहित्यसंमेलनासाठी महामंडळाला साकडे घाला. आता पुढील तीन वर्षे महामंडळाचे कार्यालय पुण्याला आहे. पिंपरी चिंचवडने आधीच आपला क्लेम लावला आहे. तुम्हीही मागे राहू नका. डॉ. सतीश देसाई यांच्यासारखे अनुभवी संयोजक संघटक पुण्यात आहेत. बरेच काही 'चांगले' शिकता येईल.

चिपळूण संमेलनाचा एकूण थाटमाट मात्र स्पृहणीय होता. संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुनील तटकरे, संयोजक सल्लागार दै. सागरचे संस्थापक निशिकांत जोशी, कार्याध्यक्ष प्रकाश देशपांडे वगैरेंनी घेतलेली मेहनत आणि सोसलेला मनस्ताप यांची दखल घ्यायलाच हवी. संमेलनात एक ज्येष्ठ लेखक व एक ज्येष्ठ प्रकाशक यांचा सत्कार होतो. चिपळूणला प्रा. अनंत मनोहर आणि अप्पा परचुरे यांचा सत्कार झाला. चिपळूण परिसरातील पुरस्कारप्राप्त लेखक रामचंद्र नलावडे, (दगडफोड्या, झगडा, सुरुंग, चिरेखाण, गावकुसाबाहेरील माणसं, लादी, प्रहार, चंदनवाडी) यांचाही त्यात समावेश केला गेला हे चांगले झाले. जवळच्या माणसाचाच एरव्ही विसर पडतो.

एकूण कोमसापच्या परिक्षेत्रात महामंडळाने संमेलन घेण्याचा धाडसी निर्णय तडीला नेला; याबद्दल कोमसापच्याही सौजन्याला दाद द्यायला हवी. कारण आरंभीच्या काही बातम्या अ. भा. म. सा. संमेलन येथे होता कामा नये अशी भूमिका घेणाऱ्या होत्या. साहित्याने सर्व घटकांना सामावून घ्यायचे असते. हमीद दलवाईंच्या घरापासून दिंडी नको, परशुरामाची प्रतिमा नको, त्याचा परशू हे प्रतीक नको, असे वाद घालून साहित्यक्षेत्राला संकुचित करायचे नसते. करू नये. जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत ही भूमिका घेऊन विश्वसाहित्याची विशाल पालखी पुढे न्यायची असते.



आगामी

परमेश्वर

: एक सांकेतिक नाव

मूळ लेखक : **मणी भौमिक**

अनुवाद : **अशोक पाध्ये**

कुठे आहे तो परमेश्वर? तो मृत्यू पावला आहे का? धर्म आणि श्रद्धा या केवळ अफूसारख्या आहेत. चारशे वर्षांपूर्वी विज्ञानाची प्रगती होऊ लागली. तोपर्यंत दैवी शक्तीचा प्रभाव जगावर सर्वत्र होता. पण नंतर हळूहळू माणसाचा देवावरचा विश्वास ढळू लागला. देवाची जागा विज्ञानाने घेतली. परंतु खुद्द विज्ञान हा एक भ्रामक देव ठरला. परिणामी मानवजात निराश झाली.

मणी भौमिक या शास्त्रज्ञाने एक्सायमर लेसरचा शोध लावला. डोळ्याचा चश्मा घालवण्याची शस्त्रक्रिया शोधून काढली. अशा या शास्त्रज्ञाने परमेश्वराचे अस्तित्व विज्ञानाच्या आधारे शोधायचा प्रयत्न केला. त्याची ही एक थरारक कहाणी! भौमिक याने पराकोटीचे दारिद्र्य व पराकोटीची श्रीमंती उपभोगली. त्यातून त्याचे विचारमंथन सुरू झाले. विज्ञान व अध्यात्म यांच्यातील सुवर्णमध्य त्याने गाठला.

अत्यंत स्फूर्तिदायक अशा या आध्यात्मिक शोधयात्रेने अमेरिकन वाचकांना झपाटून टाकले.

आगामी

उगवतीच्या दिशेला

तीन जीवलग मैत्रिणींच्या
सुखाचा शोध

मूळ लेखिका : **ज्युलिया ग्रेगसन**

अनुवाद : **श्यामल कुलकर्णी**

१९२८..

तीन तरुणी भारतात यायला निघतात. प्रत्येकीचे येण्याचे कारण वेगवेगळे असते. नव्या आयुष्याबद्दलच्या अपेक्षा, इच्छा आणि आकांक्षा भिन्न असतात.

बॉम्बेला रोझचं लग्न एका इंग्रज अधिकाऱ्याशी होणार असतं, पण सोबत आई-वडील नसल्याने एका अनोळखी माणसाशी अनोळखी प्रदेशात लग्न करायचा ताण तिच्या मनावर येतो. इंग्लंडमध्ये लग्न जमत नाही म्हणून व्हिक्टोरियाची आई व्हिक्टोरियाला जोडीदार शोधण्यासाठी रोझसोबत भारतात पाठवते, तर लेखिका होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी विवा, आपल्या भूतकाळाची मुळे शोधायला भारतात येते.

बॉम्बेमधील उच्चभ्रू समाज, गरीब वस्त्या, भारतातले इंग्रज, त्यांची भारताबद्दलची मते, तत्कालीन भारतीय समाजाची इंग्रजांबद्दलची मते, भारतीय स्वातंत्र्यलढा अशा व्यापक पार्श्वभूमीवर विणलेला हा कादंबरीचा पट खिळवून ठेवतो.



आगामी

जे. आर. डी. टाटा यांची पत्रं

संपादन : **अरविंद मॅम्ब्रो**

अनुवाद : **सुप्रिया वकील**

सध्याच्या वेगवान जगात 'ई-मेल्स', 'सेलफोन्स' अशांसारख्या तत्पर संपर्कमाध्यमामुळे जग जवळ आले आहे; पण एकेकाळी मुख्यत्वे 'पत्र' या माध्यमातून संपर्क साधला जात असे. पत्रांतून कामांच्या तपशिलांखेरीज आपुलकी व जवळीकही साधली जात असे. शिवाय ही 'पत्रं' त्या एका विशिष्ट कालखंडाचा दस्तऐवज बनून इतिहास अभ्यासकांना व भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरत असत. 'पत्रं' हा कायमस्वरूपी माहितीस्रोत असतो. या पुस्तकातली सुमारे ३०० पत्रं इतिहासाचा अनमोल ठेवा आहेत. 'जे.आर.डी. टाटा' या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या चिकित्सक लेखणीतून उतरलेली विविध विषयांना स्पर्श करणारी ही 'पत्रं' तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांचं दर्शन घडवतात आणि विसाव्या शतकातील एका महान, बहुआयामी व्यक्तित्वाचं अनेकपदरी अंतरंग उलगडून दाखवतात.

आगामी

केन अँड एबल

मूळ लेखक : **जेफ्री आर्चर**

अनुवाद : **लीना सोहोनी**

भिन्न भूभागात परिस्थितीत जन्म घेतलेली दोन अपरिचित माणसं.... विल्यम लोवेल केन आणि एबल रोस्नोव्हस्की.

पहिला बॉस्टन शहरातल्या एका धनिकाचा मुलगा, तर दुसरा अमेरिकेत नशीब काढण्यासाठी दाखल झालेला निष्कांचन पोलिश निर्वासित. दोघांचा जन्म एकाच दिवशी, एकाच वेळी पृथ्वीच्या दोन विरुद्ध बाजूंना झालेला असतो.

दोघंही महत्त्वाकांक्षी, बलशाली, निर्दय आपापल्या स्वप्नपूर्तीसाठी लढा देत असतात. दोघांनाही स्वत:चं अनिर्बंध साम्राज्य उभं करायचं असतं. नियती या दोघांना एकत्र आणते आणि दोघं एका संघर्षाच्या आवर्तात सापडतात....

युद्ध, विवाह, संपत्ती, यश आणि दुर्दैव या सर्वांतून मार्ग काढत-काढत केन आणि एबल यांची ध्येयप्राप्तीसाठी झुंज चालू राहते; पण विजय मात्र एकालाच मिळणार असतो....

✤ बारामतीचे नाट्यसंमेलन

''नाटक म्हटले की, काही वर्षांपूर्वी पुणे, मुंबई, नाशिक, नागपूरचा विचार होत होता. आता नव्या पिढीतील कलाकार पुढे येत आहेत. अशा कलाकारांना प्रोत्साहन दिले जावे,'' अशी अपेक्षा व्यक्त करत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी राज्यात विनाअनुदानित तत्त्वावर चालत असलेल्या ललितकला केंद्रांना राज्य शासनाने घसघशीत मदत द्यावी, अशी सूचना केली. तसेच, संगीत रंगभूमीला गतवैभव प्राप्त करून देण्याबरोबरच ज्येष्ठ रंगकर्मींच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या ध्वनिचित्रफिती तयार करण्याची कल्पनाही त्यांनी पुढे केली.

बारामतीत आयोजित करण्यात आलेल्या ९३व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे उद्‌घाटन पवार यांच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण अध्यक्षस्थानी होते. संमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे, मावळते अध्यक्ष श्रीकांत मोघे, स्वागताध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री संजय देवतळे, खासदार सुप्रिया सुळे, नाट्य परिषदेचे अध्यक्ष हेमंत टकले, उपाध्यक्ष विनय आपटे, प्रमुख कार्यवाह स्मिता तळवलकर, जयंत जातेगावकर, खजिनदार वंदना गुप्ते, बारामती शाखेचे अध्यक्ष किरण गुजर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी लालन सारंग, प्रा. दत्ता भगत यांच्यासह १२ पूर्व संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ अभिनेत्री जयमाला शिलेदार, डॉ. जब्बार पटेल, कवी ना. धों. महानोर आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते, विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरे, मराठी नाट्य, चित्रपट सृष्टीतील आघाडीचे कलाकार, दिग्दर्शक, निर्माते आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले, ''नाट्य संमेलनात राजकारणी व्यक्तींची आवश्यकता काय, असा प्रश्न बऱ्याचवेळा उपस्थित केला जातो. पण या संमेलनात मी एक रसिक, एक प्रेक्षक म्हणून उपस्थित आहे.'' कविवर्य मोरोपंतांचे श्रेष्ठत्व सांगत

बारामतीचे नाट्य, सांस्कृतिक चळवळीशी असलेले नातेही त्यांनी उलगडून दाखविले. ते म्हणाले, ''महाराष्ट्राची सांस्कृतिक उंची वाढविण्यासाठी यशवंतराव चव्हाणांपासून अनेकांनी प्रयत्न केले. नाट्यचळवळ अधिक जोमाने सुरू राहण्यासाठी साहित्य, नाट्यक्षेत्रातील कलाकारांनी आपले अवकाश विशाल करण्याची आवश्यकता आहे.''

''अजूनही संगीत नाटकाबद्दल आस्था ठेवणारे रसिक आहेत. मध्यंतरीच्या काळात संगीत रंगभूमीकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल ज्येष्ठ कलावंत जयमालाबाई शिलेदार यांनी लिहिलेले वाचण्यात आले. संगीत रंगभूमीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे,'' अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.

दिल्लीतील 'एनएसडी'प्रमाणे राज्यातही एखादी संस्था असावी, अशी अपेक्षा व्यक्त करून ते म्हणाले, ''पुणे, औरंगाबाद विद्यापीठांमधून ललितकला केंद्रांची सुरुवात झाली आहे. पण ती विनाअनुदान तत्त्वावर आहे. कलाकारांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळण्यासाठी राज्य शासनाने घसघशीत मदत दिली पाहिजे.''

मुख्यमंत्री चव्हाण म्हणाले, ''मराठी माणसाचा सातत्याने आश्रय मिळाल्याने रंगभूमी स्थिरावली. एवढेच नव्हे, तर तिचा लौकिक जगभर पसरला. पण आजची पिढी संगणकासारख्या आभासी जगात हरवून गेली आहे. तरुण पिढी आणि नाट्यसृष्टी यात अंतर पडत आहे, नव्या पिढीला रंगभूमीकडे आकर्षित करण्यासाठी सादरीकरणात बदल केले जावेत.''

सांस्कृतिक मंत्री देवतळे यांनी राज्यशासन राबवित असलेल्या नाट्यविषयक योजनांची माहिती दिली. श्रीकांत मोघे यांनी वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला.

❖ नाट्यसंमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे यांच्या अपेक्षा

''नाटकात हौशी, व्यावसायिक असे प्रकार असले, तरी रंगभूमी एकच आहे. कलाकारांची वास्तवाशी नाळ असली पाहिजे,'' अशी अपेक्षा अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केली.

संमेलनाध्यक्ष आपले लिखित भाषण वाचून दाखवितात. या प्रथेला फाटा देत डॉ. आगाशे यांनी उत्स्फूर्तपणे अध्यक्षीय भाषण केले. निवडणुकीच्या माध्यमातून नाट्य संमेलनाध्यक्षांची निवड करण्याची प्रथा चुकीची असल्याचे सुरवातीलाच डॉ. आगाशे यांनी स्पष्ट केले.

शिक्षणामुळे समाजात विघटन होत असल्याचा मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणाले, ''शिक्षणाद्वारे डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट तयार होतात. तसेच संगीत, नाटक, चित्रकला, शिल्पकला या गोष्टी सर्वांच्या आयुष्यात महत्त्वाच्या आहेत. कलांचा उपयोग सर्वांना होतो. प्राथमिक शिक्षणादरम्यान 'एक्स्ट्रा करिक्युलर'चा उपयोग

बालपणीच होतो. मुलगा-मुलगी दहावीत आले, की त्यांचे पालक हे 'एक्स्ट्रा करिक्युलर' बंद करतात. पण मला आयुष्यात त्याचाच उपयोग झाला.'' सचिवालयात डॉक्टर म्हणून ओळख दिल्यानंतर लवकर प्रवेश मिळत नसे. पण 'घाशीराम...', 'जैत रे जैत' या मधून झळकल्यानंतर सगळीकडचा प्रवेश सुकर झाला.''

पाश्चात्य रंगभूमीवर तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. नाटक म्हणजे 'मेक बिलिफ' असते. तंत्रज्ञानाचे अवडंबर न माजवता आम्ही सादर केलेल्या 'घाशीराम'च्या प्रयोगाचे पाश्चात्य देशांतील समीक्षकांनी प्रचंड स्वागत केले. नाटक असेही असू शकते आणि 'घाशीराम'कडून हे शिकण्यासारखे आहे, असे पाश्चात्य समीक्षकांनी म्हटले, असे डॉ. आगाशे यांनी सांगितले.

आपल्याकडे डॉक्टर, आर्किटेक्ट, इंजिनिअर यांच्या संघटना आहेत. अगदी शेतकऱ्यांची देखील शेतकरी संघटना आहे. विघटन करणारे हे व्यवसाय एका बाजूला, तर समाजाला एकत्रित आणणाऱ्या संगीत, नाटक, चित्र आणि शिल्प या कला दुसऱ्या बाजूला! शालेय शिक्षणात ज्या गोष्टींचा चांगला उपयोग होऊ शकतो, त्यांचा समावेश एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीमध्ये केला जातो. केवळ अभ्यासच केला असता, तर मी आज येथे अध्यक्ष म्हणून भाषण करू शकलो नसतो, असेही डॉ. आगाशे यांनी सांगितले.

रंगभूमी एकच आहे. हौशी आणि व्यावसायिक, बालरंगभूमी, दलित रंगभूमी आणि कामगार रंगभूमी हे तिचे विभाग आहेत. आपल्याकडे प्रत्येकाला जगण्यासाठीचा एक आणि जगण्याला अर्थ देण्यासाठी एक असे दोन व्यवसाय असतात. पूर्वी मानसिक आरोग्योपचार हा माझा व्यवसाय होता आणि चित्रपट-नाटकातील अभिनय ही हौस होती. आता अभिनय हा माझा व्यवसाय झाला आहे. आयुष्यामध्ये एका टप्प्यावर प्रत्येक गोष्टीचा विचार पैशांपेक्षा वेळेच्या संदर्भात झाला पाहिजे. त्यामुळे पैशांपेक्षा आपण वेळेची गुंतवणूक कशी करतो याला महत्त्व आहे. लहान वयापासूनच्मुलांना उत्तम नाटके पाहण्याची सवय लागली पाहिजे, तरच प्रेक्षक म्हणून आपली आणि पर्यायाने रंगभूमीची कक्षा विस्तारेल.''

✤ नाटकातील स्त्रियांचे स्थान आत्मकथनांत हरवले!

९३ व्या अ. भा. मराठी नाट्यसंमेलनातील 'मराठी नाटकातील स्त्रियांचे स्थान' हा परिसंवाद म्हणजे सहभागी वक्त्यांच्या किस्सेवजा आत्मकथनाचा कार्यक्रम ठरला.

दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी मराठी रंगभूमीच्या पावणेदोनशे वर्षांच्या इतिहासात स्त्रियांनी रंगभूमीला दिलेल्या योगदानाचा धावता आढावा घेतला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती, पुरुषी मानसिकता, स्त्रीवरील कौटुंबिक जबाबदाऱ्या, नैतिकतेची

बंधने असे सगळे अडथळे पार करत स्त्रियांनी आजवर रंगभूमीवर वाटचाल केली आहे. स्त्रीजाणिवांच्या नाटकांची आपल्याकडे मोठी परंपरा आहे. नाटककार स्त्रिया कमी दिसत असल्या तरी आता ती परिस्थिती बदलते आहे. इरावती कर्णिक, मनस्विनी लता रवींद्र, मधुगंधा कुलकर्णी, विभावरी देशपांडे यांच्यासारख्या लेखिका आज सजगतेने नाटके लिहिताहेत. नाटकांतून भूमिका करण्याबरोबरच त्यांचे दिग्दर्शनही करीत आहेत. माधुरी पुरंदरे आणि मेघना पेठे या रंगकर्मींनी नाटके लिहिली असती तर ती खूपच वेगळी ठरली असती, असे ते म्हणाले.

''मराठी नाटकात स्त्री जाणिवांची नाटके अनेक संवेदनशील पुरुष लेखकांनी लिहिली आहेत. अगदी 'शारदा' नाटकापासून 'चारचौघी' पर्यंत त्याचा वानवळा देता येईल. स्त्रियांच्या समस्या स्त्रियाच अधिक अधिकारवाणीने मांडू शकत असल्या तरी आता लिंगभेदापलीकडे जाऊन विचार करायची वेळ आली आहे,'' असे सांगून चंद्रकांत कुलकर्णी म्हणाले, ''नुकत्याच दिल्लीत घडलेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणाने जयवंत दळवी यांनी 'पुरुष' नाटकात या अत्याचाराविरोधात वापरलेल्या हत्याराची आठवण सामाजिक उद्रेकाच्या रूपाने प्रत्ययाला येते आहे.''

खासदार सुप्रिया सुळे यांनी 'प्रतिभेला लिंगभावाची कसोटी लावू नये,' असे सांगत स्त्रियांच्या रंगभूमीवरील स्थानासंदर्भात अधिक सर्वसमावेशक दृष्टिकोन मांडला. नाटकात स्त्रियांना आपले स्थान निर्माण करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला, हे मान्य करतानाच राजकारणात मात्र स्त्रियांनी मिळालेल्या संधीचे सोने करत आपले स्थान निर्माण केले, असे अभिमानाने सांगितले. त्याचबरोबर आजच्या पिढीत सखोल अभ्यास, मेहनत घेण्याची वृत्ती, एकाग्रता आणि समर्पणभावाचा अभाव आहे, असेही स्पष्ट मत दिले.

वंदना गुप्ते यांनी स्त्री प्रधान भूमिका करायला मिळाल्यामुळे आपल्या आयुष्याला वेगळे पैलू पडले असे म्हटले.

संपूर्ण स्वतंत्र स्त्रीचा मनमुक्त आविष्कार व्हायला सामाजिक परिस्थिती अजून अनुकूल नसल्याचे स्मिता तळवलकर यांनी सांगितले. फैय्याज आणि आशालता वाबगावकर यांनी कलावंत म्हणून आपल्या घडणीवरच भर दिला. त्यांची रसाळ आत्मकथने आणि नव्या पिढीबद्दलच्या तक्रारी ऐकून श्रोतृवर्ग खूश झाला.

✤ 'नटराज नाट्य कला मंडळा'ची राज्यस्तरीय स्पर्धा

बारामती येथील 'नटराज' नाट्य कला मंडळाच्या २८ व्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेमध्ये पुण्याच्या 'रंग' या संस्थेच्या 'भवरा' या एकांकिकेस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. भरत नाट्य मंदिराच्या 'आडोसा'ला द्वितीय, तर 'स्नेह' या पुण्याच्या संस्थेच्या 'स्त्रीसूक्त काळ्या बाळीची कथा'ला एकांकिकेस

तृतीय स्थान प्राप्त झाले.

केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दर वर्षी १२ डिसेंबर रोजी या स्पर्धा होतात. या स्पर्धेचे यंदाचे २८ वे वर्ष होते.

'भवरा' या एकांकिकेतील भूमिकेबद्दल आशिष नसलापुरे यांना अभिनेता, काळी बाळी या एकांकिकेतील भूमिकेबद्दल अंकिता मडके यांना स्त्री भूमिकेचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. दिग्दर्शनाबद्दल अभिषेक दवे, नवीन लेखनाबद्दल चेतन डांगे, प्रकाशयोजनेबद्दल प्रदीप निकम, नेपथ्याबद्दल विश्वास पांगारकर, रंगभूषा व वेशभूषेबद्दल रश्मी देव, सर्वोत्कृष्ट संगीताबद्दल अभिषेक दवे यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

✤ अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन

ऑस्ट्रेलियात स्थायिक झालेल्या मराठी जनांना एकत्र करून उद्योग, व्यवसाय आणि रोजगार मार्गदर्शनासाठी २९ ते ३१ मार्च दरम्यान अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे अठराशे मराठी बांधव या संमेलनासाठी येतील असे सिडनीच्या मराठी असोसिएशनचे अध्यक्ष शरद पाठक यांनी सांगितले. प्रशांत दामले यांचे 'सासू माझी ढाँसू' हे नाटक, मुक्ता बर्वे हिची विशेष मुलाखत आणि स्वप्नील बांदोडकर यांच्या गायनाचा कार्यक्रम ही या संमेलनाची वैशिष्ट्ये असतील.

✤ अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलन

''शहरी आणि ग्रामीण संस्कृती ही विस्कटली असून, तिच्यात बदल घडविण्यासाठी संवादाची गरज आहे. ग्रामसंस्कृतीतील विस्कटलेला गोठा आणि शहरी संस्कृतीतील संवादशून्य झालेले घर बदलायचे असेल, तर बालसाहित्यिकांनाही आपल्या लेखण्या परजून घ्याव्या लागतील,'' असे प्रतिपादन चोविसाव्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मदन हजेरी यांनी ओणी (राजापूर) येथे केले.

साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. या वेळी व्यासपीठावर मावळते संमेलनाध्यक्ष गोविंद गोडबोले स्वागताध्यक्ष वासुदेव तुळसणकर, डॉ. न. म. जोशी, प्रा. विजय जामसंडेकर, महावीर जोंधळे, सौ. मानसी हजेरी, मोतिराम जानस्कर आदी उपस्थित होते.

हजेरी म्हणाले, ''विस्कटलेल्या शहरी आणि ग्रामीण संस्कृतीमध्ये मुलांची मुस्कटदाबी होत असून, बालविकास प्रकल्पांच्या माध्यमातून मुलांच्या आतले त्यांच्या ओठावर येते. उद्याचा सुजाण नागरिक आणि देश एक ठेवणारा माणूस घडवायचा असेल, तर उत्तम पुस्तके असणे गरजेचे आहे. त्यासाठी लेखक

आणि चित्रकार यांनी संयुक्त प्रयत्न करावेत. पिझ्झा, बर्गर, वडा-पाव यावर पालकांकडून जसे पैसे खर्च केले जातात; तसे त्यांनी पुस्तक विकत घेण्यावरही खर्च करायला हवेत. पालकांचा दृष्टिकोन बदलायला हवा. चांगल्या अनुवादित पुस्तकांची मराठी साहित्याला गरज आहे. साहित्यिकांनीही अक्षरवाङ्मय कोणत्याही काळामध्ये सत्ता गाजवत राहते, हे लक्षात घेऊन उत्तम कलाकृती निर्माण कराव्यात.''

❖ अनंत अंतरकर जन्मशताब्दी समारोप कार्यक्रम

हंस, मोहिनी, नवल या मासिकांचे संस्थापक-संपादक अनंत अंतरकर यांच्या जन्मशताब्दीच्या समारोपानिमित्त रत्नागिरी, देवरुख आणि चिपळूण येथे त्यांच्या कन्या डॉ. अनुराधा औरंगाबादकर यांचे कार्यक्रम घेण्यात आले.

५ वी आवृत्ती

जंगलांतील दिवस

व्यंकटेश माडगूळकर

किंमत : १७०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

आपल्या जीवनाला फुरसदीचा एक लांबलचक, भरजरी पदर असावा, असं मनापासून वाटत असलं, तरी चरितार्थ चालविण्यासाठी कामधंदा करण्यातच आपण फार खर्ची पडतो. आपलं सगळं जीवन एका विलक्षण यांत्रिक गतीनं झपाटून टाकलं आहे. कधी अंगावर चांदणं पडत नाही, कधी झाडाच्या पानांची सळसळ ऐकू येत नाही, कधी ओढ्यात अंघोळ होत नाही, कधी उताणं झोपून चांदण्यांनी गच्च भरलेलं आभाळ पाहता येत नाही. मी कुणी मृग-पक्षी-शास्त्रवेत्ता नव्हे किंवा वनशास्त्राचा अभ्यासकही नव्हे. परंतु तरीही रानावनांतील अद्‌भुत जगाविषयी माझ्या छंदिष्ट मनात जे अनिवार आणि न संपणारं कुतूहल आहे, त्याचा हा वृत्तान्त आहे.

रत्नागिरीच्या कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालयात 'अनंताची फुले' या चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन पूजा पटवर्धन या ११ वर्षे वयाच्या मुलीच्या हस्ते झाले. येथील फाटक हायस्कूल मध्ये पाचवीत (१९२२-२३) असताना अंतरकरांनी काढलेल्या हस्तलिखिताचे कौतुक करताना त्यावेळचे शालाप्रमुख फाटकसर यांनी म्हटले होते की हा मुलगा पुढे मोठा संपादक होईल. ग्रंथालयाच्या अध्यक्ष गीताताई परांजपे आणि कार्यवाह श्रीकृष्ण साबणे यांनीही अनुराधा औरंगाबादकर यांचा सत्कार केला.

कसबा-संगमेश्वर येथे जिल्हा ग्रंथालय संघाचे ३७वे अधिवेशन अनुराधाबाईंच्या अध्यक्षतेखाली झाले. संपादक अंतरकरांची वाङ्मयीन कामगिरी त्यांनी उलगडून दाखवली. देवरुख येथील टिळक वाचनालयात लेखक-संपादक-नट अंतरकर या विषयावर बोलताना अनुराधाबाईंनी देवरुखच्या शाळेतील अनंतरावांच्या बालपणाच्या आठवणी सांगितल्या. अंतरकर १९३०साली चिपळूणला युनायटेड शाळेत होते. त्या महाविद्यालयातही अंतरकरांच्या संपादन कौशल्यावर त्यांचे भाषण झाले. ८६व्या अ.भा.साहित्य संमेलनाच्या प्रसंगी एका प्रवेशद्वाराला अनंत अंतरकरांचे नाव देण्यात आले होते.

❖ साहित्यप्रेमी भगिनी मंडळ मेळावा

''कथालेखकाच्या मनाचे स्पंदन म्हणजे लेखकाला आलेल्या बऱ्यावाईट भावनांचा तो उच्चार असतो.'' असे प्रतिपादन गिरिजा कीर यांनी केले.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळ आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक मेळाव्यात 'वेगळ्या वाटेने झालेला माझा लेखनप्रवास.' या विषयावर परिसंवाद झाला. या वेळी कल्याणी दिवेकर, सुमन बेहेरे, मंदा खांडगे, मंजिरी ताम्हणकर उपस्थित होत्या.

कीर म्हणाल्या, ''समाजातील परित्यक्ता महिला, यंत्रयुगात बदललेला पुरुष यांचे चित्रण मी सुरुवातीला माझ्या लेखनातून केले. मात्र, हे लेखन फारशी भ्रमंती न करता केलेले होते. नंतर मी स्वत: माझे कार्यालय सोडून बाहेर पडले आणि 'राखेतील पाखरं' हे पुस्तक लिहू शकले. रिमांड होममधील मुली आपण समजतो तशा मद्दड नसून त्या खूप हुशार असतात. त्यावर हे पुस्तक आहे. नंतर भ्रमंतीच्या कक्षा रुंदावल्या. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन केंद्र असलेल्या 'तपोवन'च्या भेटीच्या वेळी शिवाजीराव पटवर्धन यांनी 'लेखकाने बंद दरवाजे ठोठवावे' हा असा सल्ला दिला. त्यातून 'गाभाऱ्यातील माणसं' हे पुस्तक साकारले. भ्रमंती आणि थोरामोठ्यांच्या सहवासातून आलेल्या अनुभवांच्या आधारे 'मी' च्या पलीकडे पाहण्याची नजर मला मिळाली. या सर्व अनुभवांच्या आधारेच माझे लेखन बहरत गेले, एक नवीन जग समाजापुढे मांडू शकले.''

✤ शरद पवार यांच्यावरील दोन पुस्तकांचे प्रकाशन

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविषयी देशभरातील उद्योगपतींनी इंग्रजीतून लिहिलेल्या 'इंडस्ट्रियस' व मराठीतील 'उद्यमशील' या पुस्तकांचे प्रकाशन अभय फिरोदिया यांच्या हस्ते एका अनौपचारिक समारंभात करण्यात आले. यावेळी शरद पवार, विठ्ठलशेठ मिणियार, उद्योजक अजय शिर्के, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या पुस्तकात हीरो मोटोकार्पोरेशनचे ब्रिजमोहन लाल मुंजाल, राहुल बजाज, वेणुगोपाल धूत, भवरलाल जैन, अजित गुलाबचंद, बाबासाहेब कल्याणी, तुलसी तंती, विजय मल्ल्या, लीला पूनावाला, अरुण फिरोदिया, डी. एस. कुलकर्णी वगैरे



२री आवृत्ती

शिवसूत्र
भाग- १

ओशो

अनुवाद : **डॉ. वृषाली पटवर्धन**

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

बीजासारखे रुजा आणि वृक्षासारखे व्हा.
थेंबासारखे, लाटेसारखे मिसळून जा आणि सागरासारखे व्हा.
बुडून जा! विरून जा! मिसळून जा!
आत्म-सरोवरात, सर्वस्वानं एकरूप होऊन जा;
म्हणजे तुम्ही महासागर व्हाल! विशाल व्हाल!
मग तुम्हाला कुठलीच सीमा नाही, कुठलंच दु:ख नाही, वेदना नाही.
मग तुम्ही दीनवाणे नाही, दरिद्री नाही.
मग तुम्ही असाल समृद्ध-संपन्न, सम्राट.
परमेश्वराची सगळी रूपं तुमची आहेत.
मग तुम्ही 'तुम्ही' नाही; तुम्ही परमेश्वर आहात!

उद्योगपतींनी पवार यांच्याविषयी भाष्य केले आहे.

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया, विश्वस्त प्रदीप कंद व श्रीकांत पाटील या वेळी उपस्थित होते.

✤ 'शब्दब्रह्म' वर संतवाङ्मयाची 'कॅलिग्राफी'

पारंपरिक कॉर्पोरेट डायऱ्यांप्रमाणेच संतवाङ्मयावर आधारित डायऱ्यांचा नवा 'ट्रेंड' रुजवण्याचा प्रयत्न गुरुकुल प्रतिष्ठानातर्फे गेल्या आठ वर्षांपासून चालू आहे. यंदाच्या गुरुकुल दैनंदिनीत संत कबीर यांची वचने प्रत्येक पानावर उद्धृत करण्यात आली आहेत. यापूर्वी प्रतिष्ठानने भगवद्गीता, नामदेवगाथा, एकनाथगाथा, तुकारामगाथा यासारखे विषय हाताळले आहेत.

कबीरांच्या वचनांप्रमाणेच 'ओम नमोजी आद्या', 'माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके', 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती,' 'लहानपण देगा देवा...', 'अक्षर सुंदर, वाचणे सुंदर', 'उत्तम संगतीचे फळ सुख'... यासारख्या संतवाङ्मयावर आधारित 'शब्दब्रह्म' ही 'कॅलिग्राफी' डायरी देखील प्रथमच बाजारात आली आहे.

ज्ञानेश्वर, तुकाराम आणि रामदासस्वामी यांच्या रचनांना प्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांनी कॅलिग्राफीद्वारे सजविले आहे.

✤ विश्वसंत नामदेव महाराज कथा ब्रेलमध्ये उपलब्ध

शिंपी इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन व श्री संत शिरोमणी नामदेव समाजोन्नती चॅरिटेबल ट्रस्टतर्फे 'विश्वसंत नामदेव महाराज कथा' हे पुस्तक ब्रेल लिपीत उपलब्ध झाले आहे. पद्मावती येथील विणकर सभागृहात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

✤ शब्दकोशाचे प्रकाशन

''मराठी समानार्थी व विरुद्धार्थी हा शब्दकोश मराठीला कचरणाऱ्या विद्यार्थी, शिक्षकांबरोबरच अभ्यासकांनाही उपयोगी ठरणारा आहे,'' असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांनी व्यक्त केले. अभिजात प्रकाशनाच्या वतीने आयोजित समारंभात विश्वास वसेकर यांच्या 'मराठी समानार्थी व विरुद्धार्थी' शब्दकोशाचे प्रकाशन डॉ. वैद्य आणि प्राचार्य रामदास डांगे यांच्या हस्ते झाले. या वेळी श्रीराम पचिंद्रे, भास्कर हांडे, डॉ. प्रतिमा इंगोले, माधव राजगुरू, घनश्याम पाटील, स्वप्नील पोरे, शैलेंद्र बोरकर, विजय लेले उपस्थित होते.

✤ बंधुता संमेलन

पिंपरी-चिंचवड येथे जानेवारीत झालेल्या चौदाव्या 'राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कामगार नेते ॲड. गोविंद पानसरे आणि स्वागताध्यक्षपदी शिक्षणतज्ज्ञ हरिश्चंद्र गडसिंग हे होते. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि बंधुता प्रतिष्ठान यांच्यातर्फे हे संमेलन आयोजिण्यात आले होते. पानसरे यांच्या २१ साहित्यकृती असून, त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. गडसिंग हे रिंटेज इंटरनॅशनल स्कूल आणि सह्याद्री शिक्षण संस्थेचे संस्थापक आहेत.

✤ खरेदीवर इंटरनेटचा प्रभाव

तंत्रज्ञानाशी निगडीत वस्तूंच्या खरेदीवर इंटरनेटचा प्रभाव वाढतो आहे. नेल्सन आणि गुगल इंडियाने याबाबत एक ऑनलाइन पाहणी केली. त्यात भारतीयांच्या खरेदीच्या पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल होत असल्याचे दिसून आले.

याचा सर्वाधिक प्रभाव टायर १ आणि टायर २ शहरांमधल्या ग्राहकांवर दिसतो. एखादी वस्तू खरेदी करण्यासाठी दुकानात जाण्यापूर्वी नेमक्या कोणत्या ब्रँडची वस्तू घ्यायची हे त्यातल्या ८३ टक्के ग्राहकांना माहित असल्याचे दिसून आले. कंपन्यांनी मार्केटिंगची पद्धत बदलण्यास सुरुवात केली असून, टीव्हीपाठोपाठ इंटरनेटचा वापर वाढविला आहे. टेक्नोलॉजी इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीबाबत ग्राहकांची मानसिकता जाणून घेण्यासाठी भारतातल्या १२ शहरांमध्ये पाहणी करण्यात आली. ४६ टक्के लोक माहिती मिळविण्यासाठी मोबाइल इंटरनेटचा वापर करतात. ५७ टक्के ग्राहक इंटरनेटवर माहिती घेतल्यानंतर ब्रँड किंवा मॉडेलबद्दलचा निर्णय घेतात.

✤ सुरक्षित ई-मेल

सध्या पत्र, चिठ्ठी ऐवजी अगदी छोट्यामोठ्या गोष्टीही ई-मेलद्वारे पाठविल्या जातात. सरकारी, खासगी, कॉर्पोरेट क्षेत्रांतील महत्त्वाचे व्यवहार, करार-मदार ई-मेलद्वारेच होतात. तुम्ही 'ई-मेल पाठविल्यानंतर तुमच्या इंटरनेट पुरवठादाराच्या माध्यमातून विविध सर्व्हरच्या मार्गे ती मेल समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचते. तुमचा नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर, इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर, पोलीस किंवा इतर सरकारी संस्था तुमच्या नकळत हे संदेश वाचू शकतात. ई-मेल्स सुरक्षित करण्यासाठी काही पर्याय वापरणे योग्य ठरेल.

सर्वप्रथम तुमच्या ई-मेल पुरवठादाराची वेबसाइट एचटीटीपीएसद्वारे (उदा. http:// mail.google.com veJns http:// mail.google.com) द्वारे ॲक्सेस

करा. त्यामुळे तुमचा कम्प्युटर आणि मेल सर्व्हर दरम्यान होणारे सर्व कम्युनिकेशन एनक्रिप्टेड स्वरूपात होईल. त्यामुळे समोरच्या व्यक्तीने त्याला मध्येच हाताळण्याचा प्रयत्न केला तर ते अनाकलनीय भाषेत त्याच्यापर्यंत पोहोचेल.

सार्वजनिक ठिकाणी वाय-फायद्वारे इंटरनेट ॲक्सेस करताना व्हीपीएन सर्व्हिसचा वापर करणे चांगले. ही सर्व्हिस तुमचा कम्प्युटर आणि इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर



४थी आवृत्ती

द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ

मूळ लेखक : **चेतन भगत**

अनुवाद : **सुप्रिया वकील**

किंमत : २६०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

'फाईव्ह पॉइंट समवन' आणि 'वन नाईट ॲट द कॉल सेंटर' यानंतर चेतन भगत यांची ही तिसरी कादंबरी. चेतन भगत यांच्या चित्रदर्शी शैलीतली ही कादंबरी वाचकांना त्या विश्वात नेऊन खिळवून ठेवते. लेखकाच्या खुसखुशीत भाषेमुळं ही कादंबरी अधिक वाचनीय बनली आहे.

तीन मित्र...

स्वत:च्या इच्छा-आकांक्षा, स्वप्नं असणारे; वास्तव जीवनाच्या धगीचा सामना करत त्याला तोंड देणारे..

सत्य घटनांच्या संदर्भाशी सुरेख मिलाफ साधणारी ही कादंबरी. सध्याची पिढी, त्यांच्यापुढचे प्रश्न, सद्य परिस्थिती यांचा वेध घेतानाच; बिझनेस, क्रिकेट व धर्म याही विषयांची सुरेख गुंफण करून वाचकांना एक विलक्षण अनुभूती देते.

यांच्या दरम्यानची सर्व वाहतूक एन्क्रिप्टेड स्वरूपात करील. त्यामुळे वाय-फायच्या माध्यमातून तुमचा डेटा चोरीला जाण्याची शक्यता कमी होईल. टनेलबीअर (Tunnelbear) हे कम्प्युटर आणि मॅकसाठी उपलब्ध असलेले मोफत व्हीपीएन सॉफ्टवेअर आहे. त्याला कुठल्याही प्रकारचे सेटिंग करावे लागत नाही, केवळ ऑन केले की त्याचे काम सुरू होते.

ई-मेल पाठवताना स्वत:च एन्क्रिप्ट करून पाठवा. यामध्ये तुम्ही नेहमीप्रमाणे ई-मेल लिहिल्यानंतर एन्क्रिप्शन प्रोग्रॅम तिचे सुरक्षित स्वरूपात रूपांतरित करेल. तुम्ही ही मेल पाठविल्यानंतर त्यासाठी पासवर्ड वापरल्याशिवाय रिसिव्हरला ओपन करता येणार नाही.

ई-मेल एन्क्रिप्ट करण्यासाठी अनेक प्रोग्रॅम उपलब्ध आहेत. पण त्यातल्या त्यात पीजीपी (pretty good privacy) अर्थात अधिक लोकप्रिय आहे. यामध्ये तुमचा ई-मेल ॲड्रेस आणि स्वतंत्र पासवर्ड टाइप केल्यावर पीजीजी त्यापासून एक युनिक पब्लिक की आणि एक प्रायव्हेट की तयार करेल. ही पब्लिक की ज्यांना तुम्ही मेल पाठवू इच्छिता त्यांना द्या- तिचा वापर करून ते ई-मेल ओपन करू शकतील. ते देखील स्वत:चा ई-मेल ॲड्रेस आणि स्वतंत्र पासवर्ड टाइप करून आपली पब्लिक आणि प्रायव्हेट की तयार करू शकतात.

✤ गुगल की दुनिया

नेट वापरणाऱ्यांच्या ब्राउझिंगध्ये गुगल या कंपनीने वेगळेच स्थान मिळविले असून, गुगलिंग केलं की सगळं मिळतं, शोधा म्हणजे सापडेल याच्याशी जोडले जाऊ लागले आहे. एखाद्या ठिकाणी जाण्याचा मार्ग, रेस्तराँ, ऐतिहासिक ठिकाणे वैद्यकीय माहिती, फोटो संदर्भ आदींसाठी गुगल सर्च इंजिनचा वापर केला जातो. नेटसॅव्हींच्या जीवनात महत्त्वाचा भाग बनलेल्या 'गुगल'ला नुकतीच १४ वर्षे पूर्ण झाली, लॅरी पेज आणि सेर्गे बिन यांनी तिची स्थापना केली. अपेक्षेहून अधिक प्रतिसाद मिळाल्याने गुगल कंपनी ही बाल्यावस्थेत असताना तिला सन मायक्रोसिस्टीम्सचे सहसंस्थापक अँडी बेथोलशेईम यांनी मदत केली. त्यानंतर पेज आणि ब्रिन यांनी गुगल आयएनसी ही कंपनी स्थापन केली.

१९९८ मध्ये या कंपनीने स्टॅनफोर्ड विद्यापीठातून पदवीप्राप्त पहिला कर्मचारी भरती केला. कंपनीने गुगल हा लोगो रिडिझाइन करून त्याला डुडल असे संबोधले. २००२ मध्ये कंपनीने हार्डवेअरमध्ये प्रवेश केला. याच काळात कंपनीने गुगल सर्च ॲप्लिकेशन (ॲप) लाँच केले. यामुळे इंटरनेटवरील डेटा शोधणे सोपे झाले. २००४ मध्ये गुगल डेस्कटॉप सर्च लाँच करण्यात आले. यामुळे यूजरला डॉक्युमेंट्स, ईमेल्स, म्युझिक, फोटो, फाइल्स आदी सर्च करणे शक्य झाले.

✤ सम्यक् साहित्य संमेलन

आत्मकेंद्रित होत चाललेल्या तरुण पिढीला समाजाभिमुख करायचे असेल तिच्या भाषेत संवाद साधण्याची आवश्यकता आहे. आपल्या खाद्यांवरील संचित तिच्या खांद्यावर अलगद द्यायला हवे, असे मत प्रसिद्ध लेखक संजय पवार यांनी व्यक्त केले.

डॉ. आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि पुणे विद्यापीठातील आंबेडकर अध्यासन यांच्यातर्फे तिसरे सम्यक साहित्य संमेलन घेण्यात आले. या कार्यक्रमाला लेखिका डॉ. माया पंडित, नामदेव ढसाळ, कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. विजय खरे, परशुराम वाडेकर आदी उपस्थित होते.

खेड्यांमधील दलितांचे जीवन काडीमात्र बदललेले नाही. खैरलांजीसारख्या घटना घडत आहेत. त्यामुळे जातीचे प्रश्न संपलेले नाहीत, उलट त्यामधील काही प्रश्न जटील झाले आहेत. आज आंतरराष्ट्रीय सत्ता अर्थव्यवस्थेवर केंद्रित झालेली दिसते. वर्ग तत्त्वज्ञानावर आधारित कम्युनिझमचा पाडाव होऊन आजच्या परिस्थितीत बुद्धिप्रामाण्याऐवजी धार्मिक होण्याकडे कल वाढत असून बुवा, बापू, साध्वींचे प्रस्थ वाढत आहे असे त्यांनी नमूद केले.

आघाडी सरकारामुळे भांडवली लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर होऊ शकले नाही, अशी टीका करून ज्येष्ठ साहित्यिक नामदेव ढसाळ म्हणाले, 'सम्यक साहित्य संमेलन हा क्रांतीचा एल्गार झाला पाहिजे. आंबेडकरी चळवळीत आज सर्मपणाची भूमिका राहिलेली नाही.'

साहित्य म्हणजे लेखक आणि कवीने आजूबाजूच्या विश्वाशी केलेला संवाद असतो, असे प्रा. कसबे म्हणाले. साहित्य ही सांस्कृतिक कृती असते. संस्कृती म्हणजे जगण्याची रीत असल्याचे मत डॉ. माया पंडित यांनी मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र आयोजित तिसऱ्या सम्यक साहित्य संमेलनातील 'भारतीय संविधानातील मूल्ये आणि मराठी साहित्य' या विषयावरील परिसंवादात डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. हरी नरके, डॉ. शरणकुमार लिंबाळे, डॉ. इंदिरा आठवले, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. प्रभाकर देसाई सहभागी झाले होते. डॉ. सुरेंद्र जोंधळे अध्यक्षस्थानी होते.

''मराठी साहित्य हे उदात्तीकरण व मनोरंजनाच्या अंगाने जाते. परिवर्तनाबाबत मात्र साहित्यिक मौन बाळगतात. समाजवाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये महत्त्वाची आहेत. त्यावर आधारित वैचारिक बांधिलकी व राजकीय भूमिका मराठी साहित्यात उमटली का याबाबत आणि सत्ताधारी जातीच्या शासनपुरस्कृत सजातीय दहशतवादाचाही विचार करणे आवश्यक आहे,'' असे डॉ. नरके यांनी सांगितले.

चौसाळकर म्हणाले, ''सामाजिक व राजकीय चळवळीच्या विचारमंथनाची

फलश्रुती असलेल्या संविधानाची संकल्पना आपल्या विचारवंतांनी एकोणिसाव्या शतकातच मांडली. त्यामुळे देशाच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या घटनेचा मराठी साहित्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे स्त्री-स्वातंत्र्य, शेतकऱ्यांचे प्रश्न काही प्रमाणात साहित्यात उमटले. ते अधिक व्यापक होण्याची गरज आहे.''



२री आवृत्ती

नेक्स्ट

मूळ लेखक : **मायकेल क्रायटन**

अनुवाद : **डॉ.प्रमोद जोगळेकर**

किंमत : ४००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

कर्करोगाच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांच्या पेशी मिळवून त्या विद्यापीठाला विकणारा डॉक्टर. या पेशींच्या मालकीसाठी काहीही करायला तयार असणारे उद्योगपती आणि मतलबी प्राध्यापक. चिम्पँझी मादीच्या जनुकसंचात स्वत:चेच जनुक मिसळून बेकायदेशीररीत्या 'ह्यूमंझी' बनवणारा बेजबाबदार जीवशास्त्रज्ञ. धर्म आणि विज्ञान यांची चलाखीनं सरमिसळ करणारा, आपल्या विद्यार्थ्यांचं संशोधन चोरणारा आणि राजकारणात राजकारण्यांनाही मागे टाकणारा शास्त्रज्ञ रॉबर्ट बेलार्मिनो. स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी कोणत्याही थराला जाणारे प्रसिद्धी माध्यमांचे लोक. या सगळ्या पार्श्वभूमीवर मनोरंजन करणारा आणि गणित सोडवणारा बुद्धिमान पोपट....

या सगळ्यातून तयार होते प्रश्नांची मोठी मालिका. उत्तरं नसलेले, अस्वस्थ करणारे प्रश्न.... मन मानेल ते करायला सज्ज असणारं आजचं जीवशास्त्र पाहता पुढे काय होणार?

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी भाषेवर प्रचंड प्रेम होते. म्हणूनच परदेशात शिकूनही त्यांनी मराठीत वृत्तपत्रे सुरू केली. त्यांनी मराठीत केलेल्या लेखनाचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. 'मराठीचा मला अभिमान असला, तरीही भारतीय नागरिक म्हणून मी हिंदीचा स्वीकार करेन, असे डॉ. आंबेडकर म्हणत. त्याचा विचार सध्या मराठीच्या मुद्द्यावर राजकारण करणाऱ्यांनी करावा.''' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी व्यक्त केले.

सम्यक साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी डॉ. विमल थोरात, मिलिंद दीक्षित, राजन खान, डॉ. विद्युत भागवत, प्रा. प्रवीण चव्हाण, डॉ. देवेंद्र इंगळे, उत्तम कांबळे, डॉ. मनोहर जाधव आदी उपस्थित होते.

''लेखकांनी समाजाचे नेतृत्व न करता प्रतिनिधित्व केले. त्यामुळे साहित्यातही जातीव्यवस्थेचेच दर्शन घडले,'' असे खान यांनी सांगितले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न किताब द्यावा तसेच शाहू-फुले-आंबेडकर यांच्यावरील धड्यांचा पाठ्यपुस्तकात समावेश असावा, असे ठराव यावेळी मंजूर करण्यात आले.

✤ बारावे साहित्यिक कलावंत संमेलन

''मराठी भाषेचा अभिमान बाळगणे चांगले आहे; पण याचा अर्थ इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द तयार करून ते वापरा असा नव्हे. ही स्वत:च स्वत:ची केलेली फसवणूक आहे,'' असे मत संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी बाराव्या साहित्यिक कलावंत संमेलनाचे अध्यक्ष म्हणून व्यक्त केले. महापौर वैशाली बनकर, खासदार ॲड. वंदना चव्हाण, स्थायी समितीचे अध्यक्ष बाबूराव चांदेरे, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष प्रदीप धुमाळ, साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे या वेळी उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''एखादी भाषा बोलणाऱ्यांचा पराक्रम त्या भाषेला समृद्धी मिळवून देतो. आज मराठीची स्थिती चांगली नाही असे म्हटले तर त्याचा अर्थ आपण पराक्रमात कमी पडत आहोत असा होतो. जोपर्यंत एखाद्या शब्दाचा माणसाच्या जगण्याशी थेट संबंध नसतो तोपर्यंत तो शब्द प्रचलित होत नाही. साहित्य हे आपल्या दैनंदिन जगण्यात घुसले पाहिजे. स्वत:च्या विकासासाठी कष्टांना पर्याय नाही. विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व बहरायला हवे.''

संत साहित्याचा चालू काळाशी कसा संबंध आहे याबाबत बोलताना मोरे यांनी सांगितले की, ''बाहेरची नीती अर्थात 'राजनीती' चांगली हवीच; पण आतली नीती अर्थात स्वत:वरचे नियंत्रणही जपले पाहिजे. हा विचार संतसाहित्यात आहे. संत

साहित्याने या दोन नीतींमध्ये कधी भेद केला नाही. म्हणून हे साहित्य आजही तितकेच महत्त्वाचे आहे.''

माजी आमदार कुमार गोसावी यांच्या हस्ते ग्रंथ महोत्सवाचे तर, चित्रकार रवी मंडलिक यांच्या हस्ते चित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दि. २३ ते २५ डिसेंबर दरम्यान हे संमेलन झाले.

✤ गुगल प्ले स्टोअर

ॲपलच्या युझर्सना केवळ ॲपल स्टोअरमधूनच ॲप डाउनलोड करण्याची मुभा आहे. पण अँड्रॉइडचे तसे नाही. ओपन सोर्स असल्याने गुगल प्ले स्टोअरसोबतच इतरही अनेक ठिकाणाहून ॲप्स डाउनलोड करता येतात. या ठिकाणाहून ॲप्स डाउनलोड करण्यात तसा फार धोका नाही. गुगलने त्यांच्या ऑपरेटिंग सिस्टीमच्या यूजर्सना सुविधा देण्याची परवानगी त्यांना दिली यातच खूप काही आले.

गेट जार – अब्जावधी डाउनलोइसमुळे गेट जार अनेक प्रस्थापित ॲप्स स्टोअरसाठी आव्हान म्हणून समोर आले आहे. या ठिकाणी फोनच्या प्रकारानुसार ॲप्स फिल्टर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. जगभरात सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे अनेक डेव्हलपर याला प्राधान्य देतात. आजकाल काही डेव्हलपर्सना आर्थिक साह्य देण्यासही गेट जारने सुरुवात केली असून त्यांची ॲप्स मात्र ग्राहकांना मोफत वितरित केली जातात. या ठिकाणी ब्लॅकबेरी आणि विंडोज मोबाइलसाठीही ॲप्स उपलब्ध आहेत.

ॲप ब्रेन – ॲप ब्रेन हे अँड्रॉइड मार्केट ब्राउझरला पर्याय म्हणून उपलब्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी ॲप्सची थेट विक्री होत नाही. मात्र, सर्च आणि विविध आकर्षक पर्यायांमुळे अनेकजण याकडे आकर्षित होतात. या ठिकाणी मोफत, पेड, नव्याने दाखल झालेले, अपडेट केलेले अशा प्रकारचे फिल्टरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. मात्र यातील काही ॲप्स व्हर्जननुसार असल्यामुळे ते अमेरिकेबाहेर डाउनलोड करता येत नाहीत.

स्लाइड मी – सॅम (SAM) या ॲप्लिकेशनद्वारे अँड्रॉइड यूजर्स 'स्लाइड मी' वरील ॲप्स ब्राउज आणि डाउनलोड करू शकतात. या ठिकाणी छोट्या आणि उदयोन्मुख डेव्हलपर्सवर विशेष लक्ष दिले जात असल्याने नवीन काहीतरी येथे पाहायला मिळू शकते. या ठिकाणी पेड आणि फ्री अशी दोन्ही प्रकारची ॲप्स उपलब्ध आहेत.

ॲप्सफायर – ॲप्सफायर स्वत: कुठल्याही प्रकारचे ॲप्स देत नाही. केवळ अधिकृत ॲप्स स्टोअरचे सहयोगी म्हणून हे कार्य करते. तुमच्या नेहमीच्या वापराच्या ॲप्लिकेशनवरून हे तुमच्यासाठी काही ॲप्स सुचवतेही. ही सुचविलेली

ॲप्स सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून तुम्ही इतरांसोबत शेअर करू शकता. या ठिकाणी निवडक तज्ज्ञांनी ॲप्सला दिलेल्या रेटिंगच्या आधारे त्यांची लोकप्रियता ठरवली जाते. तसेच, मार्केटमध्ये उपलब्ध असलेल्या ऑफर ॲप्सवर देण्यात येतात.

अप्रूव्ह – अप्रूव्ह हे नव्यानेच सादर करण्यात आलेले ॲप्स स्टोअर असून त्याचे प्रमुख लक्ष्य अँड्रॉइड ॲप्स आहे. या ठिकाणी विविध कॅटेगरीमधून ॲप्स पाहता येतात. यूजर्सच्या सूचना, रिव्ह्यू, व्हिडिओ अपलोड यांसारख्या गोष्टी या ठिकाणी करता येतात. तुलनेने हे नवीन मार्केट असल्याने याला यूजर्सचा कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

✤ आधुनिक मानवाचे अस्तित्व ४४ हजार वर्षांपासून

ब्रिटन, दक्षिण आफ्रिका, फ्रान्स, इटली, नॉर्वे आणि अमेरिकेच्या पुराणवस्तूसंशोधकांच्या तुकडीने दक्षिण आफ्रिकेच्या सीमेनजीकच्या प्राचीन गुहांमध्ये उत्खनन केले. त्यात त्यांना मिळालेल्या पुराव्यांवरून दागिने आणि हत्यारे यांचा वापर ४४ हजार वर्षांपासून होत असल्याचे समोर आले आहे.

या उत्खननात लाकडी पहार, विष देणारे उपकरण, ऑस्ट्रिच पक्ष्याच्या अंड्याच्या कवचापासून तसेच शंखशिंपल्यापासून तयार करण्यात आलेले दागिने सापडले, ते ४० हजार वर्षांपूर्वीचे असावेत. 'या भागात आढळलेल्या वस्तूजन्य पुराव्यांवरून प्राण्यांची शिकार करून जगणारी सॅन ही जमात संस्कृतिपूजक, तंत्रज्ञानाचा वापर करणारी आणि मूलनिवासी असल्याचे दिसून आले आहे,' असे स्पष्टीकरण संशोधिका डॉ. ल्युसिंडा बॅकवेल यांनी दिले.

ही गुहा दक्षिण आफ्रिकेतील लेबोम्बो पर्वताच्या पायथ्याशी असून, ही जमात ऑस्ट्रिच पक्ष्याच्या अंड्याचे कवच आणि शंखशिंपल्यांपासून तयार केलेले दागिने परिधान करणारी होती. तिने विशिष्ट संकेतलिपीही विकसित केली होती. 'व्ही' आकारातील प्राण्यांच्या हाडांचा उपयोग लिखाणासाठी करीत होती. अणकुचीदार हाडांनी कुदळ आणि बाण बनवून प्राण्यांची शिकार करीत होती. या कालखंडातील अनेक जमातींना मधमाशांच्या पोळ्यांविषयी माहिती होती. पोळ्यातून माशांना दूर सारून मध आणि मेण गोळा करण्याची कलाही त्यांनी अवगत होती, हे सिद्ध करणारे पुरावे हाती मिळतात.

✤ इंटरनेट कॉलही 'ट्रॅक' होणार

आतापर्यंत व्हाइस कॉल, एसएमएस, इमेलद्वारे पाठविलेले संदेश ट्रॅक करण्याचे तंत्रज्ञान जगातील विविध सरकारी सूत्रांकडे उपलब्ध होते. त्यामुळे दहशतवादी,

राजकारणी आणि महत्त्वाच्या व्यक्तींवर नजर ठेवणे शक्य होते. पण इंटरनेटवरून ट्रॅक करण्याची सिस्टिम सरकारकडे नव्हती. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसांना चकवा देणे समाजविघातक शक्तींना शक्य होते. पण आता हे कॉलही ट्रॅक करण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे स्काइपसारख्या सेवांचा वापर करून करण्यात येणाऱ्या कॉलवर सरकारला कुणाच्याही नकळत लक्ष ठेवता येणार आहे.

लवकरच येऊ घातलेल्या ४ जी तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणावर डाटा ट्रान्सफर करणे सहज शक्य होणार आहे. २०१५ पर्यंत ४१ कोटी नागरिकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंटरनेटवरून कॉल करण्याचे प्रमाण आपसूकच वाढणार आहे. प्रामुख्याने अमेरिका, ब्रिटन यासारख्या देशांमध्ये या तंत्रज्ञानाला बरीच मागणी आहे. त्यामुळे संशयित व्यक्तींच्या कॉलवर कायदेशीर मार्गाने नजर ठेवता येईल.

❖ जपानी भाषा शिका, नोकरी मिळवा

भारतात येणाऱ्या जपानी कंपन्यांची संख्या गेल्या पाच वर्षांत तिपटीने वाढल्याने जपानी शिकणाऱ्यांना नोकरीच्या संधी वाढणार आहेत. तथापि जपानी भाषा शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण मात्र रोडावते आहे अशी माहिती 'इंडो जॅपनीज असोसिएशन'चे अध्यक्ष रमेश दिवेकर यांनी दिली. जानेवारी २००६ मध्ये भारतातील जपानी कंपन्यांची संख्या २६७ होती. इ.स. २०११ या एका वर्षात एकट्या महाराष्ट्रातच ४० जपानी कंपन्या आल्या. भारतातील जपानी दूतावासाच्या माहितीनुसार मुंबईत १६२, तर पुण्यात ५६ जपानी कंपन्या कार्यरत आहेत. दिल्लीत १४९ तर मणेसर (गुरगाव) आणि राजस्थानात २६५ जपानी कंपन्या आहेत.

आफ्रिकन, आणि युरोपियन देशांपर्यंत पोहोचण्यासाठी 'औद्योगिक हब' म्हणून जपान भारताकडे पाहतो. प्रस्तावित 'दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॅरिडॉर' झाला तर यातील अकराशे किलोमीटर लांबीच्या रेल्वे ट्रॅकच्या बाजूने ३०० ते ३५० जपानी कंपन्या भारतात येतील.

जीव ओतून भाषा आत्मसात केली तर उत्तम मोबदला मिळवून देणाऱ्या नोकरीच्या भरपूर संधी आहेत. असे जपानचे कौन्सल जनरल कियोशी असाको म्हणाले.

❖ 'प्रसारमाध्यमांवर नियंत्रण हवे'

'पेड न्यूज' आणि वृत्तवाहिन्यांवर दाखविण्यात येणाऱ्या बातम्यांचा आशय याबाबत गंभीर चिंता व्यक्त करीत, सर्वपक्षीय खासदारांनी प्रसारमाध्यमांवर नियंत्रण ठेवण्याची सूचना केली. मात्र माहिती व प्रसारण मंत्री मनीष तिवारी म्हणाले,

''माध्यमांनी स्वनियंत्रण करणे हाच उत्तम पर्याय आहे.''

'स्टिंग ऑपरेशन'मध्ये एका वृत्तवाहिनीचे दोन संपादक एका उद्योग समूहाकडे शंभर कोटी रुपये मागत असल्याचे प्रकरण उघड झाले होते. या प्रकरणावर लोकसभेत सदस्यांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदविली. या वेळी 'जेडीयू'चे शरद यादव म्हणाले, ''प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता टिकवण्यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाला आणखी अधिकार द्यायला हवेत.''

आगामी

लॉस्ट होरायझन

मूळ लेखक : **जेम्स हिल्टन**

अनुवाद : **स्नेहल जोशी**

जिथं काळ निश्चल राहतो!

हिमालयीन पर्वतांच्या उंच भिंती असलेल्या एका दूरवरच्या तिबेटियन दरीत स्वप्नातीत असा शांग्रिलाचा मठ आहे. भारतातून अपहरण करून आणलेलं विमान कोसळल्यावर, ह्यूज कॉन्वेला त्या शांग्रिलाच्या मठात आणलं जातं. तिथे त्याला काहीतरी गूढपणा जाणवतो.

हे उड्डाण कोणी नियोजित केलं होतं? असं कोणतं रहस्य होतं जे त्या आदरणीय लामाने दडवून ठेवलं होतं? पियानोसारखं वाद्य वाजवणारी ती सुंदर चिनी मुलगी ह्या अशा विचित्र जागी कशी आली?

हळूहळू कॉन्वेला ते असंभवनीय सत्य कळतं...

✤ पावगी यांच्या १३ पुस्तकांचे पुनर्प्रकाशन

ज्ञानदान हे जगातील सर्वांत मोठे कार्य आहे. ग्रंथ प्रकाशनातूनही ज्ञानदानाचे कार्य होते, असे मत पं. वसंत गाडगीळ यांनी पुणे मराठी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष नारायणराव भगवानराव पावगी यांच्या पुस्तकांच्या पुनर्प्रकाशन कार्यक्रमात व्यक्त केले. 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यात 'भारतीय साम्राज्य' या पुस्तकाचे ११ भाग आणि 'वेदकालीन भूस्तरशास्त्र' या पुस्तकांचा समावेश आहे. प्रकाशक संजीव पावगी यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. कराड म्हणाले, ''भारतात मोठ्या प्रमाणावर असलेले ज्ञान हेच आपल्या देशाचे सामर्थ्य आहे. आपली परंपरा, संस्कृती अशा अनेक चांगल्या गोष्टी असतानाही आपण पाश्चिमात्यांचे अकारण अनुकरण करत आहोत.'' विद्युत पावगी यांनी सूत्रसंचालन केले.

✤ 'कर्दळीवन : एक अनुभूती' पुस्तकाचे प्रकाशन

'कर्दळीवन : एक अनुभूती' हे प्रा. क्षितिज पाटुकले यांनी लिहिलेले पुस्तक २७ ऑक्टोबर २०१२ रोजी त्र्यंबकेश्वर येथे प्रकाशित झाले. कर्दळीवनावरील हे पहिलेच पुस्तक आहे. गुरुचरित्रात असा भाग आहे, की श्री नृसिंह सरस्वती हे तेराव्या शतकात श्री शैल्यजवळील कर्दळीवनात पाताळगंगेच्या पात्रात बुट्टीत बसून गेले आणि तेथे एका अश्वत्थ वृक्षाखाली बसून त्यांनी तप:साधना केली. ते बसलेल्या ठिकाणीच त्यांच्या भोवती वारुळ तयार झाले. अशीच साडेतीनशे वर्षे गेली. एक लाकूडतोड्या झाडाचे लाकूड तोडण्यासाठी आला तेव्हा श्री नृसिंह सरस्वतींची समाधी भंग पावली आणि त्या वारुळातून अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ प्रकट झाले. कर्दळीवन यात्रेसंबंधी अनेक समज आणि श्रद्धा आहेत. इतर तीर्थक्षेत्री इच्छा झाली की लगेचच जाता येते. तसे कर्दळीवनाचे नाही. भारतात दरवर्षी एक लाखातून एक व्यक्ती काशी-रामेश्वरला जाते. दहा लाखांतून एक बद्री-केदारला जाते, पंचवीस लाखांतून एक नर्मदा परिक्रमा करते, ५० लाखांतून एक कैलास-मानसरोवर यात्रेला जाते. मात्र कर्दळीवनात एक कोटीतून एखाद्या भाग्यवान व्यक्तीला जाता येते. कर्दळीवनात प्रत्यक्ष जाऊन आणि तेथे मूळ स्थानी निवास करून, तसेच दत्त संप्रदायातील अनेक ग्रंथांचा अभ्यास करून लिहिलेले हे पुस्तक वाचल्यावर कर्दळीवनात जाऊन आल्याची अनुभूती येते. पहिल्या तीस दिवसांतच त्याच्या बारा हजार प्रती संपल्या.

संपर्क – 'कर्दळीवन सेवा संघ', ६२२ पुलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे - ०४ (फोन : 25530371, 09657709678)

ई-मेल : swami@kardaliwan.com

❖ सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव

''दिल्लीमध्ये मुलींवर अत्याचार झाल्याने देशभर वातावरण दूषित झाले आहे. अत्याचार करणारे बहुतांशी श्रीमंत वर्गातील असतात. त्यांच्याकडे संपत्तीची समृद्धी असते; पण संस्कृती नसते. संस्कृती नसल्यामुळेच वाईट विचारांचा उगम होतो. संस्कृती बाणवण्यासाठी ग्रंथ वाचले पाहिजेत. ग्रंथांमुळे सांपत्तिक नव्हे; पण बौद्धिक, मानसिक व आत्मिक समृद्धी येते,'' असे प्रतिपादन डॉ. सदानंद मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात केले.

सातारा जिल्हा १४ व्या ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन दि. ४ जानेवारी रोजी ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, वि. ना. लांडगे, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शिरीष चिटणीस, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मकरंद गोंधळी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तानाजी नरळे उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''ग्रंथांचे महत्त्व वाढवण्यासाठी लेखक व प्रकाशकांनी ग्रंथांचे वाढदिवसही साजरे करावेत आणि प्रत्येक वाढदिवशी त्यावर सवलत द्यावी. सध्या वाचनाची आवड कमी झाली आहे; परंतु ज्ञानाने समृद्ध होण्यासाठी सर्वांना वाचनाची भूक लागली पाहिजे. लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली, त्याप्रमाणे आता वाचकांनीही आत्मचरित्रे लिहिली पाहिजेत. त्यामुळे काय वाचावे, कसे वाचावे, हे वाचकांना समजेल. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी वाचनातून समृद्धी निर्माण केली. त्यामुळेच ते राजकारणी असूनही साहित्यिक म्हणूनच जास्त ओळखले जातात.''

उद्घाटक बाबा भांड म्हणाले, ''साहित्याची पालखी खांद्यावर घेतलेल्यांसाठी हा ग्रंथ महोत्सव आहे. वाचनाचे संस्कार झाले, तर आपली स्वप्ने सत्यात उतरणार आहेत. त्यासाठी केवळ स्वप्न पाहण्यापेक्षा पुस्तकांच्या मदतीने स्वप्नं पाहावीत. मुले ही राष्ट्राची संपत्ती असून, लहान मुलांवर वाचनाचे संस्कार होण्यासाठी पालकांनी घरात दर्जेदार पुस्तकांचे भांडार उपलब्ध करून द्यावे.''

❖ पाच लाखांवर पुस्तकांची पर्वणी, वाचकांनी फुलले मैदान

सातारा ग्रंथमहोत्सव यंदाही वाचकांसाठी पर्वणी ठरला. उद्घाटनादिवशीच अग्रगण्य पुस्तक विक्रेत्यांनी महोत्सवात ज्ञानभांडार रचले, तर त्या ज्ञानाचा आस्वाद घेण्यासाठी सातारकरांनीही गर्दी केली. कथाकादंबऱ्यांपासून आत्मचरित्रापर्यंत, बालकथांपासून हॅरी पॉटरपर्यंत हजारो पुस्तके असल्याने वाचक, जिज्ञासूंनी हे मैदान फुलून गेले होते.

ग्रंथमहोत्सवाची ख्याती आता सर्वदूर पसरू लागली आहे. त्यामुळे राज्यभरातील प्रकाशक व पुस्तक विक्रेत्यांनी या महोत्सवात हजेरी लावली. मेहता पब्लिशिंग हाऊस, संस्कृती, ज्ञानसागर, साकेत प्रकाशन, साहित्य अकादमी, नवनीत, सुबोध

३ री आवृत्ती

परशुधारी परशुराम

सुधाकर शुक्ल

किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

महान तपस्वी भृगुऋषींच्या कुलात जन्म घेतलेल्या भार्गवरामाचे चरित्र, गूढ आणि अतर्क्य असेच आहे. ब्रह्मज्ञानाने परिपूर्ण असलेला भार्गवराम हा खरा क्षत्रिय होता. पृथ्वीवरच्या अन्यायी आणि अधर्मी राजांचा पराभव परशुरामाने स्वत:च्या सामर्थ्यावर केला. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली असे म्हणणे चुकीचे आहे. त्या काळात राजा दशरथ, राजा जनक यांसारखे अनेक राजे अस्तित्वात होते. पित्याच्या वधाने संतापलेल्या परशुरामाने सहस्त्रार्जुनाचा वध केला. जिंकलेला प्रदेश गुरू कश्यपांच्या हाती देताना परशुराम निर्विकार होता. गुरू कश्यपांच्या आज्ञेनं, स्वत:च्या सामर्थ्याच्या बळावर परशुरामाने अपरांत भूमी निर्माण केली. निर्माण केलेली कोकणभूमी सुजलाम् सुफलाम् केली. विविध ठिकाणी देवदेवतांची स्थापना करून धर्मप्रसार आणि धर्मरक्षणाचे महान कार्य केले. लोककल्याण हेच परशुरामाच्या जीवनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. आज असंख्य
भक्तांच्या अंत:करणात परशुरामाबद्दल आदराचे आणि भक्तीचे जे स्थान निर्माण झालं ते अपूर्वच म्हणावे लागेल.

ग्रंथ भांडार, ज्ञानगंगा, विद्या विकास-नागपूर, साईश्याम भांडार, मॅजेस्टिक बुक सर्व्हिस, शुभम साहित्य, दुर्वा एजन्सी, चेतक बुक्स, विजय वितरण, अनंत बुक शॉप, ग्रंथाली विक्री स्टॉल, लोकमान्य ग्रंथ भांडार, तेजज्ञान फाउंडेशन आदी पुस्तक विक्रेत्यांच्या स्टॉलवर तुंबळ गर्दी होती.

राजा शिवछत्रपती, युगंधर, पानिपत, मी विजेता होणारच, साताऱ्याचे कोहिनूर, तुका झालासे कळस, पार्टनर, छावा, मृत्युंजय, श्रीमानयोगी, अग्निपंख, श्यामची आई, फटकारे (बाळासाहेब ठाकरे), हू किल्ड करकरे आदी पुस्तकांना विशेष मागणी होती. पु. ल. देशपांडे, रणजित देसाई, विश्वास पाटील, प्र. के. अत्रे, वि. दा. सावरकर, गो. नी. दांडेकर, प्रकाश आमटे, व पु. काळे, अच्युत गोडबोले, गदिमा, भालचंद्र नेमाडे, प्रकाश संत, उत्तम कांबळे, शंकर पाटील, जयंत नारळीकर आदी मातब्बर लेखकांची पुस्तके वाचकांच्या मनाला भुरळ घालत बोक्या सातबंडे, हॅरी पॉटर, संस्कार पंचतंत्र, कार्टून पुस्तके, निसर्ग चित्रांची पुस्तके मुलांसाठी कौतुकाची बाब ठरली.

ज्ञानसंपदेची दारे खुले करत असल्याने सातारा शहर, उपनगर, तसेच जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील वाचकांनी महोत्सवात हजेरी लावली होती. पुस्तकांची भरलेली जत्रा हवीहवीशी वाटत असल्याने येणारा प्रत्येक वाचक कोणते ना कोणते तरी पुस्तक खरेदी करत होता. त्यामुळे पुस्तक विक्रेत्यांना दिलासा मिळाला.

❖ दिवाळी अंकांमुळे वाचक संख्या वाढतेय

ज्ञानाची कक्षा रुंदावत असल्याने संपादकांनीही आपल्या प्रगल्भतेचा परीघ वाढवला पाहिजे. संपादकाकडे स्वत:ची प्रतिभा असावी. राज्यात सुमारे ४५० दिवाळी अंक निघत असले, तरी त्यातील थोडेच अंक दर्जेदार असतात. परंतु प्रत्येक दिवाळी अंक वाचकांची संख्या वाढवतोय, हे महत्त्वाचे आहे, असा सूर ग्रंथ महोत्सवातील 'दिवाळी अंकाचे संपादन करताना' या परिसंवादात उमटला. पद्मगंधा प्रकाशनाचे अरुण जाखडे, 'माहेर'च्या संपादिका सुजाता देशमुख, 'साधना'चे कार्यकारी संपादक विनोद शिरसाठ, संस्कृती प्रकाशनाच्या सुनीता पवार यांनी परिसंवादात भाग घेतला. अरुण जाखडे म्हणाले, ''दिवाळी अंक चांगला असणे आणि स्टॉलवर त्याची विक्री होणे, या दोन बाबी आहेत. त्यामुळे अंक चांगले असले तरी ते बंद पडत आहेत. सध्या खूप दिवाळी अंक येत असले, तरी त्यामुळे वाङ्मयाची वाढ होत नसून ती सूज आहे.''

सुजाता देशमुख म्हणाल्या, ''दिवाळी अंकातील भांडार आता इंटरनेट, ब्लॉगवर मिळू लागल्याने दिवाळी अंकांची मक्तेदारी कमी होत आहे. ही मक्तेदारी टिकवण्यासाठी संपादकांनी दर्जेदार संपादन केले पाहिजे.'' सौ. सुनीता पवार यांनी

वाचन चळवळ वाढवण्यासाठी दिवाळी अंकांच्या संपादकांनी दर्जेदार व सर्वव्यापक अंक काढावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. शिरीष चिटणीस यांनी सूत्रसंचालन केले.

✤ योद्धा स्वामी

बालपण ते शिकागोची विश्व धर्म परिषद येथपर्यंतचा स्वामी विवेकानंद यांचा जीवनपट उलगडणारा 'योद्धा स्वामी' हा एकपात्री प्रयोग सादर करून दामोदर रामदासी यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार यशवंतराव चव्हाण साहित्य नगरीत जागवले.

स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर एकपात्री प्रयोग करताना दामोदर रामदासी यांनी विवेकानंदांनी शिकागोच्या धर्म परिषदेत केलेले भाषणही सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. ''मस्तकात असामान्य बुद्धी, कपाळावर चारित्र्याचा टिळा, डोळ्यात क्रांतीची ज्योत, उभा राहिला तर बजरंगी दिसला पाहिजे, असा युवक पाहिजे. गीता सांगते की, शत्रू संपवा आणि जगाचा उपभोग घ्या.

याउलट एका गालात मारली तर दुसरा गाल पुढे करा आणि जगाचा लवकर निरोप घ्या, हे यशू ख्रिस्तांनी सांगितले; पण सध्या उलटे सुरू असून पश्चिमेकडील लोकांनी आपली तर आपण त्यांची शिकवण आत्मसात केली आहे. आपले खाणे-पिणे, वागणे, मर्दासारखे असले पाहिजे.'' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

✤ इंग्रजी शाळांमुळे मराठीची गळचेपी

'ग्रंथमहोत्सवात इंग्रजी शाळांमुळे मराठीची गळचेपी होते का?' या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादामध्ये मराठीची गळचेपी होत असल्याचा सूर सर्व वक्त्यांनी काढला.

शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे मराठी भाषेची ऐशी की तैशी अवस्था झाली असून विद्यार्थ्यांची गळचेपी होत असल्याची टीका डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी केली. ते पुढे म्हणाले, ''मराठी भाषा ही मातृभाषा आहे. त्यामुळे ती प्रत्येकाला चांगल्या पद्धतीने बोलता, लिहिता आली पाहिजे. मात्र, स्पर्धेच्या युगात आपली मुले टिकावी यासाठी इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याकडे पालकांचा कल वाढत आहे. देशात इंग्रजी वाचणाऱ्यांची संख्या केवळ २ टक्केच आहे. त्यामुळे मराठी व इंग्रजी माध्यमापेक्षा तुम्ही काय शिकता हे महत्त्वाचे आहे. शिक्षणाच्या ओढाताणीत कुठलीच भाषा व्यवस्थित येत नाही. त्यामुळे पुढे जायचे असेल तर मातृभाषेकडे दुर्लक्ष करू नका.''

डॉ. न. म. जोशी म्हणाले, ''या गळचेपीला मराठी माध्यमांच्या शाळांची ध्येयधोरणे राबवणारे जबाबदार आहेत. मातृभाषा चांगली येत असेल तर इतर

भाषाही चांगल्या शिकता येतात. मराठी भाषा उत्तम शिकली पाहिजे. आज अनेक शिक्षक संकल्पना न शिकवता संज्ञा शिकवत आहेत. त्यामुळे मराठी व इंग्रजीचीही गळचेपी होते. पालकांनी विद्यार्थ्यांवर इंग्रजी शिकण्याची जबरदस्ती करू नये.''

✤ 'जरा काळजी घे' ते 'नेपोलियन'

सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सवातील निमंत्रितांच्या कवी संमेलनाला शहरातील नवोदित कवी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्वाती सामक यांनी 'जरा काळजी घे', ज्योत्स्ना चादगुडे यांनी 'नेपोलियन' व अलका मुळीक यांनी 'सुख' या कविता प्रारंभी सादर केल्या. ज. तु. गारडे यांनी देशातील सामाजिक परिस्थितीचे विदारक चित्र 'गांधी बाबा' या कवितेतून प्रकट केले. यशवंत गायकवाड, बानुबी बागवान, शिल्पा चिटणीस, संदीप लोहार, गणेश बोडस, अनुष्का खरे, संजय नाईक, संकल्प कांबळे, आकाश पाटोळे, प्रकाश कदम, डॉ. उमेश करंबेळकर, करिष्मा जकाते, सुभाष सरदेशमुख, विशाल पाळखोर, सुवर्ण मस्कर, प्रगती पार्टे, दिव्या जगदाळे या कवींनी सहभाग घेतला. धनंजय खाडे यांनी 'माणसांपेक्षा झाडे बरी असतात' कविता सादर केली.

✤ आमदार विष्णू वाघ यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचा समारोप

१४ व्या ग्रंथमहोत्सवाच्या समारोपप्रसंगी या प्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अरुणादेवी पिसाळ, उपाध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर, जिल्हाधिकारी डॉ. रामास्वामी एन. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित बांगर, अध्यक्ष शंकर सारडा वगैरे उपस्थित होते.

गोवा अकादमीतर्फे ग्रंथमहोत्सव गोव्यात राबवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार विष्णू वाघ यांनी सांगितले.

'शहराची लगबग, गर्दीची गजबज, साहेबाची कटकट, घरच्यांची वटवट दोन दिवस विसरून जा; सातारच्या मैतरा आणि मैतरिणींनो, जरा गोव्याला येऊन जा,' अशा शब्दांत त्यांनी गोव्याला येण्याचे निमंत्रणही दिले.

कवी विष्णू वाघ म्हणाले, ''गोव्यातून आलो असलो, तरी मराठीशी नाळ जोडलेली आहे. मराठी भाषेने पाजलेल्या अमृतामध्ये आज मला कवी, नाटककार म्हणून ओळखले जात आहे. गोवा आणि महाराष्ट्रात आज भौगोलिक वेगळेपण असले, तरी दोन्ही राज्यांत एकच संस्कृती नांदते. बालवयातील वाचनाचे ठसे आयुष्यभर राहतात, हे वडिलांनी शिकवले. बालपणीच्या वाचनामुळेच लेखन, वक्तृत्व, आचारावर चांगले परिणाम झाले आहेत. वाचत राहा, सतत शोधा आणि कठीण अर्थ विचारा.''

राजकारण, पैसा, सत्तेच्या बळावर मी आमदार झालो नसून मराठी भाषा आणि संस्कृती यांच्या अभिमानामुळे गोवा विधानसभेचा आमदार झालो आहे, असेही त्यांनी सांगितले.

सौ. पिसाळ म्हणाल्या, 'ग्रंथ हे मानवाचे गुरु आहेत. ग्रंथ व साहित्यातून बुद्धी प्रगल्भ होते. शाळा व पालकांनी ग्रंथमहोत्सवात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी लहान वयापासून वाचनाची आवड लावण्यासाठी प्रयत्न करावेत.'' संजयराजे नाईक-निंबाळकर म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण हे प्रतिभावान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या

२ री आवृत्ती

द असोशिएट

मूळ लेखक : **जॉन ग्रिशॅम**

अनुवाद : **अशोक पाथरकर**

किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

पेनिसिल्वेनिया भागातल्या यॉर्क या छोट्या गावातल्या वकिलांचा मुलगा काईल मॅकअवॉय. येल कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण घेणारा. 'येल लॉ जर्नल'चा मुख्यसंपादक म्हणून शेवटच्या वर्षी मान पटकावणारा. कॉलेजच्या चार वर्षांमधले त्याचे आणि त्याच्या मित्रांचे एक गुपित अशा लोकांच्या हाती लागते आणि ते काईलला जाळ्यात अडकवतात. काईलला परतीचा मार्गच ठेवलेला नसतो. वरवर चांगला वाटणारा, लॉच्या अनेक विद्यार्थ्यांना हवाहवासा वाटणारा; पण काईलला नको असणारा जॉब त्याला घ्यावाच लागतो. एका मोठ्या फर्मचा असोसिएट बनण्याचे आमिष त्याला दाखविले जाते.

आपल्या अस्तित्वासाठी काईलला परिस्थितीशी जबरदस्त झगडावे लागते. मोठ्या निग्रहाने त्याला येणाऱ्या प्रसंगाशी सामना करावा लागतो. त्यात तो यशस्वी होईल?

जन्मशताब्दी वर्षात येथे ग्रंथमहोत्सव भरतोय, याचा अभिमान आहे. पुस्तकांच्या विक्रीवरून पुस्तकांवर प्रेम करणारी व वाचणारी मंडळी असल्याचा आनंद वाटतो.''

डॉ. रामास्वामी एन. म्हणाले, ''भविष्यातील साताऱ्याच्या इतिहासात या ग्रंथमहोत्सवाचा उल्लेख असेल. लहान मुलांत वाचन संस्कृती रुजली पाहिजे, हा समितीचा उद्देश सफल होत आहे. पाच लाख रुपयांच्या खर्चात किती मोठा सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम होतो, याचे हे उदाहरण आहे. असे ग्रंथमहोत्सव सर्वत्र व्हावेत.''

गेल्या वर्षीच्या ग्रंथमहोत्सवाचा खर्च

मंडप खर्च ... २ लाख ३० हजार, मानधन खर्च ... १ लाख १२ हजार,

चित्रीकरण खर्च ... २३ हजार

स्टेशनरी, प्रिंटिंग खर्च ... १४ हजार

चित्ररथ ... ११ हजार

पाणी बिल... १६ हजार

भोजन खर्च ... २३ हजार

सर्व मिळून सुमारे ५ लाख रुपये खर्च.

बँक शिल्लक ... १६ हजार

देणगी जमा... १६ हजार

✤ पं. हरिप्रसाद चौरसिया यांच्यावरील माहितीपट

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ज्येष्ठ बासरीवादक पं. चौरसिया यांच्यावर बनविलेला माहितीपट दाखविण्यात आला. दिग्दर्शक राजीव चौरसिया, डॉ. जब्बार पटेल यावेळी उपस्थित होते. पं. चौरसिया म्हणाले, ''लहान मुलांना हे माहितीपट दाखवले तर महान कला व कलाकार त्यांना कळतील, कॅमेऱ्यासमोर उभे राहणे खूप अवघड असते. एरवी मी खूप बोलतो; पण चित्रीकरण सुरू झाल्यावर मात्र मला बोलायलाच सुचायचे नाही.'' चित्रपट संगीत हे लोकप्रिय आहे. त्यामुळे चित्रपटांना संगीत देऊन, रसिकांच्या मनात जागा मिळवावी, असे वाटले आणि संगीत दिले, असे सांगून ते म्हणाले, ''लहानपणापासून मी गावामध्ये अनेक धून ऐकत आलो. त्याच मी चित्रपटात आणल्या. 'सिलसिला' चित्रपटातील माझे पहिले गाणे अमिताभ बच्चन यांनी गायले. होळीचे हे गाणे बच्चन गाणार हे ठरल्यावर, ते कवी हरिवंशराय बच्चन यांनी लिहावे, अशी अट मी घातली आणि त्यांनी ते गाणे लिहिले व 'रंग बरसे भीगे चुनरिया...' हे गाणे निर्माण झाले. आज इतक्या वर्षांनंतरही या गाण्याशिवाय होळीचा सण पूर्ण होत नाही. पण मीच संगीत देत बसलो तर येणारे संगीतकार काय करणार, असा प्रश्न पडला. तसेच मला गुरुकुल

स्थापन करायचे होते. हेही काम चित्रपट संगीतकार करू शकणार नव्हते. त्यामुळे चित्रपटांना संगीत देणे सोडले.''

राजीव चौरसिया म्हणाले, ''मी संगीत किंवा चित्रपट क्षेत्रात नाही. पण वडिलांवर चित्रपट व्हावा अशी माझी इच्छा होती.''

❖ 'अंतर्मुख करणारी कला सर्वोत्कृष्ट'

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात गजेंद्र अहिरे यांनी दिग्दर्शित केलेला व विक्रम गोखले यांची भूमिका असलेला 'अनुमती' हा चित्रपट दाखविण्यात आला. निर्माते विनय गानू, प्रशांत गोखले, राज काझी यावेळी उपस्थित होते.

''सौंदर्यासक्त मनाला बांधून ठेवते, अंतर्मुख करते ती सर्वोत्कृष्ट कला असते. भरपूर पैसा मिळवणे हे कलेचे यश मानले तर 'माहेरची साडी' हा उत्कृष्ट चित्रपट ठरेल; पण तसे नाही, तो चालणारा चित्रपट आहे,'' असे मत अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केले.

गोखले म्हणाले, ''चांगली कलाकृती पाहून मन अस्वस्थ होते. शांत बसावे असे वाटते. लौकिक अर्थाने तिला पैशातील यश मिळेलच असे नाही.''

'अनुमती' चित्रपटाविषयी ते म्हणाले, ''प्रत्येकाच्या जीवनात घडणाऱ्या घटना या चित्रपटात आहेत. कोणत्याही परिस्थितीत बायकोला वाचविण्याची तळमळ असलेला पती यात आहे. माझ्यामध्ये दडलेल्या अभिनेत्याला आणखी काय शोधता येईल, हे पाहण्याची संधी चित्रपटाने दिली.''

आपल्याकडे जागतिक दर्जाचे अनेक कलाकार आहेत, त्यांच्यासाठी योग्य पटकथा पाहिजे, असे सांगून अहिरे म्हणाले, ''चित्रपटात गोखले व रिमा लागू यांच्यात एक संवाद आहे. त्यातून त्यांनी जे नाट्य उभारले आहे, ते पाहताना त्यांच्या अभिनयसामर्थ्याची जाणीव होते. मोठ्या कलाकारांबरोबर काम करण्याचा अनुभव समृद्ध करतो.''

❖ संपूर्ण देशात प्रदर्शित होणारा पहिला मराठी चित्रपट

'पुणे ५२' हा नात्यांमधला 'सस्पेन्स थ्रिलर' ता. १८ जानेवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रासह देशात इतरत्रही प्रदर्शित झाला. इंग्रजी सबटायटल्स असलेले त्याचे 'ट्रेलर' तरुणांमध्ये औत्सुक्याचा विषय बनले आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत प्रयोगशीलता, वैविध्य आणि नावीन्य जपण्याच्या उद्देशाने आणि गिरीश कुलकर्णी यांची 'अरभाट निर्मिती' आणि अभय गाडगीळ व श्रीरंग गोडबोले यांच्या 'इंडियन मॅजिक आयमोशन पिक्चर्स' येथे प्रशिक्षण घेतलेले तरुण लेखक-दिग्दर्शक निखिल महाजन यांनी 'पुणे ५२'चे कथालेखन आणि दिग्दर्शन

केले आहे. न्यूझीलंडच्या जेरेमी रिगन यांनी अतिशय वेगळ्या धाटणीने या चित्रपटाचे छायांकन केले आहे. 'रंग दे बसंती', 'जिंदगी ना मिलेगी दोबारा'चे बेलॉन फॉन्सेका यांनी टिपलेला ध्वनी, तसेच आतिफ अफजल यांनी दिलेले संगीत आणि ह्यून जंग शिम यांनी दिलेले पार्श्वसंगीत ही या चित्रपटाची खास वैशिष्ट्ये आहेत. १९९२च्या सुमारास सर्वच क्षेत्रांत झपाट्याने बदल होत गेला आणि 'पेन्शनरांचे' म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर 'मॉल'मधील 'तरुणाई'ने कधी बहरले, हे कळलेच नाही. या गतिमान बदलाचा मध्यमवर्गीयांच्या जीवनावर मोठा परिणाम झाला. एका खासगी गुप्तहेराच्या जीवनात घडलेल्या विलक्षण गूढरम्य घटनांद्वारे हा बदल स्पष्ट केला गेला आहे. गुप्तहेराची मध्यवर्ती भूमिका गिरीश कुलकर्णीने साकारली आहे. सोनाली कुलकर्णी व सई ताम्हनकर यांच्याही भूमिका आव्हानात्मक आहेत. भारती आचरेकर किरण करमरकर, श्रीकांत यादव यांच्यासोबत गीतकार स्वानंद किरकिरे व साहित्यिक गो. पु. देशपांडे पाहुणे कलाकार आहेत.

मुंबईत झालेल्या 'मामी' चित्रपट महोत्सवातील 'इंडिया गोल्ड' स्पर्धा विभागात, तसेच न्यूयॉर्कमधील 'साउथ एशियन' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'पुणे ५२' चा समावेश होता. गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही समीक्षक आणि रसिक प्रेक्षकांनी 'पुणे ५२'ला पसंतीची पावती दिली.

✤ लेखकांनी जातींच्या कक्षेतून बाहेर पडावे

''जात पक्की माहीत असणाऱ्याला डौलाने उभे राहता येते किंवा जातिव्यवस्था चांगली, जातिवाद वाईट, अशी जातीचा अहंकार बाळगणारी विधाने भालचंद्र नेमाडे यांनी केली. त्यांच्या प्रभावात आलेले अनेक लेखक-प्रकाशकही आता हीच भूमिका मांडू लागले आहेत, हे मोठे दुर्दैव आहे. यामागे कोणता विचार आहे?'' अशा शब्दांत नागनाथ कोत्तापल्ले यांनी नेमाडेंवर हल्ला चढविला. आपल्याकडे प्रत्येकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहे. त्यामुळे वाचकांनीच जागरूक राहत जाती-धर्माच्या कक्षेतून बाहेर पडावे, असेही ते म्हणाले.

'अक्षर मानव' तर्फे डॉ. कोत्तापल्ले यांचा साहित्यिक भारत सासणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रा. प्रभाकर देसाई यांनी घेतलेल्या मुलाखतीत शिक्षक, प्राध्यापक, कुलगुरू, साहित्यिक आणि आता संमेलनाध्यक्ष, असे डॉ. कोत्तापल्ले यांचे व्यक्तिमत्त्व उलगडत गेले.

साहित्यात डोकावणाऱ्या जाती-धर्मांबाबत डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''लिहायला बसल्यानंतर प्रथम तुम्हाला जात आठवत असेल, तर लेखक म्हणून तुमचा तो पराभव आहे. लेखकाने स्वत:ला जातिव्यवस्थेत बांधून घेणे म्हणजे आपली ओळख बंदिस्त करण्यासारखेच आहे. साहित्याच्या क्षेत्रात जात डोकावत आहे. हे चित्र

नवे कोरे

विश्वसत्ता

मूळ लेखक : **टॉम मार्टिन**

अनुवाद : **उदय भिडे**

किंमत : ३८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

एक पवित्र वस्तू हस्तगत करण्यासाठी तिबेटमधल्या एका मठावर चिनी सैनिकांनी धाड टाकली आहे. प्राणरक्षणासाठी तिथल्या भिक्षूंनी जंगलात दडलेल्या गुहांकडे धाव घेतली आहे, पण एका परक्या जखमी माणसामुळे त्यांची वाटचाल म्हणावी तशा वेगाने होत नाही आणि तो माणूस बरोबर असण्याने त्यांच्या सगळ्यांच्याच जिवाला धोका उत्पन्न झाला आहे...

पत्रकार नॅन्सी केलीच्या नावाने एक पार्सल येते. त्यात एक रहस्यमय असे हाड कोरून बनवलेली तुतारी असते आणि एका पाश्चिमात्य माणसाने जिथे ऑर्किड्सच्या फुलांचे गालिचे जमिनीवर पसरलेले आहेत, उंच डोंगरांना उंचच उंच जाणाऱ्या छतांचे पॅगोडा मिठी मारून बसलेले आहेत आणि जिथे प्रार्थनामंदिरांचे उंच कळस जमिनीच्या गर्भात दडलेले आहेत अशा तिबेटच्या घनदाट जंगलात कुठंतरी दडलेल्या एका राज्यात प्रवेश केल्याचे वर्णन असते...

पत्रकार नॅन्सीदेखील एका कालातीत रहस्याचा शोध घेण्यासाठी अद्‌भुत दंतकथा आणि आख्यायिकांच्या भूप्रदेशातल्या एका धोकादायक प्रवासाला निघते...

धोकादायक आहे. खरे तर मानवी जीवनाचे दु:ख माझेच आहे, असे ज्याला वाटते तोच चांगला लेखक होय.''

''लेखक असलो, तरी शिक्षक म्हणून प्रामाणिक काम करायचे प्रथमच ठरविले होते. पुढे कुलगुरू झालो. आपण सक्षम आणि मतांवर ठाम असलो की, राजकीय व्यक्ती आपल्याला त्रास देत नाहीत, हा माझा अनुभव आहे. तत्कालीन शिक्षणमंत्र्यांपासून वेगवेगळ्या महाविद्यालयांचा रोषही मला पत्करावा लागला. पण, मूल्यांशी तडजोड केली नाही,'' असे त्यांनी सांगितले. विश्वास वसेकर यांनी प्रास्ताविक केले. नंदू क्षीरसागर यांनी आभार मानले.

✤ 'तुम्हे याद करते करते' चे प्रकाशन

अनेक अभिनेत्यांनी हिंदी चित्रपसृष्टीचा एक काळ गाजवला. त्यांच्या चित्रपटातील गीते सदाबहार वाटतात. ही गीते एक वेगळी अनुभूती देतात, असे मत सूरविहार संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कामत यांनी विलास करंबेळकर लिखित 'तुम्हे याद करते करते' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

मधुश्री प्रकाशनचे पराग लोणकर या वेळी उपस्थित होते. या पुस्तकातून शम्मी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, गीताबाली, वैजयंतीमाला, किशोरकुमार, मोहम्मद रफी, आशा पारेख, जॉनी वॉकर अशा कलावंतांची कारकीर्द व खासियत शब्दबद्ध केली आहे.

तेरणीकर म्हणाल्या, ''सुनील दत्त, देव आनंद, राजेश खन्ना, राजेंद्रकुमार किशोरकुमार अशा सदाबहार अभिनेत्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीचा एक काळ गाजवला. आजही त्यांचे चित्रपट ताजेतवाने वाटतात आणि त्यांचा अभिनय मनाला भिडतो.''

✤ 'सत्यशोधक' शतकमहोत्सवी प्रयोग

''सत्यशोधक नाटकाशी संबंधित प्रत्येकानेच स्वत:मधील 'सत्या'चा 'शोध' घेतला अन् त्यातून मिळालेले अनुभव उलगडताना प्रत्येकाच्या मनातून 'कालचे होते मुके, आज बोलू लागले'' ही भावना व्यक्त झाली.

पुणे महानगरपालिका कामगार युनियन निर्मित 'सत्यशोधक' नाटकाच्या शंभराव्या प्रयोगानिमित्त 'साधना साप्ताहिका'च्या विशेषांकाचे प्रकाशन महाराष्ट्र फाऊंडेशनच्या सुनील देशमुख यांच्या हस्ते झाले. नाटकाचे लेखक डॉ. गो. पु. देशपांडे, दिग्दर्शक अतुल पेठे, निर्मिती प्रमुख मुक्ता मनोहर आणि नरेंद्र दाभोलकर या वेळी उपस्थित होते. संध्या टाकसाळे यांनी संबंधित कलावंतांशी संवाद साधला.

'नाटकामुळे आमचे कुटुंब अधिक वाचायला लागले,' असे शिंदे यांनी सांगितले. तर 'शिकले नव्हते; पण या नाटकामुळे फुलेंची माहिती मला झाली,' अशी कृतज्ञता भिसे यांनी व्यक्त केली. 'वंचित, शोषित, पीडित समाजाच्या भावना

रंगभूमीवर आल्या तर मराठी रंगभूमी अधिक सशक्त होईल, या भावनेनेच कामगार युनियनशी जोडलो गेलो. सत्यशोधक हा आयुष्यातील विरळाच अनुभव आहे,' असे पेठे यांनी नमूद केले.

✤ साहित्य संघटक कौतिकरावांकडे जा. अध्यक्ष व्हा.

'मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवायचीय...? मग आमच्याकडे या; आमचा पाठिंबा मिळवा अन् यशस्वी व्हा...!' असा अनोखा मंत्र मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष 'साहित्य संघटक' कौतिकराव ठाले पाटील यांनी दिला.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा मसापतर्फे औरंगाबादेत सत्कार करण्यात आला. त्यावेळी ठाले पाटील यांनी केलेल्या भाषणावर मराठवाड्याच्या साहित्यिक वर्तुळात उलटसुलट चर्चा होत आहे.

मराठवाड्यातील ना. धों. महानोर, डॉ. सुधीर रसाळ, प्रा. रा. रं. बोराडे हे ज्येष्ठ साहित्यिक संमेलनाध्यक्षपदाचे प्रबळ दावेदार असले तरी या पदासाठीच्या प्रचलित निवडणूक पद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव पाहून ते आजवर कटाक्षाने दूर राहिले आहेत, असा कोत्तापल्ले यांनी उल्लेख केला. तोच धागा पकडत ठाले पाटील यांनी या ज्येष्ठ मंडळींना 'निवडणूक रिंगणात उतरा; बाकी आम्ही बघतो,' असे सुचविले. संमेलनाध्यक्षपदाच्या दर्जाचे उमेदवार आता मराठवाड्यातच आहेत, असाही दावा त्यांनी केला. कोत्तापल्ले हे केवळ आमच्या पाठिंब्यामुळे, आमच्या नियोजनामुळे विजयी झाल्याचा सूर ठाले यांनी समारोपाच्या भाषणात काढला.

✤ बालवाचकांसाठी १५० पुस्तिकांचा खजिना

क्रियाशील नवनिर्मितीचा वसा घेतलेल्या व्यास क्रिएशन्स या ठाणे येथील प्रकाशन संस्थेने ८४ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने बालवाचकांसाठी एकाचवेळी ८४ पुस्तकांचे प्रकाशन करून एक विक्रमच केला होता. त्या पुस्तकांना वाचक-ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याने, आता एकाच वेळी १५० पुस्तिकांचा खजिना संच प्रकाशित करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प 'व्यास'चे नीलेश गायकवाड आणि मार्गदर्शक श्री. वा. नेर्लेकर यांनी सोडला आहे.

१५० पुस्तिकांच्या या संचाची मूळ किंमत ३००० रुपये असून फेब्रुवारी अखेर नोंदणी करणाऱ्या शाळा, ग्रंथालये, सामाजिक संस्थांना तो १५०० रुपयात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संपर्क : व्यास क्रिएशन्स, डी-४ सामंत ब्लॉक्स, श्री घंटाळी देवी मंदिर रस्ता, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२.
फोन - 02225447038 / 9967839510 wyas@ rediffmail.com

वास्तवाचे झडझडून भान देणारे, नव्या मूल्यांची, विवेकाची लावणी करणारे साहित्यच श्रेष्ठ

चिपळूण येथे झालेल्या ८६व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षीय भाषणातील काही महत्त्वपूर्ण मुद्दे :-

साहित्य संमेलने म्हणजे साहित्य आणि भाषा यांचा महोत्सव असतो. तेव्हा साहित्य म्हणजे काय आणि कशासाठी असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नांची चर्चा सुरूच आहे आणि ती संपणारही नाही... लेखक ज्या भाषेत लिहीत असतो, त्या भाषेचा संबंध लेखनाशी असणे हे उघडच आहे. परंतु त्या भाषेची सांस्कृतिक पार्श्वभूमी, ती भाषा बोलणाऱ्या समाजाच्या परंपरा, इतिहास आणि एकूण मनाची ठेवण या गोष्टी लेखनात आपापत:च विरघळलेल्या असतात. त्या इतक्या एकरूप असतात की त्या वेगळ्याही करता येणार नाहीत. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्या त्या भाषेतील एकूण वाङ्मयीन परंपरा, त्या साहित्यप्रकारांच्या परंपरा आणि आतापर्यंत झालेली त्या साहित्यप्रकाराची जडणघडण या गोष्टी लेखनात मुरून गेलेल्या असतात. कुठल्याही लेखनाचे वेगळेपण पाहताना या सगळ्याच गोष्टी त्यातून ध्वनित होतात.

✤ कलाकृतीची सिद्धता

साहित्यातला शब्द नेहमीच्या वापरातला असतो. परंतु आपण वाचायला लागलो की त्या शब्दामध्ये सुप्त, अभिप्रेत असणाऱ्या असंख्य गोष्टी जाग्या होऊन संवाद करू लागतात. हा संवाद वाचकांच्या व्यक्तिमत्त्वावरही अवलंबून असतो. तरीही कलाकृती ही कलाकृती म्हणून जेव्हा सिद्ध होते, तेव्हा या साऱ्याच गोष्टी जाणवायला लागतात. वेगळेपणाची जाणीव व्हायला लागते. विशेष म्हणजे, प्रबोधनाच्या चळवळी लेखकांवर खोलवर परिणाम करत असतात. त्याचीही जाणीव व्यापक व्हायला लागते. अशा

असंख्य गोष्टींमधून कलाकृती सिद्ध होते. लेखकाच्या जीवनदृष्टीच्या अनुषंगाने, त्याच्या उन्नत जीवनाच्या संकल्पनचित्राच्या अनुषंगाने कलाकृती आकाराला येतात. साहित्यप्रकाराच्या अनुषंगाने, प्रवाहांच्या अनुषंगाने, लेखकांच्या, अनुभवांच्या, काळाच्या अनुषंगाने अशी अनेक प्रकारे वर्गवारी होऊ शकते. एक म्हणजे समाजव्यवस्थेच्या अंगाने. काही कलाकृती या समाजव्यवस्थेशी स्वत:ला जोडून घेतात. प्रस्थापित व्यवस्थेचे गुणगान करणाऱ्या असतात. त्या व्यवस्थेतील चांगुलपणा दाखविण्याचा प्रयत्न करतात. व्यवस्थेशी संघर्ष न करता, त्या व्यवस्थेमध्येच कल्याणार्थ कसा दडला आहे हे सांगतात. त्या व्यवस्थेतील अंतर्विरोधाकडे दुर्लक्ष करतात. आम्ही लेखक आहोत, समाजाशी आमचे काही देणेघेणे नाही, आम्ही स्वायत्त व स्वतंत्र आहोत अशी भूमिका घेतात. व्यवस्थेतील कुरूपतेकडे दुर्लक्ष करतात. म्हणजे कळत-नकळत व्यवस्थेचे समर्थनच करतात...

प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करू पाहणारे साहित्य हे अधिक लक्षणीय असते. जगातले टिकलेले साहित्य हे व्यवस्थेशी झोंबी घेणारे असते. वास्तवाचे झडझडून भान देणारे, नव्या मूल्यांची आणि विवेकाची लावणी करणारे असते. एका प्रकारे येथे लेखक जीवनाबरोबर तर असतोच, पण व्यवस्थेवर आघातही करतो आणि त्यातून तो व्यवस्थेने ज्यांचे दमन केले, त्यांचा आवाज मुखर करतो. हे साहित्य लोकप्रिय नसेल, त्याची काही काळ उपेक्षाही होऊ शकेल. परंतु या प्रकारचे साहित्य– मग ते कुठल्याही प्रकारातील, काळातील अगर कुठल्याही देशातील, भाषेतील असेल; अशा प्रकारचे साहित्य– थोडेच असेल; हेच साहित्य टिकते आणि संस्कृतीत भर घालते. प्रस्थापित व्यवस्था, संस्कृतीमधील कुरूपता आधोरेखित करण्याचे कार्य हे साहित्य करते. नुसती कुरूपता अधोरेखित करत नाही तर जीवनाचे खरेखुरे सौंदर्य ध्वनित करते. त्याचा आविष्कार इतका जोरकस असतो की तेथे विचारांना चालना देण्याचे सामर्थ्यही असते आणि साहित्यकृतीला अपेक्षित सौंदर्यही तेथे निर्माण होते.

✤ वारकरी संप्रदायाचे महत्त्व

भारतीय संस्कृतीच्या संदर्भात संपूर्ण वारकरी अगर महानुभाव संप्रदाय-परंपरा असेल; ते व्यवस्थेला प्रश्न करतात. कबीर व्यवस्थेला प्रश्न विचारतो. बसवेश्वर व्यवस्थेला प्रश्न विचारतो. या साऱ्यांनीच प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारले. जात परमेश्वरनिर्मित आहे का? कुळे परमेश्वरनिर्मित की मानवनिर्मित? विटाळ-चांडाळ या कल्पना मानवनिर्मित आहेत ना? संपत्तीची विषम वाटणी ही व्यवस्था माणसानेच रचली ना? आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी श्रेष्ठ-कनिष्ठ भाव माणसानेच निर्माण केले ना? हे आणि यासारखे अनेक प्रश्न परंपरेतल्या महामानवांनी साहित्यातून उपस्थित केले. ते साहित्य त्याच्या आंतरिक सामर्थ्याने सुंदर झाले आणि विचारप्रवर्तक

असे मानवी विचारांना आवाहन करणारे साहित्य माणसाच्या सौहार्दपूर्ण जगण्याचे चित्र रेखाटू शकले. ते माणसाच्या अंत:करणाच्या गाभ्याला आवाहन करते. ते माणसाच्या माणूसपणाला आवाहन करते. ते आपल्या प्रस्थापित जीवनावर ओरखडे ओढते. व्यवस्थेच्या मर्यादा दाखवते. त्यातला दंभ आणि दमन दाखवते. म्हणून पुढच्या काळातील लोक त्याचा स्वीकार करतात. ज्या संतांचा त्यांच्या वर्तमानात छळ झाला, त्यांना पुढील पिढ्या पूजायला लागतात. त्यांनी सांगितलेल्या विचारांचा थोडा तरी परिणाम पुढच्या जगण्यावर होतो. म्हणजे पुढे येणारी संस्कृती बदलते. ती अधिकपेक्षा चांगली असते.

✤ व्यवस्थेला वाङ्मयाचे प्रश्न

व्यवस्थेला प्रश्न विचारणारे साहित्य आधुनिक काळात मराठीत बऱ्यापैकी निर्माण झाले. वैचारिक स्वरूपाचे तर निर्माण झालेच आहे, पण ललितही! लोकहितवादी, म. जोतिबा फुले, गो. ग. आगरकर, वि. रा. शिंदे, रा. शाहू महाराज, श्री. म. माटे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे मैलाचे दगड आहेत. विशेषत: एकोणिसाव्या शतकात वैचारिक साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. ललित साहित्याचाही या संदर्भात निर्देश करता येईल. म. फुले यांच्या कविता आणि नाटक, केशवसुतांच्या कविता, हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या अशा काही प्रारंभिक साहित्याचा निर्देश करता येईल. पुढे वा. म. जोशी, कुसुमाग्रज, वि. स. खांडेकर, अण्णा भाऊ साठे, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे यांचा उल्लेख करता येईल.

परंतु व्यवस्थेशी संघर्ष करणाऱ्या साहित्याला खरा बहर आला तो १९७० नंतर. साहित्यात विविध प्रवाह आकाराला येऊ लागले. दलित साहित्य हा त्यातील प्रमुख आणि महत्त्वाचा प्रवाह. त्याने संपूर्ण व्यवस्थेशी आणि परंपरांशीही संघर्षाची भूमिका घेतली. तसे आवश्यकच होते. स्वातंत्र्यानंतरची पिढी संस्कृतीला प्रश्न विचारू लागली. भारतीय घटनेने दिलेले समतेचे आणि बंधुतेचे नेमके काय झाले हा तो मुख्य प्रश्न. पण त्याबरोबरच जीवनातली श्रेष्ठ मूल्ये कोणती असाही प्रश्न या साहित्याने उपस्थित केला. साहित्यातील मूल्ये कोणती असाही त्यांचा प्रश्न होता. हे आणि यासारखे प्रश्न पूर्वी मार्क्सवादी लेखककवींनी उपस्थित केले होते. पण आता दलित साहित्य चळवळीने ते ऐरणीवर आणले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना केंद्रस्थान देऊन ही चळवळ कार्यरत झाली. त्यामुळे साहित्याच्या स्वरूपापासून प्रयोजनांपर्यंत आणि मूल्यांपासून सौंदर्यापर्यंत विविध बाबींची चर्चा पुन्हा सुरू झाली. खरे म्हणजे ही चळवळ बंधुत्वाची, समतेची मागणी करणारी होती. याच सुमारास साहित्यात दलित सवर्ण असे काही नसते, साहित्य हे साहित्य असते असा प्रतिवाद होऊ लागला. साहित्यात वेगळ्या चुली

कशाला असे बोलले जाऊ लागले. खरे म्हणजे या चुली नव्हत्या. जातव्यवस्थेवरचा हा उद्रेक होता आणि आपण सगळे एक चुलीवर शिजवून खाऊ, असे ह्या चळवळीचे म्हणणे होते. माणुसकीला आवाहन करण्याचा प्रयत्न होता. जातींमधून बाहेर पडून माणूस ही मोठी व्यापक ओळख स्वीकारण्याचा प्रयत्न होता. खरे म्हणजे दलित साहित्याने जातव्यवस्थेसंबंधी पुनर्विचार केला पाहिजे, ही व्यवस्था खिळखिळी केली पाहिजे आणि समाजात निकोप मानवी संबंध निर्माण झाले पाहिजेत, हेच सांगितले. या दिशेने इतर लेखक व विचारवंतांनी, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी जातिव्यवस्थेसंबंधी चिंतन करण्याची आवश्यकता होती. कारण जातव्यवस्था तर सर्वांना वेढून आहे आणि ती आपल्या साऱ्यांना परस्परांपासून दूर लोटते. परंतु असे व्यापक चिंतन मात्र झाले नाही, ही भारतीय समाजाला पुन्हा गर्तेत लोटणारी गोष्ट आहे, असे वाटते. आज तर जातीच्या अहंता इतक्या टोकदार होत आहेत की यातून संवादच संपून जाईल असेही वाटते.

❖ जातव्यवस्थेचा प्रभाव

जातव्यवस्थेचा जीवनाच्या सर्व अंगावर प्रभाव पडतोच. असे असले तरी आज स्त्रीवादी दृष्टीने मानवी जीवनाचा अर्थ लावू पाहणाऱ्या आणि प्रस्थापित व्यवस्थेशी झोंबी घेणाऱ्या स्त्रीवादी लेखनाची चळवळ अतिशय सशक्तपणे आकाराला आली आहे. विशेषत: या चळवळीतील लेखिकांनी प्रस्थापित व्यवस्था आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या मागे असणाऱ्या मूल्यसरणीच्या विरोधात वैचारिक भूमिका घेऊन बंडखोरी केली आहे. त्यातून गौरी देशपांडे यांच्यापासून अनेक लेखिकांनी मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घातली. स्त्रीवादी चळवळीने व्यवस्थेशी संघर्ष मांडला आहे. परंतु पुरुषसत्ताक जीवनपद्धतीच्या मागे ठामपणे उभ्या असलेल्या जातव्यवस्थेला समजून घेतल्याशिवाय खरा लढा पूर्ण होणार नाही. याचे भान स्त्रीवादी चळवळींनी बाळगले पाहिजे. शिवाय जागतिकीकरणामध्ये अर्थकारण केंद्रस्थानी आले आहे आणि ते स्त्रियांची गुलामी अधिक घट्ट करू पाहते आहे. त्याचेही भान स्त्रीवादी चळवळीला आले तर या चळवळीने व्यवस्थेशी मांडलेला संघर्ष अधिक तीव्र होऊ शकेल.

या चळवळींच्या आगेमागे आदिवासी साहित्याची चळवळ मराठीमध्ये सुरू झाली. या चळवळीनेही प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष सुरू केला. अनेक कवी लेखकांनी आदिवासींच्या जगण्याचे वेगळेपण मांडत असतानाच भोवतीच्या व्यवस्थेने आपले दमन कसे केले आहे, याची जाणीवही प्रकट केली. एका प्रकारे या चळवळीने प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बंडाचे निशाण उभे केले. व्यवस्थेशी संघर्ष करणारे मुस्लिम मराठी साहित्य आवर्जून नोंद करण्याजोगे आहे. तेही व्यवस्थेशी झोंबी घ्यायला लागेल, तेव्हा अधिक समर्थ आणि समृद्ध होईल.

आज जगात ज्ञानाचा महास्फोट होत आहे. विविध शास्त्रांचा आणि त्यांच्या शाखा उपशाखांचा विस्तार होतो आहे. आंतरविद्याशास्त्रीय दृष्टी वाढून ज्ञानशाखांच्या एकत्रीकरणातून पुन्हा नव्या ज्ञानशाखा विकसित होत आहेत. उदा. ॲग्रो इंजिनियरिंग, ॲग्रो जेनेटिक्स, बायो फिजिक्स इत्यादी. अशा नव्या ज्ञानशाखांची यादी काढली तर ती किमान ७०-७५ तरी होईल. तेव्हा या ज्ञानशाखांना मराठी भाषा सामोरी जाते की नाही हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. या ज्ञानशाखांचे ज्ञान देणारी पुस्तके मराठीमध्ये येणे आवश्यक आहे. यातून मराठी भाषा किती समृद्ध आहे हे तर कळेलच; पण मराठी भाषाही समृद्ध होईल. मुख्य म्हणजे मराठी विद्वानांच्या निष्ठेचा आणि ज्ञानाचाही कस लागेल. तेव्हा नॅनो टेक्नॉलॉजीपासून ॲग्रो इकॉनॉमिक्सपर्यंत सर्व ज्ञानशाखांची पुस्तके मराठीत आणण्याचा ध्यास घेतला पाहीजे. आज वाचनसंस्कृतीचा ऱ्हास होतो आहे. तेव्हा अशी चर्चा करत बसण्यापेक्षा त्यात वाढ व्हावी, यासाठी आपण सारे मिळून धडपड करूया.



१७ वी आवृत्ती

वाइज अँड अदरवाइज

मूळ लेखक : **सुधा मूर्ती**

अनुवाद : **लीना सोहोनी**

किंमत १५०/-रु. । पोस्टेज ३०/-रु.

भारताच्या आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासभागांमध्ये सुधा मूर्ती यांनी भटकंती केली आहे. त्या पायी फिरल्या आहेत, त्यांनी बसनंही प्रवास केला आहे. या भागात अठराविश्वे दारिद्र्यात राहणाऱ्या माणसांच्या दारात आरोग्याच्या आणि शिक्षणाच्या सुविधा नेऊन पोचवण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्यामुळेच समाजाच्या विविध स्तरांतील असामान्य व्यक्तींच्या सहवासात त्या आल्या. मग ते मुंबईतून उठून जाऊन भूकंपग्रस्त गुजरातमध्ये स्थायिक होणारं भिकाऱ्याचं कुटुंब असो, हुंड्यासाठी बळी गेलेल्या एका तरुणीची माता असो... नाही तर मोठ्या रकमेचा चेक देणगी म्हणून पाठवणारा अनामिक दाता असो... या सर्वांमुळे, त्यांच्या हृदयाला स्पर्श करून जाणाऱ्या कहाण्यांमुळे आणि त्यांच्या मुलखावेगळ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामुळे सुधा मूर्तींचं जीवन समृद्ध होऊन गेलं आहे.

५ वी आवृत्ती

स्वप्नातील चांदणे

रत्नाकर मतकरी

किंमत : ८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

जेमतेम विशीचे असताना रत्नाकर मतकरींनी पहिली परिकथा लिहिली : 'सोनेरी मनाची परी'.

अर्थातच, ती प्रेमकथा होती. एका तरुणानं, सगळ्या तरुणांसाठी लिहिलेली. त्या पाठोपाठ आल्या, या संग्रहातल्या इतर परिकथा- खरं तर प्रेमकथा. त्यांची कथनशैली अगदीच वेगळी. भाषा लयबद्ध, नादमधुर. इतकी चित्रदर्शी, की जसा एखादा गतीमान चित्रपटच आपल्या नजरेसमोर उलगडतोय.

कुठं कुठं तर, छायाचित्रण केलेलं असावं तसं, छायाप्रकाश आणि आकृती यांचे खेळ दिसतात. ही किमया मतकरींच्या शब्दांची. परिकथा केवळ मुलांसाठी नसतात. जे मनानं तरुण आहेत, ज्यांना जीवनातलं काव्य जाणवतं, सौंदर्याचा शोध घ्यावासा वाटतो, सुखदुःखाच्या सर्व छटांमध्ये रंगावंसं वाटतं, त्या प्रौढांसाठी, या जणू कथारूपानं सांगितलेल्या कविता आहेत.

प्रेमाविषयीच्या.

प्रेमातला अत्युत्कट आनंद, विरहाच्या असह्य वेदना, यांच्याही पलीकडे जाऊन, प्रेमातला त्याग, प्रेमासाठी मोजावी लागणारी किंमत, प्रेमामुळे झालेले अंतर्बाह्य बदल, अशा सर्वच प्रेमरंगांची गाथा आहे ही.

आज, काल किंवा उद्या, प्रेमात पडणाऱ्या प्रत्येकानं वाचल्याच पाहिजे, अशी या शैलीतल्या, या एवढ्याच कथा मतकरींनी लिहिल्या, आणि साचा मोडून टाकला. त्यांच्या एकूण लिखाणात असा दुसरा संग्रह नाही. एकूण मराठी वाङ्मयातच एकमेवाद्वितीय असा हा कथासंग्रह.

◗ 'साहित्य अकादमी' पुरस्काराचे मानकरी

भारतीय साहित्यविश्वात मानाचे स्थान असलेले, सन २०१२चे 'साहित्य अकादमी' पुरस्कार जाहीर झाले असून, जयंत पवार यांचा 'फीनिक्सच्या राखेतून उठला मोर' हा कथासंग्रह या पुरस्काराचा मानकरी ठरला.

विविध भाषांमधील १९ साहित्यिकांना यंदा हा पुरस्कार जाहीर झाला. सन्मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप असून १८ फेब्रुवारीला नवी दिल्लीत होणाऱ्या विशेष सोहळ्यात हे पुरस्कार दिले जातील. कोंकणी भाषेत हा पुरस्कार काशीनाथ शांबा लोलीएनकर यांच्या 'काव्यसूत्र' या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

'साहित्य अकादमी युवा पुरस्कारा'साठी मराठीत धर्मकीर्ती सुमंत यांच्या 'पाणी, चारु आरो इत्यादी' या नाटकाची निवड झाली आहे. या पुरस्काराचे हे दुसरेच वर्ष असून सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे.

कोकणीमध्ये नमन धवस्कर सावंत यांना 'मुक्तमन'साठी हा पुरस्कार जाहीर झाला.

'साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार' कार्यकर्त्या लेखिका शारदा साठे यांना मोहित सेन यांच्या 'अ ट्रॅव्हेलर अँड द रोड' या आत्मकथनाच्या 'पांथस्थ : एका भारतीय साम्यवादी नेत्याची मुशफिरी' या अनुवादासाठी जाहीर झाला आहे. सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप असून ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या कार्यक्रमात तो दिला जाईल.

◗ शारदा साठे - अनुवाद पुरस्कार

'युनायटेड नेशन्स'ने १९७५ मध्ये 'जागतिक महिला वर्ष' जाहीर केले

त्यामुळे अनेक देशांतील महिला चळवळींना नवा जोम आला. पुढचे दशक स्त्री दशक म्हणून पाळले गेले. स्त्रीमुक्तीचा नारा देत महाराष्ट्रात 'स्त्रीमुक्ती संघटना' सुरू झाली. शारदा साठे या संघटनेच्या संस्थापक सदस्य आणि सचिव. त्यांनी 'मुलगी झाली हो' हे पथनाट्य देशभर नेले. हुंडाविरोधी चळवळ, सती, बालविवाह, बलात्कार, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, लिंगनिवड चाचण्यांना विरोध, महिलांचा लैंगिक छळ अशा प्रश्नांवर राष्ट्रीय पातळीवर संघर्ष करताना शारदाताई ॲकॅडेमिक पातळीवरही सतर्क राहिल्या. १९७५मध्ये महाराष्ट्रात पहिली महिला परिषद झाली. १९९४ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या महिला संसद प्रतिनिधींशी चर्चा करण्याची संधी त्यांना मिळाली. बीजिंगमध्ये चौथ्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. १९९२ मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या महिला आयोगाच्या त्या सदस्य होत्या.

स्त्रीमुक्ती संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'प्रेरक ललकरी'चे संपादन शारदा साठे करतात. 'स्त्रीमुक्ती आणि विज्ञान', 'क्षितिजावरील शलाका', 'ललकार' ही त्यांची पुस्तके. साहित्य अकादमीचा अनुवाद पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.

◗ जयंत पवार यांना साहित्य अकादमी पुरस्कार

प्रसिद्ध नाटककार-कथाकार जयंत पवार यांच्या 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाला मिळालेला 'महाराष्ट्र फाउंडेशन' पुरस्कार आणि पाठोपाठ यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला जाहीर झालेला 'साहित्य अकादमी' पुरस्कार, या दोन घटना मराठी सारस्वतातला बदल सूचित करणाऱ्या आहेत. मुंबई महानगराचे जे अस्वस्थ वर्तमान आजवर साहित्यबाह्य मानण्यात आले होते, तेच जयंत पवार यांनी आपल्या नाटक-कथांतून पृष्ठभागावर आणले. गिरणगाव, तिथली चाळसंस्कृती, गिरण्यांच्या संपाने उद्ध्वस्त झालेली माणसे आणि पुन्हा त्या गिरण्यांच्याच जागेवर उभे राहिलेले चकचकीत मॉल्स, ब्रॅण्डेड दुकाने... हा सारा पट जयंत पवार यांनी मांडला आहे. भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका'पासून मराठी साहित्यात महानगरी संवेदनेचे चित्रण होण्यास सुरुवात झाली. पवार यांच्या नाटक-कथासंग्रहाला जाहीर झालेल्या पुरस्कारांमुळे त्या साहित्याला प्रतिष्ठा मिळणार आहे. जयंत पवार यांचा जन्म गिरणगावातला. वडील गिरणीत काम करीत. त्यांनी स्वत:ही गिरणीत काम केले. वयाची बत्तीसेक वर्षे या परिसरात घालवली. गिरणगाव तिथली संस्कृती आणि त्या संस्कृतीतले ताणे-बाणे नाटक-कथांतून उभे केले. 'अधांतर' नाटक 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' मधील कथा असोत, त्यातले वास्तव मनावर, किंबहुना आपल्या संवेदनेवर चरचरीत ओरखडे काढते.

◗ धर्मकीर्ती सुमंत - युवा साहित्यकार पुरस्कार

तरुणाईच्या जाणिवा प्रगल्भपणे मांडणाऱ्या आश्वासक नाट्यलेखकांची नव्या पिढीत वानवा असल्याची चर्चा असतानाच धर्मकीर्ती सुमंत हे नाव नाट्यक्षितिजावर उदयाला आले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असतानाच पुरुषोत्तम करंडक आणि फिरोदिया करंडक अशा स्पर्धांतून त्याने लक्षवेधक कामगिरी केली. नाटक कंपनी या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून तो रंगभूमीवर कार्यरत आहे.

तरुणाईच्या जाणिवा मांडणारा म्हणून त्याची खरी ओळख झाली ती 'गेली एकवीस वर्षं' या नाटकातून. शिक्षण, नाती, माध्यमं, धावतं जग, करिअर, तंत्रज्ञान या सगळ्याने आताच्या तरुणाईही होणारी घुसमट त्याने त्यात प्रगल्भपणे मांडली. या नाटकासाठी त्याला 'जयवंत दळवी पुरस्कार' मिळाला. हे नाटक आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्येही सादर झाले. लंडनच्या रायटर्स ब्लॉक या प्रतिष्ठेच्या कार्यशाळेसाठीही त्याची निवड झाली. याच कार्यशाळेतून त्याने 'नाटक नको' हे नाटक आकाराला आणले.

'चारू-आरो' या नाटकात लग्नाचे बंधन टाळून प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याची तयारी असणाऱ्या प्रेमिकांत काही कारणाने दुरावा निर्माण होतो. हा दुरावा दोन व्यक्तींच्या जगण्यामागील धारणा भिन्न असल्याने वाढत जातो. दोन व्यक्तींमधले संबंध आणि सामाजिक बाबी या दोन्हीमधली ताण त्याने मांडले आहेत. तर, 'पाणी' हे विचार प्रवृत्त करणारे नाटक असून, बुद्धिवादी लेखक आणि अस्सल कार्यकर्ता या दोघांत निर्माण होणारा तणाव हा या नाटकाचा विषय आहे.

प्रायोगिक रंगभूमी, प्रवाहावेगळी आणि वास्तववादी नाटके ही ओळख असलेला धर्मकीर्ती फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये पटकथा लेखनाचे शिक्षण घेत आहे.

◗ दमाणी साहित्य पुरस्काराचे वितरण

'राजकारणातील लेखक आणि साहित्यिकांना साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून दूर लोटण्याचे कारण काय,' असा सवाल उपस्थित करत, 'राजकारणाला सुसंस्कृत करणारी सुद्धा माणसं आहेत,' असे प्रतिपादन डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी सोलापूर येथे केले.

भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार डॉ. विजया मेहता (झिम्मा), यशवंतराव गडाख (अंतर्वेध) आणि प्राचार्य महेंद्र कदम (आगाळ) यांना हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या एका विशेष कार्यक्रमात समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये, सन्मान चिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ समीक्षक प्रा. निशिकांत ठकार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

जिल्हाधिकारी गोकुळ मवारे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. निशिगंधा माळी,

प्रेमरतन दमाणी, गिरीराज दमाणी, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, कवी फ. मुं. शिंदे उपस्थित होते.

◗ नाटककार गिरीश कर्नाड यांना 'तन्वीर सन्मान' प्रदान

रूपवेध प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित समारंभात कर्नाड यांना 'तन्वीर सन्मान', तर नव्या पिढीतील लेखक, प्रकाश योजनाकार प्रदीप वैद्य यांना 'तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार' दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी अभिनेते डॉ. श्रीराम लागू, दीपा लागू, अभिनेत्री अरुंधती नाग, आनंद चाबुकस्वार उपस्थित होते.

पुरस्काराविषयी ते म्हणाले, ''डॉ. लागू आणि दीपा यांच्यातर्फे मिळणारा हा पुरस्कार एका वेगळ्याच उंचीचा आहे. तो मला मिळाला, हा माझा सर्वोच्च सन्मान आहे, असे मी समजतो. माझे आणि पुण्याचे नाते हेही वेगळेच आहे. मी नेहमी पुण्यात येतो. माझी आई पुण्यातली होती. कन्नड असलो तरी मराठीवरही माझे तितकेच प्रेम आहे. माझी पाळेमुळे मराठीशी जोडली गेलेली आहेत याचा मला अभिमान आहे.''

डॉ. पटेल म्हणाले, ''भारतीय रंगभूमीची वेगळी ओळख निर्माण करून देणाऱ्या नाटकाकारांमध्ये विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड अशा काही मोजक्या नाटककारांचा समावेश होतो. इतकी वर्षे झाली तरी कर्नाड यांची 'तुघलक', 'ययाती', 'हयवदन' ही नाटके आजच्या काळाशी सुसंगत आहेत. नव्या पिढीला ती पुन्हा-पुन्हा करावी, बघावीशी वाटतात. नाटकातील प्रतिमा, विषय, भाषा यातून नटासाठी, दिग्दर्शकासाठी आव्हान निर्माण होते, हे त्यांचे वेगळेपण आहे.''

वैद्य म्हणाले. ''मी नाट्यधर्मी नाही. पण हा पुरस्कार मला 'नाट्यधर्मी हो' असे सांगतो आहे. या भावनेनेच मी हा पुरस्कार स्वीकारत आहे.''

◗ पं. शिवकुमार शर्मा, ढसाळ यांना महापालिकेचे पुरस्कार

पुणे महानगरपालिकेतर्फे यंदा प्रथमच देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार साहित्यिक नामदेव ढसाळ यांना जाहीर करण्यात आला आहे.

'सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्यांना यंदापासून डॉ. आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार, पहिला पुरस्कार नामदेव ढसाळ यांना दिला जाईल. १,११,१११ रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.'

ज्येष्ठ संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांना पं. भीमसेन जोशी पुरस्कार देण्यात येईल. या पूर्वी लता मंगेशकर आणि पं. बिरजू महाराज यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

अबुल कलाम आझाद यांच्या नावाने प्रतिवर्षी व्यक्ती आणि संस्था या दोघांचाही सन्मान केला जातो. २०११ चा आझाद पुरस्कार प्रा. रावसाहेब कसबे यांना आणि संस्थेचा पुरस्कार विद्यार्थी सहाय्यक समितीला दिला जाणार आहे.

२०१२ च्या आझाद पुरस्कारासाठी काझी मुस्ताक अहमद आणि मुस्लिम समाज प्रबोधन संस्था यांची निवड करण्यात आली आहे. २५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

◗ संगीत नाटक अकादमी पुरस्कार

महाराष्ट्रातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक अजय पोहनकर, नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे, लावणीसम्राज्ञी सुलोचना चव्हाण व निर्माते अरुण काकडे यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

ग्रॅमी पुरस्कार विजेते संगीतकार टी. एच. विनायकराम, ज्येष्ठ नाटककार रतन थिय्याम यांना संगीत नाटक अकादमीची विद्यावृत्ती जाहीर करण्यात आली असून, दक्षिण भारतीय संगीतकार इलयाराजा यांना संगीत नाटक अकादमी पुरस्कार देण्यात येणार आहे.

संगीत अकादमी विद्यावृत्तीसाठी व्हायोलिनवादक एन. राजम, विनायकराम व थिय्याम या तिघांची निवड झाली आहे. संगीत नाटक अकादमी विद्यावृत्ती ही ३ लाख रुपयांची असते, तर अकादमी पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, ताम्रपट व शाल असे असते. संगीत नृत्य, नाटक या क्षेत्रांतील ३६ कलाकारांची २०१२ च्या अकादमी पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. राजशेखर मन्सूर व अजय पोहनकर (हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत), साबीर खान (तबला), बहाउद्दीन डागर (रुद्रवीणा), ओ. एस. त्यागराजन (कर्नाटक शास्त्रीय संगीत), म्हैसूर एम. नागराजा (व्हायोलिन), के. व्ही. प्रसाद (मृदुंग), इलयाराजा (सर्जनशील व प्रायोगिक संगीत), भाई बलबीरसिंग रागी (गुरबानी). नृत्यामध्ये प्रियदर्शनी गोविंद (भरतनाट्यम), विजय शंकर (कथक) वाझेगाडा विजयन (कथकली), वेदान्तम रामलिंग शास्त्री (कुचीपुडी), शर्मिला विश्वास (ओडिसी), जयनारायण सामल (छाऊ) पैनकुलम दामोदर चकयार (कुटियट्टम), ज्वाला प्रसाद (संगीत व नृत्य), आदिती मंगलदास (सर्जनशील व प्रायोगिक नृत्य), यांचा त्यात समावेश आहे.

संगीत नाटक अकादमी पुरस्कारासाठी अर्जुनदेव शरण (नाट्यलेखन), त्रिपुरारी शर्मा व वामन केंद्रे (दिग्दर्शन), परवेश सेठी, निर्मल ऋषी परसाई कन्नप्पा संवादन (अभिनय), मुरारी रॉयचौधरी (नाट्यसंगीत), गुलाम रसूल भगत (नाट्यपरंपरा), लोककलांमध्ये गोरू चनबसप्पा (कर्नाटक), किनरम नाथ ओझा, सुखनानी ओजपली (आराम), प्रेम सिंग देहाती (लोकनाट्य हरयाणा), सुलोचना चव्हाण (लावणी-

महाराष्ट्र), मथनूर शंकरन कुट्टी मरार (थयाम्बका- केरळ), गोविंद राम निर्मळकर (नाचा- छत्तीसगड) हीरासिंग नेगी (मुखवटे निर्मिती - हिमाचल प्रदेश) प्रफुल्ला करमाकर (पारंपरिक बाहुल्यांचे खेळ- पश्चिम बंगाल) यांची निवड झाली आहे. नंदिनी रामाणी व अरुण काकडे यांना सर्वंकष कामगिरीसाठी अकादमी पुरस्कार जाहीर झाले आहेत.

◗ लोकमतचे अक्षररंग पुरस्कार

गेल्या वर्षांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांमधून साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके, ज्येष्ठ लेखिका अरुणा ढेरे आणि कवी अशोक नायगावकर यांच्या परीक्षक समितीने प्रत्येक विभागातील पाच नावे निवडली. यातील आपल्या आवडीच्या पुस्तकाला वाचकाने आपले मत द्यावे अशी योजना होती.

कविता -

१. भुईशास्त्र (ऐश्वर्य पाटेकर) २. या रूममध्ये आलं की लाइफ सुरू होतं (हेमंत दिवटे) ३. ओळखीची वाट (नीला सत्यनारायण) ४. हत्ती इलो (अजय कांडर) ५. तळ ढवळतांना (लहू कानडे)

कथा -

१. पानगळ (मिलिंद जोशी) २. न लिहिलेली आत्मकथा (राजेंद्र माने) ३. गावबंधू (ज्ञानेश्वर कोलवेकर) ४. राखीव सावल्यांचा खेळ (किरण गुरव) ५. काळजातील खोल घाव (संजय भास्कर जोशी)

कादंबरी -

१. तांडव (महाबळेश्वर सैल) २. झड-झिंबड (कृष्णात खोत) ३. जलमबेडी (रामराव झुंजारे) ४. पडझड (अशोक पवार) ५. लॉक ग्रिफिन (वसंत लिमये)

वैचारिक / वास्तववादी लेखन -

१. ईशावास्यम् इद्म सर्वम् (आसावरी काकडे) २. काँग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला? (शेषराव मोरे) ३. सूफी तत्त्वज्ञान (डॉ. मुहम्मद आझम) ४. शाळा भेट (नामदेव माळी) ५. देवाच्या नावाने (युनिक)

गानसरस्वती किशोरी अमोणकर यांचे व रसपूर्ण भाषण. साहित्य संमेलनाच्या आजी-माजी अध्यक्षांची उपस्थिती, उत्साहाने भारलेल्या वातावरणात 'लोकमत' वृत्तपत्र समूहाचा पहिला अक्षरंग पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

प्रसिद्ध लेखक श्याम मनोहर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तो एक लाख रुपयांचा आहे.

मुंबईचे हेमंत दिवटे यांच्या 'या रूममध्ये आलं की लाइफ सुरू होते.' या कवितासंग्रहाला, साताऱ्याचे डॉ. राजेंद्र माने यांच्या 'न लिहिलेली आत्मकथा' या कथासंग्रहाला, शेगावचे रामराव झुंजारे यांच्या 'जलमबेडी' या कादंबरीला व नगरचे

डॉ. मोहम्मद आझम यांच्या 'सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' या वैचारिक ग्रंथाला प्रत्येकी ५० हजार रुपये पुरस्कार म्हणून प्रदान करण्यात आले.

संगीतकार यशवंत देव यांना गदिमा पुरस्कार

''नेमक्या आणि योग्य शब्दांच्या माध्यमातून ग. दि. माडगूळकर रसिकांच्या हृदयापर्यंत पोचत. त्यांचे शब्द नश्वर नाहीत. ते आजही आपल्या ओठांवर रुंजी घालतात. 'गदिमां'बरोबरच पु. ल. देशपांडे आणि सुधीर फडके या त्रिकुटाचा सहवास मला लाभला आणि जीवनच बदलले. त्यांची स्वरथोरवी खरोखरच शब्दांपलीकडची आहे...'' अशा शब्दांत संगीतकार यशवंत देव यांनी भावना व्यक्त केल्या. 'गदिमां'च्या ३५ व्या स्मृतिदिनानिमित्ताने देव यांना सांस्कृतिक विकास महामंडळाचे (चित्रपट रंगभूमी) व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते 'गदिमा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

तसेच माजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री राम नाईक यांना 'गदिमा स्नेहबंध पुरस्कार', संत साहित्याच्या अभ्यासिका डॉ. आरती दातार यांना 'गृहिणी सखी सचिव पुरस्कार', अभिनेता सुबोध भावे याला 'चैत्रबन पुरस्कार.' गायिका मधुरा दातार यांना 'विद्या प्रज्ञा पुरस्कार'; तर मिताली कुलकर्णी या विद्यार्थिनीला 'गदिमा पारितोषिक' प्रदान करण्यात आले.

देशमुख म्हणाले, ''गदिमा हे एक सुंदर स्वप्न होते. तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी मराठी माणसाला, संस्कृतीला भरभरून दिले.'' या वेळी प्रतिष्ठानचे विश्वस्त आनंद माडगूळकर, श्रीधर माडगूळकर, प्रकाशक सु. वा. जोशी उपस्थित होते.

शंभर कोटीची कमाई करणारे चित्रपट

इ. स. २०१२ हे वर्ष बॉलिवुडच्या चंदेरी दुनियेसाठी सोनेरी ठरले; कारण डझनभर सिनेमांनी १०० कोटींची कमाई केली. पाच वर्षांपूर्वी आमीर खानच्या 'गजनी'नं १०० कोटींची मजल गाठली. त्यानंतर प्रत्येक वर्षांत दोन-तीन सिनेमे हा आकडा पार करणारे निघाले.

या वर्षाच्या सुरुवातीपासून प्रदर्शित झालेल्या सिनेमांपैकी 'अग्निपथ', 'हाऊसफुल्ल २', 'रावडी राठोड', 'बोलबच्चन', 'एक था टायगर', 'बर्फी', 'सन ऑफ सरदार', 'जब तक है जान', 'ओह माय गॉड', आणि 'तलाश', या सिनेमांनी वर्ल्डवाइड १०० कोटींचा पल्ला गाठला. 'दबंग २' ने पहिल्याच आठवड्यात ६४ कोटींची कमाई केली. त्या अंदाजानुसार वर्ष संपायच्या आतच हा सिनेमा १०० कोटींच्या घरात पोहोचेल.

या बारा सिनेमांपैकी सगळ्यांत जास्त नफा सलमान खानच्या 'एक था

टायगर'नं मिळवला. फक्त भारतात या सिनेमानं १८७ कोटी रुपयांची तर जगभरात मिळून ३०७ कोटींची कमाई केली. याव्यतिरिक्त 'रावडी राठोड' आणि 'अग्निपथ' यांनीही भारतात दीडशे कोटीची रेषा पार केली.

१०० कोटी क्लबचे मानकरी

२००८ : गजनी

२००९ : ३ इडियट्स

२०१० : दबंग, गोलमाल ३

२०११ : रेडी, सिंघम, बॉडीगार्ड, रा वन, डॉन २

२०१२ : अग्निपथ, हाऊसफुल २, रावडी राठोड, बोलबच्चन, एक था टायगर, बर्फी, सन ऑफ सरदार, जब तक है जान, ओह माय गॉड, तलाश, दबंग २.

◗ महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समारंभ

''मराठी साहित्यात उत्कृष्टतेचा शिक्का असलेले वाङ्मय थोडेच आहे. पण विज्ञान आणि समाज यांच्या परस्परसंबंधांना कथा माध्यमातून व्यक्त करणे ही काळाची गरज आहे. मराठी साहित्याचे हे नवे दालन अधिक समृद्ध व्हावे.'' अशी अपेक्षा ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) च्या वतीने साहित्य जीवनगौरव पुरस्कार नारळीकर यांना आणि समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार ठाकूरदास बंग यांना देण्यात आले. बंग यांच्या वतीने डॉ. अभय बंग यांनी हा पुरस्कार स्वीकारला. करुणा गोखले, लीला आवटे, आनंद विंगकर, नीरजा यांना साहित्य पुरस्कार, जयंत पवार यांना नाट्यपुरस्कार आणि माधव बावगे, शिवाजी कागणीकर, बाळकृष्ण रेणके यांना समाजकार्य पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दिलीप चित्रे, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, मोहन धारिया, अभिनेते अतुल कुलकर्णी, डॉ नरेंद्र दाभोळकर, फाउंडेशनच्या अध्यक्षा शैला विद्वांस आदी उपस्थित होते.

''सामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचविण्यासाठीच विज्ञानकथा लिहिण्यास प्रवृत्त झालो. विज्ञान-तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर प्रभाव पडत असून, समाज आणि विज्ञान यांच्यातील दरी कमी करण्यासाठी लेखकांनी, माध्यमांनी पुढे यायला पाहिजे. स्वयंसेवी विज्ञान प्रसारक संस्थांच्या खांद्याला खांदा लावून राष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांनी या क्षेत्रात उतरावे. शास्त्रज्ञांच्या मूल्यमापनात भर पडल्यास त्यामुळे मोठ्या संख्येने शास्त्रज्ञ या क्षेत्रात उतरतील,'' असे प्रा. नारळीकर म्हणाले. विज्ञानतंत्रज्ञानाची घौडदौड सुरू असतानाच अंधश्रद्धाही फोफावत आहेत. फलज्योतिष, वास्तुशास्त्र, बुवाबाजीसारख्या गोष्टींमागे लोक धावत असून त्याला जीवनाची वाढती क्लिष्टता

हेच कारण आहे, असे ते म्हणाले.

''व्यक्तिगत प्रश्नांची उकल होणार नाही. अशी हतबलता स्त्री पुरुषांमध्ये येऊ लागली आहे. त्यामुळे सर्व सामाजिक चळवळींकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे.'' असे मत पुरस्कारार्थींनी व्यक्त केले.

पाडगावकर म्हणाले, ''ओल्ड इंडिया आणि यंग इंडिया या देशाच्या दोन स्थित्यंतरांचा सध्याचा तरुण साक्षीदार आहे. बलात्कारासारख्या घटना घडतात. त्यामुळे देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात बदल होण्याची गरज आहे.''

''पुरस्कार हे गाडीच्या ॲक्सेसरीजसारखे असतात. त्यामुळे गाडी पुढे नेण्यास आत्मविश्वास वाढतो. पुरस्कारामुळे देखील काम करण्यास धैर्य मिळते,'' असे कुलकर्णी म्हणाले.

करुणा गोखले म्हणाल्या, ''सध्या स्त्री-पुरुष समानतेची भूमिका घ्यावी लागते. स्त्री-पुरुषांतील अभिसरण वाढले आहे. नोकरीत वरिष्ठ, सहकारी तर राजकारणी अशी विविध अभिसरणे आहेत. त्यातून सुख-दुःखे देखील समोर येत आहे. स्त्री-पुरुषांची चळवळ निर्माण करण्याची गरज आहे. व्यक्तिगत प्रश्नांची उत्तरे सापडणार नाहीत, अशी हतबलता आल्याचे दिसते. त्यामुळे सामाजिक चळवळींकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे.''

साने गुरुजींची प्रेरणा घेऊन शिक्षण सर्वत्र पोहोचविण्याचा वसा घेण्याचा प्रयत्न करून, बेळगाव जिल्ह्यातील प्रत्येक गावात गोबरगॅसचा प्रकल्प राबविला, असे शिवाजी कागणीकर यांनी सांगितले.

'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाला पुरस्कार मिळाल्याबद्दल जयंत पवार म्हणाले, ''स्वत:वरील ओझे उतरविण्यासाठी आपल्याला लेखन हा पर्याय वाटतो. मात्र एक ओझे दूर झाले तरी अन्य ओझी भुतासारखी पाठलाग करीत असतात. लेखक समाजाकडून जेवढे घेतो, त्या तुलनेत समाजाला किती देतो हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे लेखक होण्याचे फायदे घेऊ नयेत.''

बाळासाहेब रेणके यांनी भटक्या जातीजमातींच्या कथा, संघर्षाच्या कहाण्या सांगितल्या. नीरजा यांनी पुस्तकासह कवितेच्या प्रवासाबद्दल सांगितले. बावगे, विंगकर यांनीही मनोगते व्यक्त केली. विनोद शिरसाठ यांनी सूत्रसंचालन केले. सुनील देशमुख यांनी पुरस्कार देण्यामागची भूमिका मांडली.

◗ शंकर सारडा यांना साहित्यविषयक माहेश्वरी रत्न पुरस्कार

मराठीतील नामवंत समीक्षक शंकर सारडा यांना त्यांच्या गेल्या साठ वर्षांतील वाङ्मयीन योगदानाबद्दल माहेश्वरी रत्न पुरस्कार व्हिडिओकॉनचे अध्यक्ष वेणूगोपाल

धूत यांच्या हस्ते १३ जानेवारी रोजी ठाणे येथे प्रदान करण्यात आला.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माहेश्वरी समाजातील व्यक्तींचा कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने माहेश्वरी रत्न पुरस्कार वितरण उपक्रम प्रथमच सुरू करण्यात आला आहे. उद्योग, कला, क्रीडा, सामाजिक कार्य, साहित्य, आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तींची निवड करण्यात आली. 'सन्मानचिन्हा'सह व्हिडीओकॉनच्या वतीने 'एलसीडी टीव्ही' असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या कार्यक्रमाला 'लोकमत'चे माध्यम प्रायोजकत्व लाभले होते.

निवड समितीत व्हिडीओकॉन ग्रुपचे चेअरमन प्रसिद्ध उद्योगपती वेणुगोपाल धूत, आनंद राठी, फ्युचर ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर बियाणी, केईसी इंटरनॅशनलचे मॅनेजिंग डायरेक्टर रमेश चांडक, रिलायन्स कॅपिटलचे मुख्य निवेश अधिकारी मधुसूदन केला, बिट्स पिलानीचे पूर्व व्हाईस् चॉन्सेलर एल. के. माहेश्वरी आदींचा समावेश होता.

मुळातच सर्व ठिकाणी माहेश्वरी समाजातील व्यक्ती अग्रेसर असतात. मात्र, आज आपल्याच माणसांतून उत्तम रत्ने शोधून त्यांचा सत्कार करण्यात येतो आहे, याचा सुखद आनंद आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमातून माहेश्वरी समाज संघटित होत आहे असे मत धूत यांनी व्यक्त केले.

भगवान शंकर, पार्वती आणि गणेशाची आराधना करणारे नृत्य सादर करण्यात आले. तसेच युवा कलाकारांनी नृत्ये सादर केली.

या कार्यक्रमाला युनियन बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर सुहास मुंदडा, केतन राडिया, लोकमत मीडिया ग्रुपचे ओमप्रकाश केला, अखिल भारतीय अध्यक्ष संजीव चांडक व महासभेचे अध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, प्रमोद कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजातील तरुण पिढीपुढे एक आदर्श निर्माण व्हावा आणि जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळावी या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे असे महाराष्ट्र प्रवेश माहेश्वरी युवा संगठनचे अध्यक्ष अणि आयोजक मनीष मुंदडा यांनी सांगितले.

माहेश्वरी रत्न पुरस्काराचे मानकरी

साहित्य आणि कलाक्षेत्र - साहित्यिक शंकर सारडा, पुणे

महिलांसाठी विशेष कार्य - डॉ सूर्यकांता अजमेरा, धुळे

सरकारी/सार्वजनिक कार्य - समीर बजाज, मुंबई

खाजगी सेवा - दामोदर मल, मुंबई आणि बी. आर. जाजू, मुंबई

क्रीडा क्षेत्र - संदीप दहाड, औरंगाबाद

मनोरंजन - सुभाष काबरा, मुंबई

सामाजिक सेवा - विजय राठी, लातूर आणि डॉ. ईश्वरप्रसाद गिलडा, लातूर

१५० कोटींपर्यंत व्यवसाय करणारे उद्योजक - अशिष मंत्री, जालना
१५० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय करणारे उद्योजक - कैलाश लोया, जालना
ग्रामीण उद्योजक - राजेंद्र मुंदडा, उस्मानाबाद
जीवनगौरव पुरस्कार - समाजसेवक रामनारायण काबरा, नांदेड

विद्या बाळ यांना जीवनगौरव पुरस्कार

सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा स्त्री-पुरुष समानतेसाठी लढणाऱ्या विद्या बाळ यांना प्रदान करण्यात आला.

रेशनिंग कृती समितीचे सुरेश सावंत यांना एस. एम. जोशी कार्यकर्ता पुरस्कार, तर समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते मिलिंद चव्हाण यांना डॉ. राम आपटे प्रबोधन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

१५ हजार रुपये रोख व सन्मानपत्र असे जीवनगौरव पुरस्काराचे, तर रोख दहा हजार रुपये व सन्मानपत्र असे अन्य दोन पुरस्कारांचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमास कृतज्ञता निधीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा भावे, अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी वगैरे उपस्थित होते. त्यापूर्वी चळवळीतील पूर्ण वेळ कार्यकर्ते आणि पुरस्कारार्थी यांच्या संवादाचा कार्यक्रम आयोजित आला होता.

मुक्त विद्यापीठाच्या पुरस्कारांचे वितरण

महिलांवरील अत्याचाराबाबत सध्या देशभरात चर्चा होत आहे. परंतु, हे अत्याचार, भ्रष्टाचार व इतर सामाजिक प्रश्न समूळ नष्ट करण्याची ताकद स्त्रियांमध्येच आहे. त्याकरिता स्त्रीने प्रथम स्त्रीच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे, असे प्रतिपादन अभिनेत्री व दिग्दर्शक स्मिता तळवलकर यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात केले.

या सोहळ्यास मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, श्याम पाडेकर आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते रुक्मिणी पुरस्कार चंद्रकांत गायकवाड, सोपान सोनार यांना, विशाखा पुरस्कार प्रशांत असनारे, कल्पना दुधाळ, विलास पगार यांना तर श्रमसेवा पुरस्कार डॉ. रूपा कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

''अनेकदा घरातच दोन स्त्रिया एकमेकींना साथ देत नाहीत. एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला नातं बदलल्यावर सन्मान देते का याचा विचार केला पाहिजे. मग समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात आवाज कसा उठविता येईल.'' असा प्रश्न या वेळी तळवलकर यांनी उपस्थित केला. संस्कृतीला महत्त्व देणे गरजेचे आहे.

समाजात घडणाऱ्या बऱ्या-वाईट घटनांबद्दल महिलांनी जागरूक राहून उच्च-नीच श्रीमंत-गरीब असा भेदभाव न करता सर्व स्तरातील घटकांना सोबत घेऊन आवाज उठविण्याचे आवाहन केले.

दुबळ्या महिलांना सबळ करण्याचा संकल्प प्रत्येक महिलेने करावा, असे आवाहन या वेळी पवार यांनी केले.

सोहळ्यात कुसुमाग्रज अध्यासनातर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील डॉ. अनंता सूर, प्रा. तुषार चांदवडकर, सुप्रिया पेंढारी व मंगला आहिरे यांना गौरविण्यात आले.

◗ वाग्यज्ञे पुरस्कार

कवी स्वत:च्या आनंदासाठी कविता लिहीत असला, तरी त्याच्या मनातील रंगमंचावर समाज असतो. या समाजातील शेकडो माणसांशी बोलून तो कविता लिहितो. त्यामुळे ती कविता सगळ्यांचीच होते. एका अर्थाने कविता म्हणजे माणसाचं प्रकटन असते, असे मत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी साहित्यिक कलावंत संमेलनामध्ये व्यक्त केले. त्यांच्या हस्ते कवी-गीतकार संदीप खरे आणि संगीतकार सलील कुलकर्णी यांना वाग्यज्ञे पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रत्येकी अकरा हजार रुपये, पुणेरी पगडी, उपरणे, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. उद्योजक किसन राठोड आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, ''पुरस्कार मिळाल्याने साहित्यिक आणि कलावंत मोठा होतो, असे मी मानत नाही. समाजाच्या रसिकतेचे आणि कृतज्ञ भावनेचे प्रतीक या पुरस्कारामागे सामावलेले असते. त्यामुळे पुरस्काराने जसे साहित्यिक आणि कलावंतांना बळ मिळते तसे चांगली कविता आणि साहित्य माणसाला जगण्याचे बळ देते. सध्या अन्याय, अत्याचाराचे प्रमाण वाढले असून जगणं असह्य झाले आहे, तरी माणूस पेटून उठत नाही आणि पेटून उठला तरी तीन दिवस टिकत नाही. तर दुसरीकडे सामान्य माणूस सहनशील झाला आहे. शहरामध्ये आपल्याला मिळणारी सुखे ही कुणाच्या तरी शोषणावर बेतलेली असतात. आपण इतके स्वयंकेंद्रित झालो आहोत की आपल्याला सामाजातील दु:खे दिसत नाहीत, हे वास्तव आहे.''

संदीप खरे म्हणाले, ''चौथीमध्ये असल्यापासून मी कविता लिहीत आहे. कविता ही माझी गरज झाली असून ती माझ्या जगण्याचा भाग झाली आहे. ही नितांत एकटेपणाची यात्रा असली, तरी मी जे लिहिले जे सगळ्यांना आपलेसे वाटले.''

डॉ. सलील कुलकर्णी म्हणाले, ''भावसंगीतातून शब्द आणि सूर वेगळे काढताच येत नाही. सध्या प्रत्येक गोष्टीची 'इव्हेंट' होत असताना गाणं आणि कविता ही बघण्याची गोष्ट आहे की काय असा प्रश्न पडतो. मी आणि संदीप, आम्ही कोणत्याही संगीत घराण्याचे नाही. किंवा कोणत्याही कॅसेट कंपनीने आम्हाला दत्तक घेतलेले नाही. आम्ही रसिकांनी घडविलेले कलाकार आहोत. शब्दसुरांची गळाभेट झाल्याखेरीज उत्तम गीत होऊ शकत नाही. त्यामुळे हा पुरस्कार म्हणजे शब्दांनी सुरांना दिलेला आशीर्वाद आहे, अशीच माझी भावना आहे.''

◗ 'प्रिझम - एक हरविलेले इंद्रधनुष्य'ला पारितोषिक

पुणे येथील सीमलेस एज्युकेशन आयोजित राष्ट्रीय पातळीवरील दुसऱ्या लघुपट महोत्सवात सातारा परिसरातील युवकांनी बनविलेल्या 'प्रिझम - एक हरविलेले इंद्रधनुष्य' या लघुपटास प्रथम पारितोषिक मिळाले. राष्ट्रीय फिल्म संग्रहालयात २९ डिसेंबरला झालेल्या फिल्म महोत्सवात हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला.

इस्लामपूर येथील संदीप माने याने लघुपटाचे कथालेखन व छायांकन केले आहे. कवठे (ता. वाई) येथील अमोल डेरे - पाटील याने लघुपटाचे दिग्दर्शन केले आहे. तर आर्वी (ता. कोरेगाव) येथील महेश जाधव याने कला दिग्दर्शन व ध्वनिमुद्रण केले आहे. साताऱ्यातील या युवकांनी कोणत्याही तांत्रिक शिक्षणाविना यश संपादन केले आहे. देऊळ, कमिने, चिल्लर पार्टी फेम शशांक शेंडे यांनी या लघुपटात काम केले आहे. दिग्दर्शक श्रीरंग उमराणी यांनी संगीत दिले आहे. हा लघुपट ग. चि. ठोंबरे आणि पांडुरंग माने यांनी निर्मित केला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर आणि ज्येष्ठ चित्रपट समीक्षक समर नखाते हे परीक्षक होते. ऑस्करला गेलेल्या 'होऊ दे जरा उशीर' या चित्रपटाचे दिग्दर्शक वसीम मणेर आणि अभिनेत्री देविका दफ्तरदार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

◗ विजया मेहता यांना चतुरंग पुरस्कार

''नाटक ही प्रेक्षकांना जोडणारी कला आहे. सिनेमात तसे काही होत नाही. म्हणूनच विजयाबाईंनी नाट्यकलेसाठी काम केले याचा मला अभिमान वाटतो,'' अशी दाद कवी गुलजार यांनी ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहता यांचा गौरव करताना दिली. चतुरंग प्रतिष्ठानतर्फे एक लाख रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात आला. नाट्यक्षेत्रात काम करताना, मी जे रसायन तयार केले ते आजही कायम आहे, याचा मला अभिमान वाटतो. जी पात्रे रंगमंचावर आणली त्या पात्रांनी जगाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. आज झालेला सत्कार हा नाट्यकलेचा

सत्कार आहे अशा शब्दांत विजयाबाईंनी सत्कारास उत्तर दिले.

विजयाबाईंचा गौरव करताना गुलजार यांनी कुसुमाग्रजांची 'अभिनेता' ही कविता रसिकांसमोर सादर केली. विजयाबाईंनी एकदा घेतलेल्या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांमुळे मी कोण आहे, याचा मला उलगडा झाला, असेही गुलजार यांनी सांगितले. तर, ''ज्या काळात विजयाबाई घडल्या तो रंगमंचाचा मंतरलेला काळ होता. विजया मेहता आणि विजय तेंडुलकर एकत्र आले तो रंगभूमीच्या दृष्टीने भाग्ययोग ठरला.'' असे मत विजया राजाध्यक्ष यांनी मांडले.

◗ डॉ. सुधा मूर्ती यांना चारित्र्य पुरस्कार

'चारित्र्य प्रतिष्ठान'च्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार बेंगळुरू येथील डॉ. सुधा मूर्ती यांना राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांच्या अध्यक्षतेखाली परराष्ट्र मंत्रालयाचे अप्पर सचिव विजयकांत कोठारी यांच्या उपस्थितीत वीस जानेवारीला टिळक स्मारक मंदिरात देण्यात झाला.

◗ 'सावळारामदास' पुरस्काराचे वितरण

बहुजन विकास महासंघाद्वारे देण्यात येणारा 'सावळारामदास गौरव पुरस्कार' ज्ञानेश्वर सावळे, निवृत्ती गायकवाड, सुदाम तापकीर, सपंत जाधव, मोहनदास यांना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भांडे यांच्या हस्ते देण्यात आला.

◗ 'वारकरीरत्न' पुस्तकाला पुरस्कार

विठ्ठलबुवा चौधरी यांच्या जीवनकार्यावर आधारित मुक्ता गरसोळे लिखित 'वारकरीरत्न मोठेबुवा' या पुस्तकाला दहा हजार रुपयांचा पुरस्कार सोनोपंत दांडेकर संत वाङ्मय प्रसारक मंडळातर्फे देण्यात आला. भूगोलतज्ज्ञ डॉ. सुरेश गरसोळे प्रमुख पाहुणे होते.

◗ कोत्तापल्ले यांना काकासाहेब गाडगीळ पुरस्कार

यंदाचा 'काकासाहेब गाडगीळ साहित्य पुरस्कार' साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांना ८ जानेवारी रोजी अनंत गाडगीळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त 'फेसबुकच्या जमान्यातील मराठी साहित्य' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. कोत्तापल्ले, ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक संदीप वासलेकर यामध्ये सहभागी झाले होते.

◈

नोमॅड

पाश्चात्य जगातील जिहादी मुस्लिमांच्या मानसिकतेचा शोध

आयान हिरसी अली

अनुवाद : **प्राजक्ता चित्रे**

पृष्ठे **२७६** । किंमत **२८०/-रु.** । सभासदांना सवलतीत

सोमालियातील आयान हिरसी अली या तरुणीला देशान्तर करून हॉलंडमध्ये आश्रय घ्यावा लागतो. तेथे ती भाषांतरकार-दुभाषी म्हणून काम करू लागते. नवविचारांनी भारावून आयुष्याची नव्याने घडी बसवू लागते. त्याविषयी तिने लिहिलेले 'इन्फिडेल' हे आत्मकथन खूप गाजले. पुढे ती अमेरिकेत स्थलांतर करते. ९/११च्या घटनेनंतर इस्लामचा त्याग करते, त्यामुळे तिचे कुटुंबीय तिच्याशी संबंध तोडतात. पाश्चिमात्य समाजाशी समरस होताना तिला आपल्या पूर्वायुष्यातील श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्याशी जबरदस्त संघर्ष करावा लागतो. त्याची ही प्रांजल कथा आपल्याला जीवनाचे नवे भान देते. तिच्या या कथेमागची भूमिका स्पष्ट करणारा एक उतारा.

जन्मभर मी एक भटकी म्हणून जगले. कुठलीच मुळे नसलेली एक भटकी! जिथे कुठे मी स्थिरावायचा प्रयत्न केला, तिथून मला पळून जाणे भाग पडले. अनिश्चितता, अस्थिरता हा जणू माझा स्थायिभावच बनला.

सोमालियातील मोगादिशू येथे १९६९ मध्ये माझा जन्म झाला. माझे वडील तिथल्या क्रूर हुकूमशाही राजवटीचे राजकीय विरोधक होते. मी अगदी लहान असतानाच त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. तिथून पळून जाऊन ते काही काळ अज्ञातवासात होते. मी आठ वर्षांची असताना, आम्हा सर्व भावंडांना घेऊन, त्यांच्यासोबत राहण्यासाठी आई सौदी अरेबियाला पोचली. तिथून एका वर्षातच आमची हकालपट्टी झाली आणि आम्ही इथिओपियाला गेलो. हे तर माझ्या वडिलांच्या विरोधकांचे मुख्य केंद्र होते. साधारण अठरा महिन्यांतच आम्हाला केनियाला परतावे लागले. प्रत्येक नव्या देशात पूर्णपणे नवी भाषा आणि भिन्न संस्कृती यांना कोणत्याही पूर्वतयारीशिवाय तोंड द्यावे लागे. प्रत्येक वेळेस बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा माझा प्रयत्न असे. एका अगतिक मुलीचे हे प्रयत्न निष्फळ ठरत असत. या सगळ्यात एक न बदलणारी, कायमस्वरूपी गोष्ट म्हणजे, माझ्या आईची इस्लामवरील अपार श्रद्धा.

मी अकरा वर्षांची असताना वडील आम्हाला केनियात सोडून निघून गेले. मी एकवीस वर्षांची झाले तेव्हा पुन्हा त्यांना बघितले. त्या दरम्यान एका शिक्षकांच्या प्रभावामुळे मी एक कट्टर, धर्मनिष्ठ मुसलमान झाले होते. १९९१ साली मी आठ महिन्यांसाठी सोमालियात परतले. तिथल्या यादवी युद्धाचा उद्रेक मी बघितला. त्या वेळी झालेल्या अमानुष हत्याकांडामध्ये साडेतीन लाख लोक मरण पावले आणि निम्म्या देशाची वाताहत झाली.

कॅनडात टोरांटो येथे राहणाऱ्या आणि मला अपरिचित असणाऱ्या एका नातेवाईकाशी लग्न करायची आज्ञा मला वडिलांनी दिली. त्यानुसार मी कॅनडाला

जायला निघाले. मात्र, कॅनडाचा व्हिसा घेण्यासाठी जर्मनीला जाण्याऐवजी मी वेगळाच मार्ग निवडला. ती एक अंत:प्रेरणा होती. तिने मला हॉलंडची ट्रेन पकडायला भाग पाडले. माझ्या आजपर्यंतच्या प्रवासातील सर्वांत धाडसी प्रवास होता तो! माझे वडील आणि सगळाच गोतावळा मी पळून गेल्यावर काय करतील, या विचारानेच मला धडकी भरली होती.

लोकांमधला चांगुलपणा मी हॉलंडमध्ये अनुभवला. मी त्यांची कोणीच नव्हते; तरीही त्यांनी मला खाऊपिऊ घातले, राहायला घर दिले. यापूर्वी मी ज्या देशांमध्ये राहिले होते, त्यापेक्षा हॉलंड फार वेगळा देश होता. शांतता, सुबत्ता, स्थैर्य देणारा; उदार आणि अतिचांगल्या लोकांचा देश. मी डच भाषा शिकले, तेव्हा माझ्या मनात एका महत्त्वाकांक्षेचा जन्म झाला – या देशाच्या यशाचे रहस्य शोधून काढायचे, त्यासाठी राज्यशास्त्राचा अभ्यास करायचा. मी ज्या ज्या मुस्लीम राष्ट्रांत राहिले होते, ते देश भ्रष्ट, हिंसक आणि आत्मकेंद्रित समाजाने पोखरलेले होते. याउलट देवाधर्माचे, कर्मकांडाचे कसलेही स्तोम नसणारा हा देश किती सुखी, संपन्न, यशस्वी होता, याचे रहस्य जाणून घ्यायचेच, ही खूणगाठ मी मनाशी बांधली.

तिथल्या विद्यापीठातल्या शिक्षणामुळे मला बऱ्याच गोष्टी कळल्या. पण या दरम्यान माझ्या मनाची स्थिती दोलायमान होती. या शिक्षणामुळे मिळणारी जगाबद्दलची समज खरी, की अल्लापुढे शरण जाण्याची धार्मिक शिकवण खरी? धर्माज्ञा न पाळून आपण गुन्हा तर करत नाही ना, अशी भीती मला सतत वाटायची. पुढे डच सोशल सर्व्हिसमध्ये डच–सोमाली भाषांतरकार म्हणून मी काम करू लागले. याचा फायदा मला विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी झाला. त्या दरम्यान मी अनेक संकटग्रस्त मुसलमान लोकांना भेटले. पीडित स्त्रियांची आधारगृहे, त्यांच्यासाठी चालवले जाणारे विशेष शैक्षणिक वर्ग, तुरुंग अशा अनेक ठिकाणी हे लोक मला भेटायचे. या स्त्रियांची दयनीय अवस्था, त्यांचे वैचारिक पारतंत्र्य, त्यांच्यावर होणारे जुलूम याचे मूळ त्यांच्या इस्लामवरील कडव्या निष्ठेत होते, हे मला दिसत असूनही मी त्याकडे दुर्लक्ष केले.

मात्र अमेरिकेवर ओसामा लादेनने केलेल्या ९/११च्या हल्ल्यानंतर मला माझ्या डोळ्यांवरची झापडे काढणे भाग पडले. हे खरे तर फारच उपरोधात्मक आहे. इस्लाम धर्म न पाळणाऱ्या 'काफर' लोकांचा संहार, ते निरपराध असले तरी, कुराणाला मान्य आहे, हा त्याचा दावा होता. या धर्मांधतेकडे दुर्लक्ष करणे मला अशक्य झाले. या दुष्कृत्यासाठी त्याने कुराणाचा घेतलेला आधार खरा आहे, हे कुराण वाचल्यावर मला कळले. या घटनेमुळे इस्लाम धर्माशी माझी फारकत झाली. खरेतर, मी केव्हाच त्यापासून दूर गेले होते.

जेव्हा मी या गोष्टी खुलेपणाने बोलू लागले, तेव्हा मला जीवे मारण्याच्या धमक्या मिळू लागल्या. त्याच दरम्यान डच लोकसभेच्या लिबरल पार्टीची सदस्या होण्याबद्दल मला विचारले गेले. जेव्हा मी सदस्य झाले, तेव्हा अंगरक्षकांबरोबर

सर्वांचे लक्ष वेधले गेले. ही सुरक्षाव्यवस्था फक्त मला होती; माझ्या मित्रांना– सहकाऱ्यांना नव्हती. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. इस्लाम धर्म स्त्रियांना कसा पायदळी तुडवतो, हे दाखवणारा सिनेमा, दिग्दर्शक थिओ व्हॅन गॉग याच्यासोबत मी बनवला. त्याच्यानंतर मोरोक्कोत जन्मलेल्या आणि ॲमस्टरडॅमला राहणाऱ्या एका सव्वीस वर्षांच्या कडव्या मुस्लीम युवकाने त्याचा खून केला. या सर्व घटनांचा उल्लेख मी 'इन्फिडेल' मध्ये केला आहे. मी खूप सुदैवी आहे, असे त्यात म्हटले आहे. पारंपरिक रीतिरिवाजांचे गुलाम म्हणून टोळ्यांमध्ये आयुष्य जगण्यापासून माझी सुटका झाली. स्त्री आणि पुरुष दोघांनाही नागरिक म्हणून समान वागणूक देणाऱ्या समाजात मी जगते आहे, हे खरेच माझे भाग्य.

'इन्फिडेल' लिहिताना मी माझ्या लहानपणाच्या अस्वस्थ करणाऱ्या घटनांचे वर्णन केले आहे. माझ्या आईचा संतापी स्वभाव, वडिलांचे सतत घराबाहेर असणे, हुकूमशाही राजवटीचा लहरीपणा; रोगराई, नैसर्गिक आपत्ती आणि युद्ध यांच्याशी सतत सामना हे सगळे माझ्या लहानपणाच्या आठवणींशी निगडित होते. जेव्हा मी हॉलंडमध्ये गेले; तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा मला सभ्य, सुसंस्कृत समाजाचे दर्शन घडले. हा समाज एखाद्या घराण्याच्या हुकमानुसार नाही, तर लोकांनी निवडून दिलेल्या सरकारी यंत्रणेनुसार चालत होता, हे माझ्या लक्षात आले.

मात्र *'इन्फिडेल'* मधील ही सगळी वर्णने वरवरची होती. माझ्या मानसिक जाणिवांच्या प्रवासाला मी फक्त स्पर्श केला होता. नव्या जगात प्रवेश केल्यावर ते जगणे शिकताना मी टाकलेल्या पावलांचा, इस्लाम धर्माबद्दल मला पडलेल्या प्रश्नांचा ऊहापोह मी त्यात केला आहे.

जेव्हा मी *'इन्फिडेल'* लिहीत होते, तेव्हा मला वाटले की, आता माझा प्रवास संपला. हॉलंडसारख्या संपन्न देशात आता माझी मुळे रुजली आहेत, इथून आपल्याला कोणी बाहेर काढू शकत नाही, याबद्दल मी नि:शंक होते. पण पुन्हा मी खोटी ठरले. मला तिथूनही जावे लागले. मी अमेरिकेला प्रस्थान केले. एक सुरक्षित स्वतंत्र आयुष्य जगण्याची स्वप्न उराशी बाळगून अमेरिकेत पाऊल टाकणार!या अनेकांपैकी मी एक! माझ्या संघर्षमय जगण्यापासून हे आयुष्य हजारो मैल दूर होते. 'नोमॅड' हे पुस्तक माझ्या अमेरिकेला स्थलांतर करण्याच्या निर्णयाबद्दल आहे.

*इन्फिडेल*च्या जगभरातील वाचकांनी मला खूपच पाठिंबा दिला. मात्र त्यांनी

विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यात नव्हती. माझ्या इतर नातेवाईकांबद्दल, इतर मुस्लीम स्त्रियांच्या अनुभवांबद्दल ते विचारत. 'तुमचा अनुभव कितपत प्रातिनिधिक आहे', हा प्रश्न मला पुन्हापुन्हा विचारला गेला. *'नोमॅड'*मध्ये या प्रश्नाचे उत्तर आहे. हे फक्त माझ्या एकटीच्या पाश्चिमात्य जगातल्या भटकंतीचे वर्णन नाही, तर माझ्यासारख्या हजारो स्थलांतरित लोकांच्या जगण्याचे वर्णन आहे. एका प्रगत समाजातही पारंपरिक चौकटीत घुसमटत आयुष्य जगणाऱ्या स्त्रियांच्या समस्या यात मी विशेषकरून मांडल्या आहेत. मी आणि माझ्यासारखे लाखो जण ज्या सांस्कृतिक संघर्षात जगले आणि अजूनही जगतात, त्याबद्दलचे हे पुस्तक आहे.

अमेरिकेत गेल्यावर परत पहिल्यापासून एका नव्या देशात बस्तान बसवायला मी सुरुवात केली. याच सुमारास माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. नवीन देश, त्यात वडिलांचा मृत्यू याचा सर्वंकष परिणाम माझ्या मनावर झाला. मला तीव्रपणे घराची आठवण येऊ लागली. मी माझ्या विस्तारित कुटुंबाला शोधू लागले. माझी आत्ते-मामे भावंडे, माझी सावत्र बहीण हे युरोप-अमेरिकेत व इतरत्र राहत होते. हे सगळेच दुर्दैवाने अस्थिर जगणे जगत होते, हे माझ्या लक्षात आले. एकीला एडस् झाला आहे, तर दुसरीला नवऱ्याच्या खुनाच्या आरोपाखाली अटक झाली आहे आणि तिसरा आपले सगळे पैसे सोमालियातील कुटुंबासाठी पाठवतोय, असे चित्र मला दिसले. हे सगळेच माझ्या जमातीवर आणि अल्लावर निस्सीम श्रद्धा असणारे होते. ते कायमचे पाश्चिमात्त्य नागरिक म्हणून जगत असले, तरी फक्त शरीराने! त्यांचे मन दुसरीकडे होते – त्यांच्या जन्मस्थानी. सोमालियातील कधीच अस्तित्वात नसलेल्या शांत, आनंदी जीवनाची ते स्वप्ने बघत असत. हे सगळे जण दुसऱ्या मातीत कधीतरी रुजतील का, हा प्रश्न मला पडला. याचे उत्तर मी शोधले. हे सारेही मी *नोमॅड*मध्ये मांडले आहे.

तुम्हाला वाटेल; प्रत्येक संस्कृतीत, धर्मात अशी विस्कळीत कुटुंबे असतात. त्यात विशेष काय? हे खरेही आहे. अशा वाताहात झालेल्या ज्यू आणि ख्रिश्चन कुटुंबांवर हॉलिवूडमध्ये चित्रपट बनवले गेले. त्यांनी लोकांची करमणूक केली. मात्र विस्कळीत मुस्लीम कुटुंब हा एका वेगळा विषय आहे. पाश्चिमात्य जगासाठी ते एक मोठे आव्हान आहे, एक मोठा धोका आहे.

मानवी मूल्यांची जडणघडण कुटुंबात होते. कुटुंबातच मुलांवर संस्कार होतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे रीतिरिवाजांचा, संस्कृतीचा वारसा चालू राहतो. म्हणूनच कट्टर इस्लामी तत्त्वांना बळी पडणाऱ्या तरुण मुसलमान वर्गाला समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्या कुटुंबव्यवस्थेला समजून घेणे आवश्यव आहे. सौदी अरेबिया, इजिप्त यांसारख्या देशांतील मशिदी मदरशांमध्ये तयार होणारी

षड्यंत्रे याच कुटुंबांच्या माध्यमातून युरोप–अमेरिकेतल्या घरांमध्ये पोचतात.

इस्लामी आणि पाश्चात्त्य या दोन भिन्न सांस्कृतिक संघर्षातून आपण जातआहोत, असे युरोप–अमेरिकेतल्या बऱ्याच लोकांचे म्हणणे आहे. परंतु मूठभर कडव्या मुसलमान लोकांना हे इस्लामने पुकारलेले धर्मयुद्ध वाटते. पाश्चात्त्य संस्कृतीविरुद्ध त्यांनी एक पवित्र धार्मिक युद्ध जिंकण्याचा निर्धार केला आहे. सर्व मुस्लीम राष्ट्रात त्यांना परत धर्माधिष्ठित राज्यपद्धती रुजवायची आहे. सर्व जगभरच त्यांना अशी धार्मिक सत्ता हवी आहे. अतिरेकी कारवाया करणारे आपले मुस्लीम बांधव हे पाश्चात्त्य देशांतील मुसलमानांवर होणाऱ्या अन्यायाला प्रत्युत्तर देत आहेत, असे मानणारा एक मोठा गट युरोप–अमेरिकेत आहे. (मुसलमानांवरील अन्यायाचे विशेष पुरावे नसतानाही, स्थलांतरित मुसलमानांची ही विशेष धारणा आहे आणि पुरोगामी लोक त्याला चिथावणी देत आहेत.) या पाश्चात्त्य देशांत आपला छळ होईल, या भावनेनेही मुस्लीम कुटुंबे तिथल्या समाजापासून अलिप्त अशी आपापल्या कबिल्यात राहतात. अशा वस्त्यांमध्ये कडवे इस्लामी प्रतिनिधी त्यांच्या मनात इतरांबद्दल द्वेषभावना रुजवतात, जोपासतात. यातूनच त्यांना धर्मयुद्धासाठी बलिदान करायला तयार असणारे जिहादी मिळतात. स्थलांतरित कुटुंबातील असमाधानी दिशाहीन, निष्क्रीय तरुण शहीद होण्यासाठी अगदी अचूक लक्ष्य असतात. इस्लामी देशांतून स्थलांतरित होणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत आहे. इतरांच्या तुलनेत त्यांच्या संततीचे प्रमाणही अधिक आहे. म्हणूनच त्यांच्या आक्रमकतेच्या धोक्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

मी त्यांच्यातलीच एक असल्यामुळे या समस्येचे स्वरूप मला माहीत आहे. मी आणि माझी भावंडे अशाच कौटुंबिक वातावरणात जन्मलो, वाढलो. *नोमॅड*मध्ये मी या सगळ्याचे विश्लेषण केले आहे. माझ्या कौटुंबिक वर्तुळातील अगदी निकटची माणसे म्हणजे माझे आईवडील, त्यांचे एकमेकांमधील आणि मुलांमधील नात्यातले अपयश, त्यांची पालकत्वाची धारणा, स्वत:च्या अस्तित्वाबाबतचा संभ्रम, हिंसा आणि धर्म यांचा आमच्या कुटुंबावर असणारा चुकीचा पगडा, या साऱ्याचे वर्णन मी या पुस्तकात केले आहे.

कधी कधी मला असे वाटते की, वडिलांनी आम्हाला केनियात सोडले नसते, तर मी काय केले असते? ते तिथेच राहिले असते, तर लहान वयातच माझे लग्न झाले असते. चांगल्या आयुष्याच्या शोधात अशी पळून जायची संधी मला मिळाली नसती. आम्ही सोमालिया सोडले नसते किंवा आईचे ऐकून त्यांनी मला घरीच ठेवले असते, तर सगळेच चित्रच बदलले असते. बंडखोरीचे बीज माझ्या मनात रुजलेच नसते. मी ज्या परिस्थितीत वाढत होते, त्यापेक्षा आपण वेगळे आयुष्य जगायचे आहे, हा विचार माझ्या मनात तेव्हाच पक्का झाला

होता. परिस्थिती आणि त्यानुसार घ्यावे लागणारे निर्णय बरेचदा माझ्या हातात नव्हते.तरीही मागे वळून बघितल्यावर माझ्या लक्षात येते की, माझ्या आयुष्यावर पकड येण्याजोग्या संधीही मला मिळाल्या.

सुरुवातीला मी संभ्रमावस्थेत जगत होते. पाश्चिमात्त्य संस्कृतीतली आधुनिकता, त्यातून मिळणारा आत्मविश्वास हा माझ्या वरवरच्या जगण्याचा भाग होता. मात्र मी ज्या मूल्यव्यवस्थेत वाढले, त्यातील परंपरांचे बोट मी सोडत नव्हते. माझ्या व्यक्तिमत्त्वाचा मूळ गाभा अजूनही तसाच होता. अशा प्रकारे दुहेरी जगणे माझी प्रगती खुंटवणारे होते. ही वस्तुस्थिती आत्मसात करणे मला खूप कठीण गेले. माझ्या वडिलांना मी सोडले, तर माझ्या मागे त्यांना आमच्या समाजाकडून होणारी निंदानालस्ती सहन करावी लागेल, या विचाराने मी अस्वस्थ होते. आपण इस्लामचा त्याग केला; तर आपल्या आईवडिलांना, इतर नातेवाईकांना काय काय भोगावे लागेल, या विचाराने माझा इतका मानसिक छळ व्हायचा की, कधी कधी वाटायचे, बस्स! त्यापेक्षा आपण आपल्या वैयक्तिक आशाआकांक्षांची राखरांगोळी करावी. निदान माझी माणसे तरी शांततेने जगतील. कमकुवत करणारे असे कितीतरी क्षण माझ्या आयुष्यात येऊन गेले. माझ्या भटकंतीचा हा प्रवास अशा अनेक मानसिक स्थित्यंतरांचा प्रवास आहे. अगदी हॉलंड ते अमेरिका हा प्रवासही त्याला अपवाद नाही. अमेरिकेला जाताना मी फक्त हजारो मैल ओलांडले नाहीत, तर शेकडो वर्षांचा काळ ओलांडला आहे. असंस्कृत, मागास अशा आफ्रिकी देशांतील टोळ्यांपासून ते सुसंस्कृत नागरिकांच्या देशांपर्यंतचा म्हणजे युरोप–अमेरिकेपर्यंतचा हा प्रवास होता. यापासून पार पडताना मला अनेक अडचणींतून, निराशेच्या प्रसंगांतून जावे लागले. मी खूप काही शिकले. माझ्यासाठी असंस्कृत जमातीतल्या आयुष्याचा त्याग करून सुसंस्कृत नागरिक म्हणून जगायला सुरुवात करणे, ही खूप कठीण गोष्ट होती. माझ्याच कुटुंबातल्या कितीतरी जणांना प्रयत्न करूनही हे जमले नव्हते.

आज जगातले एक चतुर्थांश लोक मुस्लीम आहेत. निर्वासितांचे लोंढे निर्माण करणारे जगातले पहिले दहा देशही मुस्लिमच आहेत. अशा असंख्य स्थलांतरित लोकांचे लोंढे युरोप–अमेरिकेकडे वळत आहेत. मुसलमानांच्या वाढत्या प्रजेमुळेही त्यांची संख्या पाश्चिमात्यांपेक्षा वेगाने वाढत आहे. माझ्या कुटुंबासारख्या समस्या असणारी अनेक कुटुंबे आहेत. म्हणूनच अशा निर्वासित कुटुंबांना आपल्यात सामावून घेऊन त्यांना सुजाण नागरिक बनवण्याचा विचार पाश्चिमात्य लोकांनी करायला पाहिजे.

अशा प्रकारे जगात एकसंधपणा येण्यात तीन प्रमुख समस्या आहेत. या सर्व समस्या इस्लाम धर्मामुळे निर्माण झाल्या आहेत. पहिली म्हणजे इस्लाममध्ये

स्त्रियांना दिली जाणारी वागणूक. हा धर्म लहान वयातच मुलींच्या इच्छा–आकांक्षांची गळचेपी करतो. स्त्रीत्वाच्या उंबरठ्यावर येईपर्यंत त्यांचा आवाज बंद केला जातो. एखाद्या निर्जीव यंत्राप्रमाणे धुणे, भांडी, स्वयंपाकपाणी करण्यासाठीच त्यांना केवळ वाढवले जाते. वडिलांनी समोर आणलेल्या पुरुषाशी लग्न करायचे आणि मग त्याला लैंगिक सुख देऊन त्याची मुले जन्माला घालायची, एवढेच त्यांच्या जगण्याचे प्रयोजन. लहान वयातच त्यांचे शिक्षण थांबल्यामुळे एका घराची जबाबदारी घेण्यासाठी, मुलांना आधुनिक जगातील समर्थ नागरिक म्हणून वाढवण्यासाठी त्या असमर्थ असतात. त्यांच्या मुली तोच अशिक्षितपणाचा वारसा पुढे चालवतात. काही जणी हे जगणे मान्य करतात, तर काही दुहेरी आयुष्य जगतात. घरातून पळून जाऊन वेश्याव्यवसायात पडलेल्या व्यसनाधीन मुलीही आढळतात. माझ्यासारख्या अगदी थोड्याच जणी स्वत:च्या पायावर उभे राहून यशस्वी आयुष्य जगतात आणि परत आपल्या कुटुंबालाही जवळ करतात. प्रत्येकीची वेगळी कथा. त्यांच्यातील समान धागा म्हणजे या सगळ्याच जणी एकाच गुलामगिरीची शिकार बनतात – ते म्हणजे त्यांचे कुटुंब. एक स्त्री म्हणून त्यांच्या जगण्यावर त्यांच्या कुटुंबाचे नियंत्रण असते. जे त्या सहन करतात, ते क्वचितच इतर धर्मातील स्त्रियांना सहन करावे लागत असेल. या स्त्रियांची गुलामासारखी परिस्थिती ही सुजाण नागरिक घडण्याच्या प्रक्रियेतील मोठी अडचण आहे. कारण त्या स्वत: तर मागास राहतातच, पण त्यांची मुले जी पुढे समाजातील प्रौढ नागरिक होतात, त्यांचीही जडणघडण नीट होत नाही.

स्थलांतरित मुस्लिमांची दुसरी अडचण म्हणजे त्यांचा आर्थिक व्यवहारातील मागासलेपणा. ही बाब प्रगत समाजातील लोकांना तितकीशी महत्त्वाची वाटणार नाही. पण आर्थिक अशिक्षितपणा ही गंभीर समस्या आहे. आधुनिक जगात पाऊल टाकताना त्यांना तिथल्या सोयी-सुविधांची संधीची कल्पना नसते, याचे कारण म्हणजे त्यांना आर्थिक शिस्त लावलेलीच नसते. शिवाय कर्जबाजारीपणाकडे बघण्याचा इस्लामचा दृष्टिकोनही त्याला कारणीभूत आहे. तिसरा अडथळा म्हणजे मुस्लीम लोकांची मानसिकता. त्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात राहणे अवघड जाते. सर्व मुसलमान लोकांना धर्मसंस्थापक महंमद पैगंबर हे पूजनीय! त्यांनी सांगितलेल्या नियमांना डावलण्याचा प्रश्नच येत नाही. कुराणातला महंमदांचा शब्द म्हणजे अल्लाचा शब्द, त्या नियमांचे पालन करणे हे कर्तव्य आहे, हे लहानपणापासून त्यांच्या मनावर कोरलेले असते. त्यामुळे इतर धर्मातील लोकांपेक्षा मुसलमान लोक अनुयायी असतात. त्यांना स्वतंत्रपणे विचारच करता येत नाही. यात भर म्हणजे हे कट्टर लोक हिंसेचे समर्थन करतात. मग तो घरातील

स्त्रिया– मुलांवर अत्याचार असो वा युद्धाच्या नावावर निरपराध लोकांची हत्या असो. या मानसिकतेमुळे शिकलेल्या प्रगत समाजात नागरिकांत मिळूनमिसळून राहण्यात त्यांना अडचण येते. थोडक्यात सांगायचे; तर लैंगिक आणि आर्थिक व्यवहार, हिंसाचार ही तीन प्रमुख कारणे माझ्या कुटुंबासारख्या कित्येक लोकांच्या मागासलेपणाची प्रमुख कारणे आहेत.

*नोमॅड*च्या शेवटच्या भागात मी या परिस्थितीवर काही उपाय सुचवले आहेत. लोकांच्या सामाजिक अपयशाकडे बघण्याचा पाश्चिमात्य देशांचा दृष्टिकोन उदारमतवादी आहे. कृष्णवर्णीय लोक असंस्कृत असणारच, असे म्हणून त्यांच्याकडून फारशा सुसंस्कृत वर्तनाची अपेक्षा केली जात नाही. प्रगत राष्ट्रांमध्ये बहुसंख्य लोक गोरे आणि अल्पसंख्याक हे काळे असतात. इतर स्थलांतरित लोकांप्रमाणे मुस्लीम लोकही अल्पसंख्याक म्हणून जगण्यासाठी जात नाहीत, तर त्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी जातात. सुरक्षित, समृद्ध आयुष्य देणाऱ्या संधी शोधण्यासाठी जर ते स्थलांतर करत असतील; तर त्यांच्या काही मागास सवयी सोडून प्रगत आयुष्य नव्याने जगायला त्यांनी शिकले पाहिजे.

पाश्चात्त्य देशांत निर्वासितांच्या पुनरुत्थानासाठी प्रयत्न करणारी अनेक भली माणसे, स्वयंसेवी संस्था आहेत. ते सर्वसामान्य नागरिकांना अशा उपक्रमांत भाग घ्यायला प्रवृत्त करतात. समाजात कुठल्याही प्रकारचे भेदाभेद नसावेत, यासाठी ते काम करतात. अल्पसंख्याकांना अधिक सोयी, सवलती मिळाव्यात, यासाठी ते सरकारशी लढतात. त्यांना त्यांची संस्कृती टिकवण्याचा, त्यांच्या धार्मिक परंपरांनुसार वागण्याचा हक्क मिळावा, यासाठी या स्वयंसेवी संस्था प्रयत्नशील असतात. त्यांचा हेतू चुकीचा नसतो. पण अल्पसंख्याकी समस्यांच्या मुळाशी अशा प्रकारच्या चळवळी आहेत. अगदी स्पष्टच सांगायचे झाले, तर मुसलमान आणि इतर अल्पसंख्याकांना मदत करण्याच्या प्रयत्नांमुळे या लोकांच्या सुधारणेच्या प्रक्रियेस विलंब लागतो. आपल्या टोळ्यांमध्ये राहून आधुनिक प्रगत नागरिक होता होईल, ही संभ्रमावस्था आहे. भिन्न संस्कृतीचे उदात्तीकरण केल्यामुळे पाश्चिमात्त्य देशांत जन्माला येणाऱ्या नव्या पिढीतील मुलांची कुचंबणा होते. आपण कोणत्या मूल्यवस्थेला धरून राहायचे, याबद्दल त्यांना कुठलीच ठाम भूमिका घेता येणार नाही. अल्पसंख्याकांना आहेत तसेच स्वीकारण्याचा उदारमतवादामध्येच वांशिक भेदाचे क्रौर्य दडले आहे. उदारमतवादांच्या गोड शब्दांमुळे ते क्रौर्य वाढतेच, असे मला वाटते.

या मागास स्थलांतरितांना प्रगत समाजाचा भाग बनवण्याचा प्रक्रियेत पाश्चिमात्य समाजातील तीन संस्था मदत करू शकतात. जिहादचा पुरस्कार करणाऱ्या

इस्लामच्या प्रतिनिधींनी मुस्लीम लोकांच्या मनावर कब्जा केला आहे. त्यांना या संस्था टक्कर देऊ शकतात. यातली सगळ्यांत महत्त्वाची संस्था म्हणजे शिक्षणसंस्था.

अठराव्या शतकात युरोपमध्ये शाळा आणि विद्यापीठे यांचा जन्म झाला. या शिक्षणसंस्था तर्कशुद्ध विचारांवर काम करत होत्या. लोकांचे पुनरुत्थान, त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास, दारिद्र्य आणि अंधश्रद्धा यांपासून त्यांची मुक्तता हे या शिक्षणामागे ध्येय होते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात या शैक्षणिक संस्था अधिकाधिक लोकांपर्यंत पोचल्या. गणित, विज्ञान, भूगोल अशा शालेय विषयांबरोबरच समाजाचा एक यशस्वी घटक बनण्याची कलाही इथे मुले शिकत. जग बिनभिंतींची शाळाच असते. त्यामुळे तिथे यशस्वी होण्याचे धडे त्यांनी शाळेत गिरवले. साहित्यामुळे त्यांच्या वैचारिक कक्षा रुंदावल्या आणि वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या व्यक्तींना समजून घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली. या शिक्षणाने उत्तम नागरिक घडवले. विद्यार्थ्यांत सर्वसमावेशक वृत्ती निर्माण झाली.

याच प्रगत देशांतल्या शिक्षणसंस्था सथलांतरित विद्यार्थ्यांच्या बाबतीत फार उदार आहेत. या विद्यार्थ्यांना त्यांचे रीतिरिवाज, धार्मिक श्रद्धा असण्याचा अधिकार मिळतो. त्यांची ही सहिष्णुता अनाठायी आहे. त्यामुळे मुस्लीम लोकांच्या मान्यतांना ते आव्हान देऊ शकत नाहीत. पाठ्यपुस्तकात इस्लामची भलावणच केली आहे. शिक्षणसंस्थांसारख्या वैचारिक बैठक असलेल्या संस्थांनी अशी झापडे लावणे अयोग्य आहे. हा कोणाला उर्मटपणा वाटेलही, तरीही प्रत्येक गोष्टीचा तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता त्यांनी जोपासलीच पाहिजे.

मुस्लीम समाजाच्या मागासलेपणामध्ये स्त्रियांची स्थिती तर फारच दयनीय आहे. म्हणून स्त्रीमुक्ती चळवळ ही पाश्चात्त्य देशांमधली दुसरी एक महत्त्वाची संघटना यात मोठी भूमिका बजावू शकते. पाश्चात्य देशांतील अशा संघटनांकडे अनुभव आणि आर्थिक पाठबळ दोन्ही आहे. मुस्लीम स्त्रियांच्या प्रगतीसाठी त्यांनी तीन स्तरांवर काम करावे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी लागणारे शिक्षण दिले पाहिजे. स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी काही उद्योग, व्यवसाय आणि स्वतंत्रपणे जगण्यासाठी लागणारे आत्मिक बळ यांची त्यांना गरज आहे. त्यांना शारीरिक आणि मानसिक गुलामगिरीतून सोडवण्यासाठी या स्त्रीमुक्तीसंघटना काम करू शकतात. पाश्चात्त्य देशांत राहूनही या स्त्रियांवर त्यांचे कुटुंबीय खूप निर्बंध घालतात. याकडे कौटुबिंक हिंसाचार म्हणून बघणे पुरेसे नाही. या कौटुंबिक बाबी असल्या, तरी त्या कायद्याच्या चौकटीत येतातच. या हिंसाचाराचे गांभीर्य, त्या स्त्रियांची दयनीय अवस्था यांच्याविरुद्ध प्रचार करून लोकांसमोर आणणे महत्त्वाचे आहे. प्रगत

समाजातही स्त्रियांना शारीरिक छळाला तोंड द्यावे लागते, ही गोष्ट भयंकर आहे. अशा चळवळीतूनच सुधारणा घडतील. मुस्लीम पुरुषांना स्त्रीशिक्षणाचे, त्यांच्या व्यक्तिविकासाचे फायदे पटवून देता येतील. त्यांना हिंसाचारापासून प्रवृत्त करून स्त्रियांच्या विकासात सामील करून घेता येईल.तिसरी शेवटची आणि महत्त्वाची संस्था म्हणजे ख्रिश्चन चर्चेस. मी स्वत: नास्तिक आहे, पण बहुसंख्य लोकांना काहीतरी धार्मिक आधार हा लागतोच. मी अनेक ख्रिश्चनधर्मीयांना भेटले आहे. माझ्या लक्षात आले आहे की, त्यांची देवाची संकल्पना ही अल्लापेक्षा कितीतरी वेगळी आहे. त्या लोकांची धार्मिकता ही प्रागतिक आणि सहिष्णू आहे. इस्लामी अतिरेकाला ही धर्मसंस्था आवर घालू शकते. आधुनिक ख्रिश्चन धर्म प्रेमाचा संदेश देतो. या धर्माचे अनुयायी द्वेष, तिरस्कार, बेबनाव यांना कधीच थारा देत नाहीत. हा धर्म क्षमाशील आहे, सत्तालोलुप नाही. तो विज्ञानाचे महत्त्व जाणतो आणि म्हणूनच प्रगत आहे. ख्रिश्चन लोक बायबलमधल्या कथांकडे जीवनमूल्य सांगणाऱ्या उपदेशात्मक गोष्टी या दृष्टीने बघतात. त्यांचे आज्ञापालन करायलाच पाहिजे, असे त्यांना वाटत नाही. सध्या ख्रिश्चन धर्मातही दोन टोकाचे पंथ आहेत. त्या दोन्हींचा प्रभाव पाश्चात्य संस्कृतीवर पडत आहे. एक गट इतर कोणत्याही धर्माचे अस्तित्व मानायला तयार नाही. माणसाच्या, निसर्गाच्या उत्पत्तीमागील कोणतीही शास्त्रीय बैठक त्यांना अमान्य आहे. जगातील सर्व घडामोडींमागे एक दैवी शक्ती आहे, असे त्यांना वाटते. बायबलमधील शिकवण ते तंतोतंत पाळतात. असे कट्टर ख्रिश्चनधर्मीय त्यांची सगळी शक्ती आणि पैसा धर्मांतरासाठी वापरतात. ही त्यांची वर्तणूक ते शिकवत असलेल्या आत्मोन्नतीच्या तत्त्वाशी विसंगत आहे. याउलट ख्रिश्चनधर्मीय लोकांचा दुसरा गट अतिशय उदारमतवादी आहे. ते इस्लाम धर्माचा अनुनय करतात. 'चर्च ऑफ इंग्लंड'चे मुख्य धर्मगुरू आर्चबिशप ऑफ कँटरबरी हे इंग्लंडमध्ये शरियाचे अस्तित्व मान्य करते. या दोन्ही परस्परविरुद्ध गटांव्यतिरिक्त संयमित शांतताप्रिय ख्रिश्चन लोकही पाश्चात्त्य समाजात आहेत. ते धर्मप्रसाराच्या कार्यातही नाहीत आणि फार मोठे इतर धर्मांचे पुरस्कर्तेही नाहीत, याच लोकांनी सक्रिय होण्याची खरी गरज आहे. द्वेषी आणि अविवेकी विचारांच्या इस्लाम धर्मावर, प्रेम आणि संयम यांची शिकवण देणारा ख्रिश्चन धर्म उतारा होऊ शकतो. इस्लाममधून बाहेर पडणाऱ्या लोकांना येशू ख्रिस्त अधिक जवळचा वाटतो. इस्लामचे संस्थापक मंहम्मद पैगंबर यांच्यापेक्षा येशू अधिक मानवी वाटतो.

मला वाटते माझी भटकंती आता संपत आली आहे. गेली दोनशे वर्षे लाखो भटक्यांना सामावून घेणाऱ्या अमेरिका देशातच मी कायमस्वरूपी वास्तव्य

करणार आहे. माझे नशीब आता अमेरिकेबरोबर जोडले गेले आहे. यातून चांगले वाईट काय निष्पन्न होईल, मला माहीत नाही. पण माझ्यासारख्या मागासवर्गातून आलेल्या मुस्लीम स्त्रीचे स्वागत करून, तिला आपल्यात सामावून घेणाऱ्या या उदार आणि स्वतंत्र वृत्तीच्या देशाचे माझ्यावर उपकार आहेत. त्याची परतफेड मला करायची आहे.

नोमॅडमध्ये मी अतिशय स्पष्ट विचार मांडले आहेत. पवित्र युद्धाचा पुरस्कार करणाऱ्या जिहादी प्रवृत्तीच्या लोकांचा सामना आता पाश्चिमात्य देशांना करायचा आहे. त्यांच्याकडे असलेल्या स्थलांतरित मुस्लीम लोकांच्या भल्यासाठी हे होणे आवश्यक आहे. इस्लामी प्रेषितांच्या तावडीतून सोडविण्यासाठी, कुराणातील अत्याचारी शिकवणुकीपासून वाचवण्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. असे शिक्षण अध्यात्म्याच्या खऱ्या मार्गाचा पुरस्कार करेल.

*इन्फिडेल*प्रमाणेच *नोमॅड*मधील लिखाण व्यक्तिगत स्वरूपाचे आहे. स्थलांतरितांचे यशस्वी नागरिकांत कसे रूपांतर करावे, या विषयावरची मी तज्ज्ञ व्यक्ती नाही. माझा तसा दावाही नाही. कारण माणसांना बदलणे एवढे सोपे नाही. हा बदल विनासायास होणार नाही आणि त्याचे काही छापील उपाय नाहीत. प्रत्येक व्यक्ती भिन्न आचारविचारांची असते. त्यांच्या व्यक्तिगत मर्यादा, वैशिष्ट्ये असतात. हेच मनुष्यस्वभावाचे वैशिष्ट्य स्थलांतरित कुटुंबांना, समाजाला लागू पडते. त्यांच्या बाबतीत तर दुहेरी आव्हान असते. नव्या प्रगत आयुष्याचा स्वीकार करताना पूर्वजांनी घालून दिलेल्या रितीरिवाजांच्या पालनाची जबाबदारी त्यांच्यावर असते.

शेवटी मी इतकेच म्हणेन की, अतिशय व्यक्तिगत प्रवास उलगडून दाखवणारे हे पुस्तक आहे. यातून माझ्या उगमाचा शोध घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. जे जग मी मागे सोडले, त्याचा भाग असणाऱ्या माझ्या छोट्या बहिणीला उद्देशून हे पुस्तक आहे, असा तुमचा समज होईल. पण हे फक्त तिच्यापुरते मर्यादित नाही. यातून मी माझ्या संपूर्ण कुटुंबापर्यंत– विशेषत: वडिलांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला आहे. कारण माझी आधुनिकतेशी पहिली ओळख त्यांनी करून दिली. मात्र ते स्वत: परत अल्लाच्या कर्मठ सेवेत गुंतून गेले. हा संवाद माझ्या आजीशीही आहे. काहीही झाले, तरी आपल्या घराण्याचा कसा आदर करावा, हे तिने मला शिकविले.

हे पुस्तक लिहिताना माझ्या मनात माझ्या भावाचा मुलगा जेकब आणि सहाराची मुलगी सगल घर करून आहेत. जेकब नैरोबीला, तर सगल इंग्लंडमध्ये तयार झालेल्या प्रतिसोमालियात राहत आहे. हे दोघेही सक्षम, सशक्त आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतंत्र आयुष्य जगतील, अशी मी आशा करते.

◈

पुस्तक परिचय

डोंगरी ते दुबई

मुंबईतील माफियांची साठ वर्षे



एस. हुसेन झैदी

अनुवाद : **अशोक पाध्ये**

पृष्ठे **४४८** । किंमत **३५०/-रु.** । सभासदांना सवलतीत

मुंबईतील गेल्या पन्नास-साठ वर्षातील गुन्हेगारी जगाचा परिचय करून देणाऱ्या 'डोंगरी ते दुबई' या पुस्तकाचे महत्त्व असाधारण आहे. एस.हुसेन झैदी या क्राइम रिपोर्टरने त्यासाठी घेतलेले परिश्रम आणि पत्करलेले धोके यांना तोड नाही. हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन, छोटा राजन, अबू सालेम, अरूण गवळी- ही माफीयांची मालिका संपूर्ण मुंबईला वेठीला धरणारी होती. त्यात सर्वात आघाडीवर दाऊद इब्राहिम याने दुबईत राहून मुंबईत जे घातपात घडवून आणले त्याची कहाणी 'डोंगरी ते दुबई' मध्ये वाचायला मिळते. त्यातील दाऊदची मुलाखत तर विशेष वाचनीय आहे. त्यातील प्रास्ताविकाचा संपादित अंश येथे देत आहोत.

डोंगरी टू दुबई हे पुस्तक म्हणजे मुंबईतील एका 'डॉन'च्या सहा दशकांच्या कालखंडाचा आढावा आहे. मी १९९५मध्ये क्राइम रिपोर्टर म्हणून पत्रकारिता करीत होतो. गुन्हेगारी जगावर सामान्य माणसाला रंजक वाटेल अशा भाषेत वृत्तान्त लिहिणे हे माझ्यासाठी एक मोठे आव्हान होते.

१९९७ मध्ये मुंबईतील गुन्हेगारी जगातील दादा आणि त्यांची कृत्ये यांवर लिहिण्यास मला माझ्या मित्राने सुचवले. 'जो गूल्ड' या लेखकाने असे लिखाण इंग्रजीत 'सिक्रेट' या मथळ्याखाली केले होते. परंतु प्रांजळपणे सांगायचे, तर मी ते पुस्तक वाचले नव्हते की त्याचे नावही ऐकले नव्हते.

माझ्या 'ब्लॅक फ्रायडे' पुस्तकासाठी मी या गुन्हेगारी जगाचा कानोसा घेऊ लागलो, या जगातील माहिती घेत गेलो तसतसा तयार होत गेलो. मुंबईमधील अनेक मुस्लीम तरुण या गुन्हेगारी जगाकडे का ओढले जातात, असा मला प्रश्न पडला होता. यामागे दाऊदच्या भोवतालचे वलय कारणीभूत होते, की त्या तरुणांची आर्थिक गरज होती, अशा प्रश्नांपासून मी माझ्या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली. पुढे प्रगती करीत जाता-जाता मी शेवटी अशा गोष्टीपाशी येऊन ठेपलो की, जी गोष्ट माझ्या मित्राने सुरुवातीलाच सुचवली होती.

जेव्हा मी डोंगरीची कथा पूर्ण केली, तेव्हाही माझ्या मित्राची सूचना माझ्यापुढे तशीच मला आव्हान देत उभी होती. एका विशिष्ट धर्माच्या व्यक्तींचा संबंध या गुन्हेगारी जगाशी जोडण्याचा दोष माझ्याकडे येतो आहे का? धर्म व गुन्हे यांच्या परपस्पर संबंधावरती अमेरिकेमध्ये भरपूर संशोधन व अभ्यास झालेला आहे. आपल्याकडे मात्र या विषयावर गांभीर्याने चर्चा झाली नाही की अभ्यास केला गेला नाही. त्यामुळे गेल्या ५० वर्षांत मुस्लीम तरुण गुन्ह्याकडे का वळत गेले, हे सांगणे कठीण आहे.

जेव्हा मी 'डोंगरी' या स्थळाचा उल्लेख करतो, तेव्हा फक्त झकेरिया मशिदीपासून निघणाऱ्या मांडवीचा उल्लेख मला करायचा नसतो, तर क्रॉफर्ड मार्केटपासून जे.जे. हॉस्पिटलचे टोक मला म्हणायचे असते. यामध्ये वाटेतला नळ बाजार, उमरखाडा, चोरबाजार, कामाठीपुरा आणि कापडमाग उद्योग, किरकोळ बाजार व वाटेतील सर्व मशिदी अंतर्भूत होतात.

मुंबईचा इतिहास मागेमागे जात पहाताना इतिहासतज्ज्ञ व संशोधक शारदा द्विवेदी असे लिहिते की, हा वर उल्लेखलेला मुंबईचा भाग एकेकाळी एक सपाट भूमी होती आणि येथे एक टेकडी होती. त्या टेकडीवर पोर्तुगीजांचा एक किल्ला होता. तो पुढे ब्रिटीशांनी घेतला व त्याची डागडुजी करून अधिक भक्कम केला. परंतु ब्रिटीशांनी मुंबईच्या सर्व भागांची दुरुस्ती करण्यापूर्वी व ते भाग वापरात आणण्यापूर्वी फोर्ट भाग हा एक सखल प्रदेश होता. तो डोंगरीच्या पायथ्याशी होता. या सखल भागातून समुद्राकडे जाणे सोपे होते. चकला मार्केटच्या जवळ असलेल्या वरच्या जमिनीवर आणि डोंगरीमध्येही मुस्लीम वसाहती निर्माण झालेल्या होत्या. या वसाहती पार चौदाव्या शतकापासून तिथे नांदत होत्या.

मुंबई बेटाच्या काही भागात दीर्घ काळ मुस्लीम लोक बहुसंख्य होते. अजूनही तशीच परिस्थिती आहे. मुंबईची सातही बेटे एकमेकांना जोडली गेल्यानंतर डोंगरी विभागाला खऱ्या अर्थाने स्वत:चे जीवन प्राप्त झाले. हळूहळू या विभागाभोवती अंदाधुंदपणे वस्ती वाढत गेली. ती वाटेल तशी वाढत गेली. नवीन बाजार निर्माण झाले, व्यापारी उलाढाली होऊ लागल्या. अन् यामुळे येथील लोकसंख्याही वाढत गेली. येथील रहदारी गुंतागुतीची होत गेली. इथल्या फुटपाथचा ताबा फेरीवाल्यांनी घेतला. मग पादचारी रस्त्यावरून चालू लागले. अशा रितीने ह्या जागेतील वर्दळ व उलाढाल वाढत ही जागा गजबजली गेली. डोंगरीच्या पश्चिमेकडे 'चोर बाजार' भरत असतो. या बाजारात तुम्हाला हवे ते मिळू शकते. पारशी लोकांनी टाकून दिलेलुने वॉडरोब किंवा तत्सम साहित्य, ग्रामोफोन आणि चित्रविचित्र जुन्या वस्तू येथे उपलब्ध असतात.

पूर्वीचा डोंगरी विभाग हा असा होता. मग दाऊदने या विभागाचे स्वरूप बदलून टाकले. अन्य गुन्हेगारांनीसुद्धा यात भर घातली. त्यांची नावे – चिंका दादा, इब्राहिम दादा, हाजी मस्तान, करीम लाला आणि बाशू दादा.

त्या काळात गुन्हेगारीचा सोपा मार्ग हा वाटमारीचा होता. रात्रीच्या वेळी एकट्या-दुकट्या पादचाऱ्याला गाठून त्याच्या जवळील सर्वकाही लुटणे हा उद्योग त्या वेळी चाले. खिसे कापण्याची कला अजून उदयास यायची होती. परंतु त्या

वेळच्या गुन्हेगारांजवळील चाकू, खंजीर व तलवारी यांची चकचकीत पाती पाहून मुंबईतील शांतताप्रिय नागरिकांचा थरकाप होई व त्यांच्या पाठीवरून घामाचे ओघळ वाहू लागत. प्रत्येक लहानसहान गुन्ह्याची नोंद ब्रिटीशांच्या काळातील पत्रकार करीत. यामुळे त्यांच्या पत्रकारितेची भरभराट होत जाई. त्या पत्रकारांमध्ये आल्फ्रेड डब्ल्यू. डोव्हीस उर्फ 'गनमॅन' हा एक होता. तो गुन्ह्यांचे वार्तांकन 'ब्लिट्झ' या वृत्तपत्रासाठी करे. त्या काळात अशा पत्रकारिकेत तो एक्का समजला जायचा. त्याच्या तालमीत वाढलेला उस्मान गनी मुकादम हा पत्रकार पुढे नावाजला. बातम्यांचा शोध घेणे व त्या गोळा करणे यांमध्ये तो तरबेज झाला होता. उस्मान गनी याच्या प्रदीर्घ मुलाखती व त्याच्या समकालीन बातमीदारांच्या मुलाखती आणि माझे स्वत:चे संशोधन या सर्वांमधून मला कळून आले की, मुंबईतील गुन्हेगारीचा केंद्रबिंदू हा नेहमीच डोंगरी भाग होता.

१९४७ सालातील पहिल्या पंधरवड्यात मुंबईत गुन्ह्यांचा पूर आला होता. त्यातील चार गुन्हे हे 'टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्रात छापून आले. लालबाग, आग्रीपाडा आणि डोंगरी भागांत बरीच भोसकाभोसकी झाली. या संदर्भात पोलिसांनी नऊ जणांना पकडले आणि गुन्हेगारांची पाळेमुळे उखडण्याची मोहीम सुरू केली. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पोलिसांच्या 'ॲन्टि करप्शन ब्युरो'ने ४०० कोरीव कामे करणारे चाकू मरीन ड्राइव्हवरील एका फ्लॅटमधून जप्त केले. पण या संदर्भात कोणालाही अटक केली नाही. त्याच दिवशी, म्हणजे ८ जानेवारी १९४७ रोजी एका समाजसेवकाला परळमध्ये भोसकले गेले. त्या वेळी नगरसेवक बी.जे. देवरूखकर यांचाही खून करण्यात आला. यामुळे मात्र सारी मुंबई हादरून गेली व खूप खळबळ माजली.

यातून पोलीस खाते थोडासा श्वास घेते न घेते तोच, आणखी एक गुन्हा घडला. म्हणजे गुन्हेगारांनीही आपली चपळाई दाखवून दिली. ११ जानेवारी रोजी पोलिसांनी दोन पठाण व्यक्तींना अटक केली. त्यांनी एक बँक लुटली होती. हा गुन्हा ाडल्यानंतर अवघ्या ९० मिनिटांत पोलिसांनी त्या पठाणांना पकडले होते. दक्षिण मुंबईतील एका बँकेत या गुन्हेगारांनी प्रवेश करून आतली रोकड लुटून बाहेर उभ्या असलेल्या आपल्या मोटारीतून झटपट पळ काढला. त्या मोटारीच्या नंबर प्लेटवर BMX 1221 असा नंबर होता. पण मागची नंबर प्लेट त्यांनी एका तांबड्या फडक्याने झाकून टाकली होती. बँकेतून ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने सुसाट निघाले. त्या मोटारीला 'एस्प्लनेड पोलीस स्टेशन'च्या एका कॉन्स्टेबलने पाहिले. त्या पोलीस स्टेशनचे नाव आता 'आझाद मैदान पोलीस स्टेशन' असे झाले आहे. त्या कॉन्स्टेबलने

त्या मोटारीला हटकले व त्यांना घेऊन तो पोलीस स्टेशनला आला. मग त्या दोन्ही पठाणांना अटक करण्यात आली. एका कॉन्स्टेबलने हे सारे केले, यावरून त्या काळात कॉन्स्टेबल मंडळीचा गुन्हेगारांना केवढा धाक होता, हे समजून येईल. मुंबईतील पोलीस खात्याचा कणा म्हणजे त्या वेळचे कॉन्स्टेबल समजले जात.

नंतरच्या दोन दिवसांत, १४ जानेवारी रोजी, पोलिसांनी गुंडांची एक टोळी उद्ध्वस्त केली. ही टोळी व्ही.टी. स्टेशनच्या पार्सल बुकिंग ऑफीसपाशी कार्यरत होती. (आता व्ही.टी. स्टेशनचे नामकरण 'छत्रपती शिवाजी टर्मिनस' असे झाले आहे.) या टोळीतील माणसे पार्सल करायला आलेल्या लोकांना गाठून त्यांच्याकडे पैशांची मागणी करीत. या मोबदल्यात ते त्या लोकांची पार्सले वेगळ्या मार्गाने पाठवून लवकर पोहोचतील, याची ग्वाही देत. ती पार्सले अपेक्षित ठिकाणी कधीच पोहोचत नसत. या संदर्भात नाझीर अब्दुल कादर, सय्यद बशीर नझीर आणि फखरूद्दीन कादरभाई अशा तीन व्यक्तींना पोलिसांनी अटक केली.

डोंगरी भागातील गुन्हेगार आता अधिकाधिक धाडसी बनू लागले. त्यांचे गुन्हे अजूनही उघडकीस येत नव्हते. डोंगरी भागाच्या भोवतालचे गुन्हेगारही हळूहळू यात सामील होऊ लागले. कारण त्यांना कळून चुकले की, आत्ताच पैसे करण्याची संधी चालून आली. कारण आत्ताच्या काळात पकडले जाण्याची शक्यता खूपच कमी आहे. मग डोंगरी भागातील गुन्हेगार आपल्या 'कर्तृत्वा'चा ठसा या गुन्हेगारी जगावर उमटवू लागले.

परंतु दाऊद इब्राहिममुळे डोंगरी भाग खरा कुविख्यात झाला. त्याने डोंगरीपासून दुबईपर्यंत जशी प्रगती केली, तशी दुसऱ्या कोणीच केली नाही. या पुस्तकात दाऊदच्या पूर्वजांपासून झालेल्या त्याच्या संदर्भातील घटनांचा आढावा घेतला आहे; पण महत्त्वाचे म्हणजे दाऊदच्या प्रवासाचा माग काढला आहे. त्यावरून डोंगरीमधील एका साध्याशा मुलाने आपले गुन्हेगारी जीवन कसे विशेष रितीने विस्तारत नेले, ते समजावून घेता येईल. डोंगरीतील हा मुलगा शेवटी आपल्या खुराड्यांतून निसटून विमानाने देशाबाहेर गेला. देशाच्या शत्रूच्या जमिनीवर त्याने आश्रय घेतला. पण तरीही तो मुंबईतील आपले गुन्हेगारी राज्य चालवत राहिला, आपल्या कारवाया तो त्या परक्या देशातून करीत राहिला. डोंगरीतील हा मुलगा आता दुबईमध्ये राहून एक 'दादा' बनला आहे, 'डॉन' झाला आहे.

◈



७ वी आवृत्ती

शेतकऱ्याचा असूड

संपादन व प्रस्तावना

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

किंमत : ९०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

शेतकऱ्याचा असूड हे महात्मा जोतीराव फुले यांनी निर्मिलेले फार सुंदर रूपक आहे. शेतकऱ्याच्या खांद्यावर असणारा हा असूड केवळ शेतकीत साहाय्य करणाऱ्या जनावरांसाठीच वापरला जातो असे त्यांना वाटत नाही. सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध आणि शोषकांविरुद्धही हा असूड वापरला पाहिजे. दुष्टांच्या निर्दालनासाठी आणि सत्याच्या प्रस्थापनेसाठी या असूडाशिवाय दुसरे कोणते समर्थ साधन शेतकऱ्यांच्या हाती आहे?

एवढेच नाही, तर इथल्या सोवळ्याओवळ्याला कंटाळून आणि शेतकऱ्याच्या घरात खाण्यापिण्यास काही उरले नाही म्हणून लक्ष्मी सातासमुद्रापलीकडे तिच्या पित्याच्या घरी गेली. एकदा लक्ष्मी अंतरली की, दुःख आणि दारिद्र्याशिवाय शेतकऱ्याच्या घरी उरणार तरी काय? तेव्हा तिला परत आपल्या देशात नांदावयास आणावयाचे असेल, तर शेतकऱ्यास सर्व प्रकारच्या विद्या शिकविल्या पाहिजेत. एकदा शेतकरी विद्वान झाला की, तो खांद्यावर असूड टाकून लक्ष्मीला पुढे घालून आपल्या घरी नांदावयास घेऊन आल्याशिवाय राहणार नाही!

हळूहळू भव्य होत जाणारे हे सुंदर रूपक असंख्य अर्थाची प्रतीती देऊन आपणास नवेच विश्वभान देते.

हसत खेळत बालसंगोपन

सर्वात नाठाळ वागणाऱ्या मुलांना रागावून वा शिक्षा देऊन वठणीवर आणता येत नाही. त्यांना प्रेमानेच हाताळावे लागते.



मूळ लेखक : **डॉ. ख्रिस्तोफर ग्रीन**

अनुवाद : **मंजूषा आमडेकर**

पृष्ठे **४३६** । किंमत **३४०/-रु.** । सभासदांना सवलतीत

एक काळ असा होता, की लहान मुलांच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे अन्य पालकांइतकाच मीही गोंधळून गेलेलो होतो. पंचवीस वर्षांपूर्वी, बालरोगतज्ज्ञ म्हणून प्रशिक्षण घेताना मला लहान मुलांच्या वर्तनात काडीइतकाही रस नव्हता. आव्हानात्मक प्रसंग हाताळण्याच्या युक्त्या-प्रयुक्त्या माझ्याकडे मुळीच नव्हत्या. इतर सर्वच प्रशिक्षणार्थींप्रमाणे माझीदेखील सहा महिन्यांकरता मानसोपचार विभागात पाठवणी करण्यात आली. मला या विभागात जायची इच्छा तर नव्हती. मला गंभीर आणि जीवन-मरणाशी संबंधित समस्यांमध्ये विशेष रस होता, आणि आयुष्य जास्त चांगल्या पद्धतीनं घालवण्याचा माझा विचार होता.

मानसोपचार विभागात या सहा महिन्यांत मी बरंच काही शिकलो. इडिपस गंडापासून ते खच्चीकरण करणाऱ्या चिंता, दडपून ठेवण्यात आलेल्या भावना आणि वरकरणी दिसणाऱ्या गोष्टींचा अर्थ लावण्यापर्यंत बरंच काही. जागतिक कीर्तीचे बालमानसोपचारतज्ज्ञ असलेले ऑस्ट्रेलियाचे एक श्रेष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक माझे निरीक्षक म्हणून काम पाहत होते. तसा माझा बहुतेक वेळ इतर मानसोपचारतज्ज्ञांचं आणि मानसतज्ज्ञांचं निरीक्षण करण्यातच जात असे. अचानक एका खोडसाळ बालकामुळे आणि त्याच्या गोंधळून गेलेल्या त्रस्त पालकांमुळे माझं सगळं विश्वच बदलून गेलं...

हे बालक दोन वर्षांचं होतं आणि अत्यंत व्रात्य होतं. वडील पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या विमान कंपनीत सेवक होते; आपल्या मुलाच्या लाजिरवाण्या वर्तनापासून सुटका करून घेण्याच्या आशेनं ते माझ्याकडे आले.

सुरुवातीला मी केसची सखोल माहिती घेतली. एका आठवड्यानंतर हे

जोडपं आपल्या नाठाळ बालकासह पुन्हा मला भेटायला आलं. दरम्यान माझ्या प्राध्यापकांनी त्या बालकाच्या आईचे तिच्या आईशी कसे संबंध होते याबद्दल अधिक माहिती घेऊन ते बालक नेमकं कशामुळे किरकिर करतं याबद्दल मी मुलाच्या आईला अनंत प्रश्न विचारले. आता ते पाहून त्याचे वडील चक्रावून गेले.

मग मी मला मिळालेली नवी माहिती घेऊन पुन्हा माझ्या निरीक्षकासमोर बसलो, त्यांनी सगळं काही तपशिलवार ऐकून घेतलं आणि असं त्या मुलाच्या माता-पित्यांमधल्या लैंगिक संबंधांची माहिती घेतली. त्यांनी माझ्या सर्व चिकित्सक प्रश्नांना उत्तरं दिली, त्याच्या वडिलांनी विचारलं, 'पण आम्ही त्याचा खोडकरपणा आवाक्यात आणायचा तरी कसा?' मला अजूनही या प्रश्नाचं उत्तर माहीत नव्हतं, मी आणखी एक प्रयत्न करून पाहिला, 'तुम्ही स्वत: अशा हटवादी वागण्यावर कसा इलाज करता?'

बराच काळ मौन पाळल्यावर शेवटी मी ज्या उत्तराची वाट पाहत होतो, ते उत्तर त्यांनी दिलं: '...अं...हं...अं...'

माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. माझ्या लक्षात आलं, या प्रश्नाचं उत्तर ना मला माहीत होतं आणि ना त्या अनुभवी तज्ज्ञांना! अशा प्रकारच्या नैराश्यानं ग्रासलेल्या पालकांची आयुष्यं सुसह्य करण्यासाठी मी कंबर कसली.

मी माझ्या सिंहासनावरून खाली उतरलो आणि वास्तवातल्या जगात पाऊल टाकलं. काही बालरोगतज्ज्ञांनी मला नवजात बालकांच्या दवाखान्यात जाण्याचा सल्ला दिला. घरामध्ये जेव्हा नवीन बाळ जन्माला येणार असतं, त्या वेळी पहिल्या बालकांचा नाठाळपणा नेहमीच शिगेला पोहोचत असतो, त्यामुळे बाळाची आई आपल्या बाळाचं वजन किती वाढलंय ते तपासायला लागली, की तेवढ्या वेळात मी तिच्या मोठ्या मुलाला पाहून घेऊ लागलो. मग मी आयांना मोठ्या मुलाच्या वागण्याबद्दल काही युक्त्या सुचवू लागलो. घरी जाऊन त्यांचा रोजच्या जीवनात कितपत उपयोग होतोय ते अजमावून पाहायच्या. मी फारच हुशार आहे अशी शाबासकी काही आया देत तर काही माझ्या कल्पनांनी ढिम्मही फरक पडलेला नाही असे सांगत.

मी माझं प्रशिक्षण संपवलं आणि विशेषज्ञांच्या पंगतीत जाऊन बसलो. त्यापुढील काळात खूपच रुग्णांवर उपचार केले.

मग पालकांच्या गटांकडून मला मुलांच्या झोपण्याच्या, खाण्यापिण्याच्या, स्वच्छतेच्या सवयींबद्दल आणि त्यांच्या वागण्याच्या समस्यांवर बोलण्यासाठी आमंत्रणं यायला लागली. लवकरच रेडिओवरही माझी भाषणं सुरू झाली. एके दिवशी एका पित्यानं माझं बोलणं ऐकलं, तो आपल्या मुलामुळे रात्र रात्र जागून

अक्षरश: हैराण झाला होता – त्या मुलाचे आभारच मानायला हवेत! पालकांना काय हवं आहे ते मला माहीत आहे असं त्याला वाटत होतं आणि माझं सुदैव म्हणजे तो आंतरराष्ट्रीय प्रकाशक निघाला. त्यानं माझ्या दारात चक्क तळच ठोकल्यावर मी त्याला एक पुस्तक लिहून द्यायचं कबूल केलं. अशा प्रकारे या पुस्तकाचा जन्म झाला.

गेल्या दोन दशकांत जगात बरीच उलथापालथ झालेली असली तरी एका गोष्टीत मात्र काहीच बदल झालेला नाही; आणि तो म्हणजे बालकांचा व्रात्यपणा. मग ही मुलं वेगळ्या फॅशनचे कपडे घालत असोत, नवीन प्रकारच्या नॅपी वापरत असोत, दुडदुडणाऱ्या तीनचाकी बाबागाडीतून फिरत असोत अथवा त्यांच्याकडे नव्या डीव्हीडीज आलेल्या असोत, मुलं ही शेवटी मुलंच असतात. गोंधळ घालून ठेवण्याच्या बाबतीतला या मुलांचा उत्साह काळाच्या ओघात जराही मावळलेला नाही, असं तुम्हाला कोणताही पालक छातीठोकपणे सांगू शकेल; बदलत्या काळाचा मुलांच्या अविचारीपणावर आणि वाट्टेल तशा वागण्यावर काहीही बदल झालेला नाही. स्वत:कडे लक्ष वेधून घेण्याचा त्यांचा हटवादीपणा जराही दबला गेलेला नाही. ही मुलं पूर्वीइतकीच चैतन्यानं आणि त्यांच्यामध्ये असलेल्या सदाबहार जादूनं रसरसलेली आहेत.

माझ्या मदतीनं ते नक्की शक्य आहे. तर मग चला, पाय घट्ट रोवून उभे राहा, बाह्या सरसावा आणि तुमच्या अपत्याच्या बालपणातली गंमत चाखायला तय्यार व्हा.

लेखनाच्या सोयीकरता म्हणून मी सगळीकडे खोडकर मुलांचा उल्लेख 'तो' आणि 'त्याला' अशा प्रकारे केला आहे.

– डॉ. ख्रिस्तोफर ग्रीन

✯ व्रात्यपणाला आवर

मी या प्रकरणात खोडकर बालकांना कसं वठणीवर आणायचं या बाबतीतल्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकणार आहे. तुम्हाला जर या पुस्तकाचं फक्त एकच प्रकरण वाचायचं असेल, तर तुम्ही हेच प्रकरण वाचावं, अशी माझी इच्छा आहे.

✯ महत्त्वाच्या चार गोष्टी

अत्यंत व्रात्य अशा नाठाळ मुलांना वठणीवर आणायची कठीण कामगिरी तब्बल २५ वर्षं पार पाडल्यानंतर, बहुतांशी आई-वडिलांना सतावणाऱ्या, नाठाळ मुलांच्या बाबतीतल्या सर्वसाधारण समस्यांवर मी काही युक्त्या आणि उपाययोजनांचं संकलन केलेलं आहे.

एरवी एखाद्या रहस्यमय कादंबरीच्या शेवटच्या पानावर येईपर्यंत काही त्यातल्या रहस्याचा उलगडा होत नाही, पण मी इथे तुम्हाला सुरुवातीलाच काही चातुर्याच्या गोष्टी सांगणार आहे. माझ्या दृष्टीनं या युक्त्यांचं महत्त्व अनन्यसाधारण आहे.

बालकांना काय हवं असतं?

- **लक्ष/अवधान**
- **वेळ**
- **प्रेम आणि ममत्व**

यातही त्यांच्याकडे लक्ष दिलं जाणं ही गोष्ट सर्वाधिक महत्त्वाची आहे; इतकी, की मी त्याचं वर्णनच करू शकणार नाही. बहुतेक सर्वच पालकांना ही गोष्ट माहीत असते, की स्वत:कडे लक्ष वेधून घेणं ही मुलाची गरज असते, आणि मुळात तेच पालक फारसं करू शकत नाहीत.

मुलांचा खोडसाळपणा कमी करण्याचा रामबाण उपाय म्हणजे, त्यांच्याकडे चांगलं व्यवस्थित लक्ष देणं; संपूर्णपणे, कसलाही व्यत्यय मध्ये येऊ न देता,

केवळ त्यांच्याकडेच लक्ष देणं फारच महत्त्वाचं असतं. मुलांकडे जर अशा प्रकारे नीट लक्ष देता आलं नाही, तर ती त्याकरता काय वाट्टेल ते करू शकतात.

तुमचं लक्ष मुलांनी वेधून घेण्यापूर्वीच जर तुम्ही त्यांच्याकडे नीट लक्ष दिलंत, तर मग त्यांच्यावर आकांडतांडव करण्याची वेळच येणार नाही.

हे लक्षही अगदी नजरेत भरण्याइतकं असणं जरुरीचं असतं- अवखळ मुलांना सकारात्मक दुव्यानं जोडण्याची आवश्यकता असते. एखादं शांत, आनंदी बालक तुमचं लक्ष वेधून घेण्यासाठी मुळीच त्रागा करणार नाही, खोलीभर आदळआपट आणि फेकाफेक करणाऱ्या नाठाळ मुलाइतकीच त्याच्याकडेही लक्ष दिलं जाण्याची गरज असली तरीही ते शांतच राहील. त्यांना आपलं कौतुक व्हावं ही इच्छा असल्यामुळेच ती जरा जास्तच शहाण्यासारखी वागत राहतात; अशी मुलं गुणी बाळासारखी वागतात आणि आपल्याकडे इतरांचं लक्ष वेधून घेण्यासाठी उचापत्या करत नाहीत, म्हणूनच त्यांच्याकडे फारसं लक्ष दिलं जात नाही.

या अवखळ मुलांना प्रेम हवं असतं आणि आपल्यावर कुणीतरी प्रेम करतंय, याची जाणीव हवी असते. माझं हे विधान गुळगुळीत आणि गुडीगुडी नाही बरं का – आपल्यावर आपल्या पालकांचं प्रेम आहे हे लहान मुलाला कळेल अशा बेतानं पालकांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत असं माझं म्हणणं आहे.

☆ पालकांच्या समस्या मुलांनाही भेडसावतात

- **ताण**
- **तणाव**
- **निराशा**

मुलं फारच संवेदनशील असतात – लहान मुलं त्यांच्या आसपास जे काही घडत असतं, ते एखाद्या अँटेनासारखं ताबडतोब ग्रहण करतात. त्यामुळे त्यांच्या आसपासच्या वातावरणाचं महत्त्व कमी लेखून चालत नाही, मग भले ते वातावरण चांगलं असो अथवा वाईट!

ज्या गोष्टींचा परिणाम पालकांवर होतो, त्या गोष्टींचा त्यांच्या लहानग्या मुलांवरही परिणाम होत असतो. तुम्हाला कदाचित त्याची लक्षणं दिसणारही नाहीत, पण त्याचा अर्थ परिणाम झालेला नाही, असं नक्कीच नसतं. मुलांना जे दिसत नाही आणि जे त्यांच्या कानावर पडत नाही, अशाही गोष्टींची त्यांना जाणीव होत असते. उदा. तुमच्या जोडीदाराबरोबर असलेले तुमचे मतभेद कदाचित तुमच्या मुलाला समजणार नाहीत, किंवा त्यांच्यादेखत तुमच्यामध्ये काही वादावादी झालेली नसली, तरीही घरातल्या वातावरणातला तणाव त्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. फार काय, मुलापासून एखादी वाईट गोष्ट आपण लपवून ठेवतोय, असं

तुम्हाला जरी वाटत असलं, तरीही त्यांना वातावरणातील अनिश्चितता समजतेच.

नुकतंच जन्मलेलं बाळ, प्रवास, आजारपण, घर बदलणं, भावनिक दडपण किंवा पैशाच्या चिंता या गोष्टी नेहमीच ताणतणाव निर्माण करत असतात. अशा प्रसंगी दिसून येणारा वागण्यातला बदल स्वाभाविकच असतो आणि अपेक्षितही. पण अशा परिस्थितीत, लहान मुलांना जास्त शिस्त लावत बसण्यापेक्षा त्यांना समजून घेण्याची जास्त गरज असते.

त्यामुळे आईबाबा काळजीत असतील, तर मूलही तणावग्रस्त राहणार हे ठरलेले आहे.

☆ सगळ्याच गोष्टी स्वत:च करणं आपल्याला शक्य नसतं

- **परिवार**
- **आजीआजोबा**
- **अन्य आधार**

मूल जन्माला घातलं म्हणजे आपण खूप हुशार आहोत असं बऱ्याच पालकांना वाटतं पण मुलांपायी काही रात्री जागवून काढायला लागल्यावर एके दिवशी खाडकन त्यांचे डोळे उघडतात आणि लगेचच त्यांच्या लक्षात येतं, की त्यांना मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. मग त्या बाळाचं बालकात रूपांतर होईपर्यंत, बहुधा त्यांच्या हेही लक्षात आलेलं असतं, की त्यांना जिथून मिळेल तिथून मदतीची आणि आधाराची गरज आहे.

मुलाचं संगोपन स्वत:च करण्याचा प्रयत्न करणं नक्कीच जमण्यासारखं आहे, पण स्वत:चा इतका छळ करून घेण्याची गरज काय? तुम्हाला हव्या असलेल्या आधाराचा शोध घेणं आधी महत्त्वाचं आहे, म्हणजे मग तुम्हाला तुमच्या मुलाला ज्या गोष्टींची आवश्यकता आहे ते देता येणं शक्य होईल.

मला वाटतं, आजीआजोबांसारखा मायेचा आधार सर्वांत उत्तम असतो. आता काही आजीआजोबा जुन्या वळणाचे असतीलही आणि आधुनिक जगाशी त्यांचा काही संपर्कही नसेल, पण नव्या पिढीचे आधुनिक आजीआजोबा ही एक वेगळीच जमात आहे. बऱ्याच जणांमध्ये पालकांइतकाच उत्साह असतो आणि नातवंडांच्या अवतीभोवती वावरताना त्यांना आपण आणखीनच तरुण झाल्यासारखं वाटत असतं. आजीआजोबांकडे पालकत्वाचा अनुभव आणि शहाणपणही असतं.

पण दुर्दैवानं, परिवार आणि आजीआजोबा या मौल्यवान घटकांकडे दुर्लक्ष केलं जातं. आजकालच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती जवळपास लुप्त झालेली असताना आणि जवळपास राहणाऱ्या नातेवाइकांची संख्याही आटलेली असताना, परिचित मंडळी, शेजारीपाजारी, मित्रमंडळी या माध्यमातून तुम्ही तुमच्या आसपास आधारवड

निर्माण करणं अधिक महत्त्वाचं होऊन बसलेलं आहे. अर्थात सगळं काही सुरळीत चाललेलं असताना तुम्ही स्वत:ही सगळं काही नीट हाताळू शकता तो भाग वेगळा, पण आयुष्य काही नेहमीच सरधोपटपणे चालत राहत नाही. संकटाच्या काळात आपले जे आधारस्तंभ असतात, मग भले ते आपले आप्त असोत वा नसोत, त्यांच्या मदतीचा हात आपल्याला कायम धीर देत राहतो.

☆ शिस्तीचे मधुर फळ

- **बक्षिसं**
- **सातत्य**
- **मर्यादा**

शिस्त लावण्यासाठी प्रचंड देखावा करण्याची मुळीच गरज नसते, पण बऱ्याच पालकांच्या दृष्टीनं ते महाकर्मकठीण असतं. आपल्या नाठाळ बालकाला कसं वठणीवर आणायचं हेच कळेनासं झाल्यामुळे धास्तावलेले पालक शांतपणे आयुष्य जगण्याची आशाच सोडून देतात.

शिस्त लावण्याची सवय लावून घेतली तर त्यातून खूप चांगला परिणाम साधता येऊ शकतो – शिस्त लावणं याचा अर्थ नियंत्रण ठेवणं किंवा शिक्षा करणं असा नसून तिच्याकडे एक सकारात्मक कृती म्हणून पाहता येऊ शकतं. या पुस्तकातून मला एवढंच सांगायचं आहे, की मूल जेव्हा योग्य प्रकारे वागत असेल तेव्हा त्याला प्रोत्साहन देऊन हळुवारपणे त्याच्या वागण्याची रीत बदलत राहिलं पाहिजे. ९५ टक्के वेळा उपयोग होतो.

लहान मुलाला शिस्त लावण्याचा सर्वांत जास्त प्रभावी उपाय म्हणजे बक्षीसयोजना. मुलाला वळण लावण्याकरता त्यांच्याकडे लक्ष देण्याचा, बक्षीस म्हणून चांगला उपयोग करता येण्यासारखा असतो. कौतुकानं पाहणं, प्रेमानं बोलणं, कुरवाळणं आणि त्यांची दखल घेणं अशा गोष्टी करून मुलाच्या चांगल्या वागण्याला आपण उत्तेजन देऊ शकतो. या प्रकारे आपण आपल्याला अपेक्षित असलेल्या चांगल्या वागणुकीला प्रोत्साहन देऊन, नको असलेल्या वागणुकीला आपला विरोध दर्शवू शकतो, आणि या बक्षिसांमध्ये अशी काही ताकद असते की मुलाकडून चांगल्या वागणुकीची पुनरावृत्ती होत राहण्याची दाट शक्यता निर्माण होते.

आयुष्यात थोडीशी शिस्तबद्धता नेहमीच स्वास्थ्य निर्माण करते आणि विशेषत: लहरी आणि अविचारी बालकाच्या बाबतीत तर हे अगदी खरं असतं. शिस्तीमुळे वागणुकीबाबतचे नियम आणि मर्यादा ठरवता येतात. त्यातून सातत्य, सुरक्षिततेची जाणीव निर्माण होते.

मुलाला मार्गदर्शन करण्यासाठी, उत्तेजन देण्यासाठी आणि हळुवारपणे त्यांच्यात

बदल घडवून आणण्यासाठी चांगल्या प्रकारची शिस्त कशी लावता येऊ शकते.

मला प्रेमानं समजावून शिकवलेलं आवडतं आणि मला बक्षीस मिळालेलंही आवडतं. एखाद्या लहान मुलालाही याच प्रकारे प्रोत्साहन देऊन चालना देता येऊ शकते.

✯ साधेसोपे उपाय

- **झोपेच्या समस्या**
- **आहार**
- **स्वच्छतेचे धडे**

झोप, आहार आणि स्वच्छता या तीन समस्यांपैकी प्रत्येक पालकाला एका तरी समस्येला सामोरं जाण्याची वेळ येतेच, असं म्हटल्यास वावगं होणार नाही. तुम्हाला रातोरात क्रांती घडवून आणायची घाई नसेल तर या समस्यांवरचे उपाय अगदी साधेसोपे आहेत. तुम्हाला अगदी मुळापासून सुरुवात करावी लागेल.

झोपेच्या बाबतीत प्रत्येक मुलाची गरज वेगळी असते आणि ती त्याच्या पालकांना सोयीची असतेच असं नाही. त्यामुळे झोपी जाण्याच्या वेळेबाबत शिस्त लावून घेणं ही चांगली सुरुवात ठरू शकेल. मध्यरात्री झोपेतून उठण्याच्या बाबतीत आम्ही मर्यादित रडण्याच्या युक्तीचा वापर करतो आणि मुलांना त्यांच्या खोलीतच किंवा जागेवरच राहू देण्याकरता आमच्याकडे ग्रीन यांची एक खास अशी दोरीची युक्तीही आहे.

खाण्यापिण्याच्या बाबतीतला सावळा गोंधळ टाळायचा असेल तर त्याबाबतीत आरडाओरडा करून काहीच फायदा होणार नाही; त्यातून तुमचा रक्तदाब वाढणं ही एकच गोष्ट निष्पन्न होऊ शकते. माझ्यावर विश्वास ठेवा : हटवादीपणामुळे आजवर एकही मूल उपाशी राहिल्याची घटना घडलेली नाही. त्यामुळे मुलाला पुरेसं पोषक अन्न मिळेल याची काळजी घेणं यावरच आपलं सगळं लक्ष केंद्रित केलं पाहिजे.

✯ व्यक्ती तितक्या प्रकृती

- **स्वभाव**
- **सहनशीलता**
- **स्पर्धा**

एके काळी असा समज प्रचलित होता की सर्व मुलं कोऱ्या पाटीसारखी जन्माला येतात आणि त्यांना लागणाऱ्या वाईट सवयींसाठी त्यांचे पालकच संपूर्णपणे जबाबदार असतात; पण प्रत्येक मूल आपापला स्वतंत्र स्वभाव आणि आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व घेऊनच जन्माला येत असतं. काही जन्मत:च गुणी बाळं असतात;

मुलं मात्र कधी काय करतील त्याचा नेम नाही, अशी काळजात धडकी भरवणारी असतात.

स्वभावातल्या या जन्मजात फरकांमुळे, तुम्हाला पुस्तक समोर ठेवून मुलांना लहानाचं मोठं करता येणार नाही. तुम्ही कितीही प्रयत्न केलात, तरी एखाद्या नाठाळ मुलाला तुम्ही सद्‌गुणी आदर्श बाळ काही बनवू शकणार नाही. आपलं बाळ जगावेगळं आहे याचा मनोमन स्वीकार करणं आणि अशा बालकाच्या बाबतीत कोणता उपाय लागू पडू शकतो याचा शोध घेणं हा एकच उपाय आहे.

या सगळ्यामध्ये पालकांचा सहनशीलपणा हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. काही पालक मोठ्या धीराचे असतात, तर बाकीचे कठोर आणि चटकन संतापणारे असतात.

मग आयुष्य आनंददायी बनवण्याच्या ऐवजी, या सगळ्या वैविध्यांमुळे आपल्या मुलाची शाळेतल्या किंवा पाळणाघरातल्या इतर मुलांशी तुलना करायला लागल्यावर स्पर्धा, अपराधीपणाची भावना आणि आपलंच काहीतरी चुकतंय अशी रुखरुख पालकांना छळायला लागते. तुमचं मूलच जगावेगळं असतं, हेच खरं!

तुमचं मूल ज्या प्रकारचा स्वभाव घेऊन जन्माला आलेलं आहे, त्यात परिवर्तन घडवून आणणं, त्यांची गुणसूत्रं बदलणं हे काही तुमच्या हातात नाही, पण तुम्ही त्यांच्या वागण्याची तऱ्हा मात्र नक्की बदलू शकता.

✯ मुद्दामहून त्रास ओढवून घेऊ नका

- **स्वाभाविक काय आहे ते जाणून घ्या**
- **कशाला महत्त्व द्यायचं आहे ते ठरवा**
- **वास्तववादी अपेक्षा करा**
- **झोपलेल्या सिंहाची खोड काढायला जाऊ नका**

पालकांना त्रासदायक वाटणाऱ्या बऱ्याच गोष्टी मला समस्या वाटतच नाहीत. आपण त्यांचा समावेश खरोखरच स्वाभाविक गोष्टींमध्ये करू शकतो. आता त्यातल्या सर्वच बाबी तुम्हाला आवडू शकतील किंवा तुम्ही त्या सर्वच गोष्टींचा आनंदानं स्वीकार करून त्यांच्यासह जगू शकाल अशा असतीलच असं नाही, पण तरीही आयुष्य सुसह्य व्हावं या दृष्टीनं विचार केल्यास काही गोष्टी फारशी दखल घेण्यासारख्या नसतात, याचा मनोमन स्वीकार करण्यानं बराच फायदा होऊ शकतो.

मुलांकडून रास्त अपेक्षा ठेवणं हेच बालसंगोपनाचं गमक आहे; पण दुर्दैवानं परिस्थितीच्या गाळात रुतायची वेळ येईपर्यंत बऱ्याच पालकांच्या हे लक्षातच येत नाही की आपण फारच अवास्तव अपेक्षा करत होतो.

तुम्ही हे पुस्तक वाचत जाल तसतसं तुमच्या लक्षात येईल की सर्वांत कमी झळ बसेल असा मार्ग निवडण्यानंच सहजीवन सुसह्य होऊ शकेल.

साशंक असाल तेव्हा हे लक्षात ठेवा

✯ एक पाऊल मागे जा

कठीण प्रसंगात स्वत:लाच विचारा, 'आजचा दिवस मुलासाठी वाईट आहे की माझ्यासाठी?' पुष्कळदा दृष्टिकोनात बदल करण्याची गरज मुलापेक्षा पालकांनाच जास्त असते.

मुलं ही काही लहान आकाराची मोठी माणसं नसतात. त्यांना असलेली समज आणि अवधान यांचं प्रमाण मर्यादित असतं. मुलं आपल्यासारखा विचार करू शकत नाहीत – किंबहुना कृती करण्यापूर्वी मुलं क्वचितच विचार करतात. दुसरं मूल आपलं खेळणं घेतं तेव्हा पहिल्या मुलाच्या हे लक्षात येत नाही, की त्यानं ते फक्त तात्पुरतं खेळण्याकरता म्हणून घेतलेलं आहे. मोठ्या माणसांसारखं, वस्तू वाटून घेण्याचं मूल्य त्याच्या अजून परिचयाचं झालेलं नसतं, त्याला काहीही करून फक्त आपलं खेळणं परत हवं असतं.

मुलांच्या मनात दुष्टावा नसतो

लहान मुलं मनात आकस धरून ठेवणारी नसतात आणि तुम्हाला वाटतं त्याप्रमाणे ती तुमच्या सहनशीलतेचा अंतही पाहत नसतात किंवा तुम्हाला अद्दलही घडवत नसतात. सर्वाधिक नाठाळ मुलं शेकडा ९५ टक्के वेळा चांगुलपणानं वागत असतात, तरीही ती आपली शत्रू आहेत की काय, असं वाटायला लागणं अगदी स्वाभाविक असतं.

आपण लहान मुलांना छोटीशी जरी संधी दिली तरी ती शहाण्यासारखं वागून दाखवतील, कारण त्यांची शहाणं बनायची इच्छा असते.

✯ यशाचं रहस्य

मी आता तुम्हाला एक रहस्य सांगणार आहे : मी नाठाळ लहान मुलांना मुळीच वठणीवर वगैरे आणत नाही. संगोपन म्हणजे लहान मुलांना निव्वळ वठणीवर आणणं नाही आणि मी ज्याबद्दल सांगणार आहे ते हे नक्कीच नाही. वठणीवर आणणं याचा अर्थ, लहान मुलांवर नियंत्रण ठेवणं आणि वरकरणी ते तसंच आहे असं वाटलं तरी तुमच्या मुलांच्या संदर्भातल्या समस्यांवरचा हा तोडगा नक्कीच नाही.

या शांतीपूर्ण मार्गाचा अवलंब केला म्हणजे आता कसलीही काळजी करण्याचं काहीही कारण नाही, असं मात्र होत नाही बरं का! कारण अगदी गुणी बाळसुद्धा वेळप्रसंगी आपली चुणूक दाखवतच असतं आणि अशाही वेळा येऊन ठेपतात की तुम्हाला आपण हे काय करून बसलो आहोत असंही वाटायला लागतं. मुलांना

लष्करी खाक्याच्या शिस्तीत वाढवण्यानं कदाचित ती आदर्श मुलं होतीलही, पण पुढचा विचार करता मला असं वाटतं की मुलांना प्रेमानं लहानाचं मोठं करण्यानं त्यांच्याशी आपल्या नात्याची वीण जास्त घट्ट होते, आणि नातेसंबंधाची घडी विस्कटत नाही.

माझ्या कल्पनांमुळे तुमचं आयुष्य सुखावह होईल असा मला विश्वास वाटतो.



५वी आवृत्ती

धीरुभाईझम

मूळ लेखक : **ए.जी. कृष्णमूर्ती**

अनुवाद : **सुप्रिया वकील**

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

गुजरातमधील छोट्या खेड्यापासून ते 'रिलायन्स'च्या साम्राज्या-पर्यंतचा अतिभव्य विस्तार हा विलक्षण टप्पा सर करणाऱ्या धीरुभाई अम्बानींच्या कार्यकर्तृत्वाची वेगळी ओळख करून द्यायची गरज नाही. फारसं औपचारिक शिक्षण नसलेले धीरुभाई स्वत:च एक चालतंबोलतं विद्यापीठ होते. त्यांनी स्वत:चं असं एक कार्यविषयक तत्त्वज्ञान व संस्कृती जोपासली होती. भव्य स्वप्नं, खडतर परिश्रमांची तयारी,

निश्चयाचं बळ यांच्या जोडीला त्यांनी काही साधी-सोपी तत्त्वं अनुसरली होती. अशक्य कोटीतल्या वाटणाऱ्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी याच तत्त्वांच्या साथीनं मार्गक्रमण केलं आणि त्यात नेत्रदीपक यशही मिळवलं.

त्यांची हीच तत्त्वं सर्वसामान्यांच्या जीवनातही आशा जागवतील व मार्गदर्शक ठरतील.

डेव्हिल मे केअर

२००८मध्ये इयान फ्लेमिंग यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून लेखकाने जेम्स बॉंडचे नवीन साहस जगासमोर आणले

मूळ लेखक : **सेबॅस्टिअन फॉक्स**

अनुवाद : **बाळ भागवत**

पृष्ठे **२३६** । किंमत **२४०/-रु.** । सभासदांना सवलतीत

लेखक - कवींच्या कल्पनेतून निर्माण झालेल्या काही व्यक्तिरेखा या जनमानसात लार्जर दॅन लाइफ अशा स्वरूपात स्थान मिळवतात. प्रत्यक्ष होऊन गेलेल्या वीर पुरुषांपेक्षाही त्या अधिक प्रभावी ठरतात. ००७ जेम्स बाँड ही अशीच एक अफलातून व्यक्तिरेखा. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात इंग्लंडमधील गुप्तहेर खात्यातील जेम्स बाँड या इयान फ्लेमिंग निर्मित व्यक्तिरेखेने जगभरच्या वाचकांच्या हृदयाचा कब्जा घेतला. त्याच्या थरारकथांमधून 'पुरुषां'च्या पौरुषाचा नवा आदर्श उभा केला. त्याच्यावरील चित्रपटांनी त्याच्या प्रतिमेला सर्वदूर लोकमान्यता मिळवून दिली. अवघ्या १४ कादंबऱ्या लिहून लेखक इयान फ्लेमिंग वारला. पण त्याच्या कादंबऱ्यांच्या आवृत्त्या निघत राहिल्या. चित्रपट निघत राहिले.

जेम्स बाँड या व्यक्तिरेखेचा निर्माता इयान फ्लेमिंग याच्या मृत्यूनंतर अनेक लेखकांनी ००७ च्या कांदबऱ्या लिहिल्या आहेत - त्यावरील प्रतिक्रिया संमिश्र स्वरूपाच्या आहेत. तशी अगदी पहिली कांदबरी किंग्स्ले एमिस याने लिहिण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी ठरला. त्या नंतरच्या दहा वर्षांत जॉन गार्डनर यांच्यासह इतर अनेकांनी केलेले प्रयत्न तितिकेसे यशस्वी ठरले नाहीत. इयान फ्लेमिंगच्या जन्मशताब्दीच्या वेळी 'बर्डसाँग' वगैरे गाजलेल्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या सेबॅस्टिअन फॉक्स याने गंभीरपणे जेम्स बाँडवर लिहिलेल्या. 'डेव्हिल मे केअर' या कादंबरीला अफाट प्रसिद्धी मिळाली. सर्वोत्कृष्ट पुस्तकांच्या यादीत ती अग्रक्रमाने राहण्यासाठी रॉयल नेव्हीचाही हातभार लागला. (कारण बाँड हा नेव्हल कमांडर आहे म्हणूनच!) 'कॅसिनो रोयाल' या चित्रपटाची पुनर्निर्मिती आणि डॅनिएल क्रेग याचा 'क्वान्टम ऑफ सॉलेस' हा दुसरा चित्रपट यांच्यामुळे ही बाँडच्या पुस्तकांचा खप पुन्हा दणक्यात वाढला.

सेबॅस्टिअन फॉक्स याचा जन्म १९५३ मध्ये झाला. वेलिंग्टन कॉलेज आणि इमॅन्युएल कॉलेज, केम्ब्रिज येथे शिक्षण घेतल्यानंतर त्याने पत्रकार म्हणून पेशा पत्करला. १९८४ मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी 'अ ट्रिक ऑफ लाइट' ही त्याची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'बर्डसाँग', 'ह्युमन ट्रेसेस', 'अ वीक इन डिसेंबर' अशा अनेक कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या आहेत.

१९९४ मध्ये 'फेलो ऑफ द रॉयल सोसायटी ऑफ लिटरेचर' म्हणून त्याची निवड झाली होती. दरवर्षी इंग्लंडचा राजा किंवा राणी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सर्वोच्च नागरी पुरस्कारां'ची यादी जाहीर करण्यात येते. २००२ मध्ये राणीच्या वाढदिवसानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या यादीप्रमाणे 'सी.बी.ई - कमांडर' म्हणून त्यांची नेमणूक झाली होती.

इयान फ्लेमिंग इस्टेटीच्या ट्रस्टींनी विनंती केल्यावरून इयान फ्लेमिंग यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून २८ मे २००८ रोजी 'डेव्हिल मे केअर' ही जेम्स बाँडची नवी कादंबरी प्रसिद्ध झाली.

सेबॅस्टिअन फॉक्स याने लेखक म्हणून स्वत:चे नाव टाकतानाच इयान फ्लेमिंगचे नावही स्पष्टपणे लिहून; आपण या पुस्तकाकडे किती गंभीरपणे बघतो आहे ते दाखवले आहे.

बॉंडच्या झगमगीत चित्रपटांवर अवलंबून न राहता, इयान फ्लेमिंग यांच्या पुस्तकांच्या ठराविक साच्यातच त्याने कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक गोष्टींचा बारकाईने विचार करत असताना इतर काही पुस्तकांप्रमाणे आणि त्यावरील चित्रपटांप्रमाणे ००७ ला एकविसाव्या शतकात न आणता जाणीवपूर्वक १९६० च्या काळातच ठेवण्याचा धूर्तपणाही दाखवला आहे.

सेबॅस्टिअन फॉक्सची ही निर्मिती अप्रतिम आहे. पॅरिस आणि मध्य पूर्वेतला तो काळ आणि फ्लेमिंग प्रमाणेच रंगीबेरंगी आणि तितकाच हिंस्त्र तपशील गतस्मृतींना उजाळा देणारा आहे. खलनायक ज्यूल्स गॉर्नर जरा जास्तीच दुष्ट आहे. त्याचे व्यंगही तसेच विचित्र आहे. इयान फ्लेमिंगच्या धर्तीवरच रंगवलेला खलनायक त्याची आसुरी महत्त्वाकांक्षा तशीच भव्य आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा इयान फ्लेमिंगचा जेम्स बॉंड आहे - सुपरमॅन नाही! वयपरत्वे स्वत:ची ताकद कमी होते आहे की काय याची काळजी त्याला वाटते.

जेम्स बॉंडचा या कादंबरीतील प्रतिस्पर्धी डॉ. जुल्स गॉर्नर कसा आहे?

त्याचा बॉस एम हा त्याची प्राथमिक माहिती देतो.

''डॉ. ज्यूलियस गॉर्नर हा वैद्यकीय डॉक्टर नाही. कुठल्यातरी विद्यापीठांकडून त्याला ही सन्माननीय पदवी मिळालेली आहे. त्याने ऑक्सफर्डमधून राजकारण, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र या विषयातल्या पदव्या मिळवल्या आहेत. डॉक्टरेटसाठी रसायनशास्त्र हा विषय घेतला होता. तो प्रत्येक विषयात तज्ज्ञ आहे. युद्धात तो अल्पवयातच सैन्यात भरती झाला. आधी नाझींकडून लढला. नंतर स्टालिनग्राडच्या लढाईत रशियाकडून लढला. कोण जिंकल याचा विचार करून तो स्वच्छेने बाजू बदलतो. केवळ पैशासाठी लढतो असेही म्हणता येईल. पण त्याला उद्योगधंद्याची खरी आवड आहे. हार्वर्ड बिझिनेस स्कूलमध्येही तो वर्षभर होता. त्याने इस्टोनियात वेदनाशामक (ॲनाल्जेसिक) औषधांचा कारखाना काढला. नंतर न्युरॉलॉजिकल औषधांची उत्पादने सुरू केली. पुढे पॉपीच्या म्हणजे अफूच्या औषधांकडे त्याने लक्ष वळवले. हेरॉइन, मॉर्फिन यांची निर्मिती वाढवली. सर्व काही कायदेशीर व्यवहार आहे. परंतु तो काही बेकायदेशीर व्यापारातही गुंतलेला असावा असा संशय व्यक्त होतो. इंग्लंडमध्ये सध्या चोरट्या मार्गाने मोठ्या प्रमाणावर मादक द्रव्ये येत आहेत. त्यामागे त्याचा हात असावा. पण त्यासाठी पुरावा मिळवायला हवा. तू ते काम करावेस. कारण या मादक द्रव्यांमुळे तरुण वर्ग व्यसनाधीन होत आहे. मादक द्रव्यांची चटक लागली की तरुण वर्गाची जगण्याची इच्छाच नष्ट होते.''

''हा गॉर्नर कुठे सापडेल?''

''तो देशोदेशी सतत फिरत असतो. विमाने उडवण्याचा त्याला शौक आहे. त्याची स्वत:ची दोन विमाने आहेत. तो पॅरिसमध्ये त्यातल्या त्यात जास्त काळ राहतो. त्याचा एक हात माकडासारखा आहे. मनगटापर्यंत आणि पुढे केसाळ. हा जन्मजात दोष आहे. त्यामुळे त्याला हातात काही पकडता येत नाही... जेम्स हा गॉर्नर आजपर्यंत आपल्याला भेटलेल्या माणसांमध्ये सर्वाधिक खतरनाक माणूस ठरेल. नुसता मादक द्रव्यांचा व्यापार करणारा हा इसम नाही. कोट्यवधी पाश्चिमात्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त करून पश्चिमी राष्ट्रांचे खच्चीकरण करण्याचा त्याचा कुटिल डाव आहे. म्हणून मी तुझ्यासारखा मोहरा त्याच्या मागावर पाठवत आहे. सहा दिवसात मला तुझा रिपोर्ट हवाय. पॅरिसला जाऊन मॅथिसला भेट. मनीपेनीने तुझी तिकिटे काढून ठेवली आहेत. लक्षात ठेव, हा माणूस फार खतरनाक आहे.''

आणि जेम्स बॉंडला या विधानाची प्रचीती विमानतळाकडे जातानाच येते.

एक मोटारसायकल आपला पाठलाग करीत आहे हे त्याला दिसते. थोड्या वेळात दुसरीही दणदणीत मोटार सायकल बाजूला येते. दोन्ही बाजूंना एम बी डब्ल्यूच्या बलदंड मोटर सायकली. कधी गोळ्या सुटतील नेम नाही. जेम्स बॉंड पुढच्या पॅसेजरच्या बाजूच्या खिडकीची काच एका गोळीने उडवतो. वळण येताच दुसऱ्या मोटरसायकलस्वारालाही तो टिपतो...

पॅरिसला पोचतो. रिझर्व्ह केलेल्या हॉटेलमध्ये जातो.

हॉटेलमधल्या रूममध्ये शिरतो तर एक सौंदर्याची पुतळी आर्मचेअरमध्ये बसलेली. वक्षस्थळावर हात ठेवून आत्मविश्वासाने ती म्हणाली,

''तुम्हाला आश्चर्याचा धक्का देतेय याबद्दल दिलगीर आहे मिस्टर बॉंड. पण तुम्हाला भेटणे आवश्यकच होते.''

ती आपले कार्ड त्याला देते. मिस स्कार्लेट पापावा. इन्व्हेस्टमेंट मॅनेजर, डायमंड अँड स्टँडर्ड बँक.

''माझ्या बहिणीची सुटका करण्यासाठी मला तुझ्या मदतीची गरज आहे. एका दुष्ट माणसाने तिला तिच्या इच्छेविरुद्ध डांबून ठेवले आहे... तू गॉर्नरची चौकशी करायला आला आहेस हे मला माहीत आहे. माझ्या बहिणीनेच मला ते सांगितले. म्हणून मी येण्याचे धाडस केले... ती म्हणाली, गॉर्नरपासून बॉंडला धोका आहे. त्याच्यापासून दूरच राहा असे बॉंडला सांग...''

आणि जेम्स बॉंड डॉ. गॉर्नरच्या शोधासाठी मानसिकदृष्ट्या सिद्ध होतो.

...'डेव्हिल मे केअर' मधील प्रत्येक प्रकरण नवे काहीतरी थरारक घेऊन पेश होते. वाचकांना थक्क करते... मूळातूनच वाचणे इष्ट.

◈

व्यक्तिविशेष

चैतन्यदायी व्यक्तिमत्त्व सुधा मूर्ती

'राष्ट्रीय चारित्र्य पुरस्कारा'साठी प्रसिद्ध साहित्यिक व सामाजिक कार्यकर्त्या सुधा मूर्ती यांची झालेली निवड अत्यंत उचित अशीच आहे. शिक्षण, विज्ञानप्रसार, साक्षरता प्रसार, आरोग्य अशा विविध क्षेत्रांत झोकून देऊन सातत्याने कृतिशील राहिलेल्या सुधाताई हे विलक्षण चैतन्याने भारलेले व्यक्तिमत्त्व आहे. मराठी-कन्नड-इंग्लिश भाषांतील अनेक अप्रतिम पुस्तकांच्या वाचकप्रिय लेखक म्हणून त्या प्रसिद्ध आहेतच; पण त्याहून अधिक मोलाचे त्यांचे सामाजिक कार्य आहे. सुधा मूर्तींनी सामाजिक कार्याचा जो टोलेजंग डोंगर उभा केला आहेत तो पाहिल्यावर 'साहित्यिक सामाजिक कार्यात उतरत नाहीत.' असे बोलण्याची हिंमत कुणाला होणार नाही.

कर्नाटकात त्यांच्या पुढाकाराने ग्रामीण भागांतील शाळांमध्ये तब्बल १०१५० ग्रंथालयांची निर्मिती झाली आहे. सर्व शाळांमध्ये कॉम्प्युटर उपलब्ध करण्याचे त्यांचे कार्य इतिहासाने नोंद घ्यावे असेच आहे. अनेक अनाथालयांची उभारणी त्यांनी केली आहे. जलसंधारण योजना, माध्यान्ह भोजन योजना, हजारो स्वच्छतागृहांची उभारणी, महिलांसाठी वसतिगृहे, पूरग्रस्तांसाठी घरांचे बांधकाम, शाळा इमारतींचे बांधकाम, सैनिकांच्या कुटुंबियांना आर्थिक आधार, झोपडपट्टी, रस्त्यावर राहणाऱ्या मुलांसाठी आरोग्य सुविधा, अशी असंख्य समाजोपयोगी कामे त्यांनी कमालीचे कष्ट घेऊन साध्य करून दाखविली आहेत. मुख्य म्हणजे हे सारे करताना 'माझ्यामुळे ते झाले, मी केले' असा सुधाताईंचा आविर्भाव कधीच नसतो. समाजातील सर्व थरांतील नागरिकांना जोडून घेऊन त्यांच्या माध्यमातून विविध कामे लीलया मार्गी लावणे, ही त्यांची खासियत आहे.

'इन्फोसिस फाउंडेशन'च्या प्रमुख आणि 'गेट्स फाउंडेशन'च्या सार्वजनिक

आरोग्यविषयक उपक्रमाच्या सदस्य या पदांवरून त्यांनी केलेले कार्य स्तिमित करणारे आहे. खरे तर, 'इन्फोसिस' या आज जगविख्यात असलेल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीची उभारणी सुधाताईंनी एक गृहिणी या नात्याने केलेल्या सुमारे दहा हजार रुपयांच्या बचतीतून झालेली आहे. नारायण मूर्ती हे आवर्जून या बाबीचा उल्लेखही करतात.

सामाजिक कार्य करताना सुधाताईंनी प्रपंचही नेटका केला आहे. त्यांची जीवनशैली कमालीची साधी आहे. मध्यंतरी त्या कोल्हापुरात आल्या, तेव्हा आमच्या एका सहकाऱ्याबरोबर महालक्ष्मीच्या दर्शनाला गेल्या होत्या. येताना त्यांनी देवळाबाहेर बसलेल्या बाईकडून आठ आण्याचे आवळे आणले! मी विचारले, ''हे काय! एवढीच खरेदी?'' त्या हसून उद्‌गारल्या, ''मी शॉपिंग करतच नाही!' काही वर्षांपूर्वी हरिद्वारला गंगास्नानासाठी गेल्या होत्या. प्रिय वस्तूचा त्याग करावा, असा संकेत तेथे असतो. सुधाताईंनी त्या क्षणी शॉपिंग बंद केले ते कायमचेच. साधी पांढऱ्या रंगाची साडी त्या परिधान करतात. रंगीत कपड्यांची त्यांना आवडच नाही.

परस्परविश्वासाच्या भक्कम पायावर लेखक-प्रकाशक म्हणून आमचे संबंध सुरू झाले आणि आज ते अतिशय घनिष्ठ झाले आहेत. 'आपला स्नेह टिकायचा असेल तर आमच्या कंपनीचे शेअर्स कधी मागू नका आणि कुणाला नोकरी देण्यासाठी गळ घालू नका.' असे पहिल्या भेटीत सुधाताई अनौपचारिकपणे म्हणाल्या होत्या. मला या दोन्ही बाबींत कधीच स्वारस्य नव्हते! सुधाताईंसारख्या सुसंस्कृत-सामाजिक व्यक्तिमत्त्वाशी जोडले जाणे किती आनंदाचे असते, याचा अनुभव आम्ही घेत आहोत!

– अनिल मेहता

◈

५ वी आवृत्ती

काचवेल

आनंद यादव

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

'झोंबी', 'नांगरणी' आणि 'घरभिंती' या आत्मचरित्राच्या तीन खंडांनंतरचा हा चौथा खंड 'काचवेल'.

नव्या घरातील सोप्याच्या भुईवर ग्रामीण भागात काचवेल काढण्याची लोकप्रथा आहे. काकणांच्या काचतुकड्यांनी ही वेल रेखली जाते. ही वेल वंशवेलीचंही प्रतीक असते.

त्या घराची गृहिणी नकळत स्वतःला वंशवेल मानते. तिची मुलं ही त्या वेलीवरच्या कळ्या, फुलं असतात. जेवढी मुलं, तेवढे तागोरे ती काढते... आईची ही दैवी लोककला मी पहिल्यांदा बघत होतो.

यथाकाळ माझी सगळी भावंडं त्या वेलीवर रांगली. मी सोप्यात बसून अभ्यास केला; त्या अभ्यासालाही काचवेलीचा कशिदा मिळाला. पंधरा-सोळा वर्षे ही वेल तिथं पायघडीसारखी पहुडली.

तेव्हापासून मी साठ वर्षांच्या आयुष्यात खूप काचा तुकड्या-तुकड्यांनी गोळा केल्या. मला आकर्षक वाटणारे रंगीत तुकडे जपून ठेवले. जागोजागी भेटलेल्या कसबी कासारांनी मला ते प्रेमाने देऊ केले. त्या तुकड्यांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाची वेल सिद्ध झाली.

अंतिमत: ही काचवेल आणि तिची भूमी ही मराठी समाजाचं आणि संस्कृतीचं प्रतीकही आहे, असं जाणवलं. मी फक्त भारवाही.

About the Book

THE Gift

The New Science of Manifestation

'The Gift' is a compilation of most of the self help methods and theories right from Self Suggestion, Laws of Attraction and Emotional Freedom Techniques to even the importance of eating right and proper investments. To a first time reader of self help books, it gives an introduction to all the methods of self help.

This book is a complete treatise on everything you ever wanted to know about the truth. The truth about the law of attraction and beyond. If you have ever read and marvelled at the law of attraction, but never really been able to use it to your best interests, then this book will show you the way like nothing else has ever done before! PERIOD!

Amit Desai follows in the footsteps of confidence builders like Brian Tracy and many others, offering free online goodies like the LOA DVD script. At a very young age, he has many and varied accomplishments under his belt like an award for professional photography along with being an internet marketing expert, a life coach on the Laws of Attraction and a Prosperity Catalyst. With so much going for him, it would have been interesting to read how he overcame his own problems and achieved all that he has today.



Excerpt

In The Hands OF TALIBAN

The revealing account of a kidnapped journalist

Whenever the commander would speak to him I could see the fear in his eyes growing. Ghazi starts speaking at length in Pashto, the most commonly spoken language in Afghanistan besides Dari. Most Afghan Taliban are Pashtuns and thus speak Pashto. I do not understand a word. I only need to look into Zaheer's eyes to see a terrified boy of twenty-five who knows he is about to die.' The commander says that Sher Mohammed is a filthy traitor', Zaheer translates. 'He screwed them over the last time and now he has to pay the price. Because Mohammed is unreliable, we are also unreliable by association. They will kill us Joanie. They will behead us.' His gaze is like that of a whipped dog. Broken. Spent.

But suddenly he stands up, his tan skin turned pallid. His voice sounds shrill as he objects that we are not spies. It makes no sense after all, why would the French first drop those bombs only to send us to Ghazi afterwards? The commander angrily approaches and hits him in the face. 'Traitors, that is what you are' he hisses from behind his mask.

I think he is just making it up. It is all too easy to just randomly accuse people of espionage. That way you can afford to kill anyone you want without any complications. But it does not matter, if Ghazi feels this to be a valid reason for execution, then it must be so. He is a terrifying man; he has a hugely threatening, chilling quality about him. His voice remains soft but all can hear him. I avert my gaze, I do not want to look at him as I fear it would provoke him. Stay calm. He walks by towards Sher Mohammed who is standing to one side behind me with his son. They again begin arguing heatedly. Zaheer listens tensely, his long black hair still in a mess from being smacked in the head. In front of me three

Taliban fighters are gawking at me continuously. One of them, a skinny man with the same half-long hair as the commander, has only one hand. The other was shot off as he told me before. He is staring, his mouth slightly agape, as if he had never seen a westerner before, let alone a blonde woman; which is probably the case. To his side is the toughest-looking one in the bunch, a burly fellow with a fine-looking, rugged face. He had been lugging around the French paratroopers' machine gun all afternoon while his mischievous, somewhat mocking gaze followed me everywhere. He is always smiling. He put on my sunglasses, the ones with the ridiculous fake rhinestones I had to buy in a hurry when these were all they had. These talibs considers sunglasses to be mundane objects, but when they do happen to come across a pair it is always good fun to show them off. They fail to see that they are obviously women's glasses. He passes the shades to his mates and aims the French machine gun at me, the green laser shining right between my eyes. The one-handed man nudges him indignantly and says something along the lines of: 'Stop it, it's inappropriate.' He points the gun at me teasingly. I look straight into the green light and then to the face above it, right into his dark eyes underneath those heavy eyebrows. It is not a pleasant experience, but nor am I afraid as both he and the one-handed man seem too relaxed. They are not about to shoot me where I stand, I can tell by their body language, and I can feel it. My Dutch level-headedness along with my intuition have not failed me so far. So why would things be different now.

Intuition would prove to be a key word in the following days. As would level-headedness. To use your common sense and stay calm. Apparently I can pull that off. Go figure. I did know that I was never one to panic for no reason, but in an actual life-threatening situation such as this one never knows how one would react. This is not me acting all tough afterwards, I am indeed relatively calm. That prickling sensation in my fingers disappeared after a few seconds. It is an odd feeling, I am afraid but at the same time I feel defiant. I keep looking straight at the man with the machine gun. God damn it, I am not about to be intimidated like that. He grins, but I cannot get myself to grin back. To his side is the third fighter. He seems like the nicest one out of the three. He has an innocent, even a somewhat foolish-looking face. The other two have downright thuggish mugs. The rest of the group is spread out behind and on the rocks. Zaheer is still nervously listening to the fast-talking commander. He is now literally shaking with fear. His entire body is quaking, and he is looking terribly distraught.

'They are going to kill us', he says again. 'It is over'.

His desperation has a strange effect on me. I cannot stand it, it angers me. Come on, man!

At the same time I realize that he has every reason to be so frightened. The Taliban do not take kindly to interpreters.

They are almost always beheaded on the spot. No questions asked. Shit. Deep shit. I also realize that I do not have it as bad as he since I cannot understand what is being said. And I know that Zaheer would rather not tell me everything because it is likely all too gruesome. He only half listens when I ask him to translate as the argument between him, the commander and Sher Mohammed grows more and more intense. The thought that he is unwilling to tell the truth is so frightening that I refuse to think about it. I never was any good at coping with foregone conclusions. I like all my options to remain open. Including now. I do not want to die in this place, by their hands, to be the umpteenth westerner to be taken captive never to return again. To them a single life matters little. My head will roll in the fine dust. They will rest one foot on it in a triumphant pose. My blonde head will be their trophy. Another infidel, a *kafir* to join the others in hell. No, damn it. Not now, not here. Never.

'Remain calm, Zaheer' I can hear myself saying. 'We do not have to die. We can negotiate. I am a western journalist, I am worth a lot of money in their eyes. Tell them that, we could make an arrangement. We could ask my employer if he would pay up.'

Zaheer is looking desperate.

'Would they be willing to pay for me as well?' he asks.

'Surely not. I am but a poor Afghan. No-one is willing to pay for me.'

'They will pay for the both of us. We are in this together, and we are going to get out of this together. Tell them that there is no need to kill us. We can reach an agreement.'

I do not know whether this was Ghazi's intention, but something tells me it was. Still things did not quite fit. If he had planned to kidnap us all along, then why is he wearing a mask? It would have made sense if we had done the interview and returned home at the end of the day. Not if he was going to take us hostage. Or does he wear it all the time? The French journalists who had come here before me had taken pictures. One of those pictures showed a certain commander Farouki. This was an alias, but in this particular picture he was not wearing any mask. Is this the same commander? In any case, it would appear Ghazi did not want to be recognized today.

Incidentally, I would only learn much later on that he went by the name of Ghazi. Ghazi is a name given to Muslims after they have killed an infidel. Kind of like an honorary title. Ghazi Gul, this is the name by which he is known in the Surobi region. Gul is a common addition to Afghan names, and literally means 'flower'. Zaheer calls Ghazi *qumandansa*, a bastardization of *qumandan*, commander in Pashto, and the more polite term of address *qumandan sahib*. Zaheer does not pronounce the 'hib'.

He presents my suggestion to the qumandansa. He is clearly interested. There is a great deal of discussion back and forth. Ghazi is gesturing wildly. I can see his rather small hands shooting up in the air. Then he places them on Zaheer's hands. The gesture may seem benign but it is not. Ghazi is like a predator toying with his prey right before the final pounce; a false indulgence with an undercurrent of profound cruelty.

'You have nothing to worry about', he says, almost sweetly. I can see his hands grasp Zaheer's arms and pat him on the shoulder. Zaheer goes rigid, I feel shivers running down my spine. This subtle demonstration of the balance of things makes me nauseous with fear. It is much more threateningthan the slap Zaheer received across his face ever was.

'If they pay for us everything will be fine', Zaheer announces with a hoarse voice. 'But if they do not pay ...' Ghazi still has his hands on Zaheer's shoulders. Remarkably smooth, pale hands. A killer's hands, the only thing that springs to mind.

Backlist



Tamil Tigress



Betrayed



Never to Return

Fifty Years of Silence



The Myth Called Wealth

– Rajesh Bhaskar Wattamwar

Category - Non Fiction
Type - Paperback
Pages - 120
Price - Rs. 150.00

Praise

"I have read your book and such type of book is a necessity nowadays as well as it is a contribution for literature. True richness is peace of mind. The author has proved that wealth is simply an illusion. Nobody will be totally fulfilled with all types of wealth. I hope that this book will be helpful and useful for mankind, who are continuously and desperately running after money. Not only that, but such greedy persons after getting lots of money are not even able to give the money a good use. I wish and bless that in the future the author may write more books likewise."
- Ananta Shri Vibhushita Jagad Guru Ramanujacarya Swami Purushottam Maharaj. Srirangam Mahapeeth, Tamilnadu
I highly recommend this book. It helps to kick us out of our mental ruts, to lift our sights and to put us on path for the right kind of thinking.
- Dr. Satish Panchadar. **Nuclear Medicine Specialist. London, UK**.

An innovative and revolutionary concept about money. A new thought-provoking book.
- Shri. P.M. Raorane. Principal.

आगामी

मुक्त विहंग
चीनच्या तीन कन्या

मूळ लेखिका : **युंग चँग**

अनुवाद : **डॉ. विजया बापट**

ही कहाणी आहे हिंसाचार, अमानुष छळ, अनन्वित अत्याचार आणि जुलमी व्यवस्था यांच्या काळ्याकुट्ट गर्तेमध्ये सौंदर्याची आस धरणाऱ्या, नवनिर्मितीचा आणि आधुनिकतेचा ध्यास घेणाऱ्या स्त्रियांची, त्यांच्या आयुष्यांची.

या कहाणीला पार्श्वभूमी आहे चीनमधल्या राजकीय, सामाजिक स्थित्यंतरांची, बदलांची. यात क्रांतीमुळे चिनी जनतेच्या आयुष्यावर झालेले परिणाम आहेत; श्रीमंत-गरीब लोकांचं जीवन आहे; समाजजीवनातल्या कथा, मिथकं, चालीरीती यांचे संदर्भ आहेत; आदर्शवादाने भारलेले आणि तो आदर्शवाद फोल ठरल्यानंतर कोसळून गेलेले स्त्री-पुरुषही आहेत.

ही कहाणी चीनच्या इतिहासातील एक व्यापक कालखंड तपशीलवारपणे डोळ्यांसमोर उभा करून आपल्याला अंतर्मुख करते.

❁ ज्योत्स्ना देवधर

मराठीसह हिंदीमध्येही विपुल साहित्य लेखन करणाऱ्या, आकाशवाणीच्या ज्येष्ठ निर्मात्या ज्योत्स्ना देवधर यांचे १७ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८६ वर्षांच्या होत्या. मूळच्या राजस्थानमधील जोधपूरच्या असलेल्या देवधर यांनी पुणे विद्यापीठातून हिंदी भाषेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली होती. मराठीसह हिंदीमध्येही कथा, कादंबरी आणि नाटक असे साहित्य प्रकार त्यांनी हाताळले.

सुरुवातीच्या काळात १९६०च्या सुमारास आकाशवाणीवर निर्मात्या म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर, २४ वर्षे त्यांनी विविध जबाबदाऱ्या हताळल्या वरिष्ट निर्मात्या म्हणून त्या निवृत्त झाल्या.

कथासंग्रह, कादंबरी, ललितलेखन, नाटके असे विविधांगी लेखन त्यांनी केले. 'घरगंगेच्या काठी' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कल्याणी, चिमणीचं घर मेणाचं, रमाबाई, आक्रीत या कादंबऱ्या, तर गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या, सात घरांच्या सीमारेषा, मधली भिंत, समास, विंझवणारा, पैलतीर हे त्यांचे कथासंग्रह विशेष गाजले. कल्याणी या पुस्तकाला त्यांनी नाटक स्वरूपात; तसेच दूरचित्रवाणी मालिका स्वरूपातही केले.

घरगंगेच्या काठीसाठी राज्य सरकारचा पुरस्कार, अंतरा या हिंदी कथासंग्रहाला केंद्र सरकारचा पुरस्कार, कोलकत्यातील भारतीय भाषा परिषद, बिहार राष्टभाषा परिषद, उत्तर प्रदेश संगीत नाटक अकादमी राज्य हिंदी साहित्य अकादमी अशा

संस्थांकडून त्यांना सन्मान त्यांना प्राप्त झाले होते. १९९४ मध्ये भोपाळ येथे झालेल्या अखिल भारतीय भाषा साहित्य संमेलनात त्यांना 'भाषाभूषण' ही मानद पदवी बहाल करण्यात आली होती. त्यांच्या अनेक कथांचे अनुवाद तेलगू, तमिळ, मल्याळम, असामी आणि इंग्रजी भाषेत झाले होते.

❁ डॉ. शरच्चंद्र गोखले



डॉ. शरच्चंद्र गोखले भारतातील एक अग्रगण्य समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले यांचे दिनांक २४ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. समाजातील उपेक्षितांच्या उद्धाराकरिता विशिष्ट ध्येयाने आणि समर्पित वृत्तीने आयुष्य खर्ची घालणाऱ्या मोजक्या व्यक्तींमध्ये डॉ. शरच्चंद्र गोखले यांचा समावेश होता. त्यांच्या निधनामुळे कुष्ठरोगी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांकरिता काम करणारा; तसेच गरजू आणि दाते यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा निखळला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमधून मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी घेतल्यानंतर सरकारी सेवेच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्याला प्रारंभ केला. समाजकल्याण खात्यातील वरिष्ठ पद सोडून त्यांनी पूर्णवेळ समाजोपयोगी कामाला वाहून घेतले. त्यातूनच कास्प, आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र, यासारख्या संस्थांची निर्मिती झाली.

सुरुवातीच्या काळात बालकल्याण, त्यानंतर कुष्ठरोगी व ज्येष्ठ नागरिक अशा क्षेत्रात त्यांनी काम केले. परंतु याशिवाय मानद प्राध्यापक, सल्लागार, संपादक अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही त्यांनी सांभाळल्या. विविध संस्थासंघटनांच्या माध्यमातून देशभर आणि त्यानंतर जगभर प्रवास करताना आलेले अनुभव सर्वदूर पोचविण्याकरिता त्यांनी लेखनाचीही कास धरली. जगभरात फिरताना आलेले अनुभव आणि विविध व्यक्ती संस्थांशी झालेला परिचय याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून उमटले. जगभरातील तज्ज्ञ, अभ्यासकांनी डॉ.गोखले यांचा सल्लाच घेतला नाही, तर त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले. त्यामुळेच त्यांची ओळख ग्लोबल झाली. वंचितांच्या उन्नतीकरिता आणि हिताकरिता झटणारे डॉ. गोखले समाजाची नाडी अचूक ओळखणारे समाजशास्त्रज्ञ होते.

❁ विद्या एजन्सीज्‌चे जयवंत प्रभू



पुण्यातील विद्या एजन्सीज या पुस्तकविक्री-केंद्राचे संस्थापक जयवंत केशव प्रभू यांचे २१ डिसेंबर २०१२ रोजी निधन झाले. प्रभू हे मूळचे गोमंतकातले. १९६४ मध्ये ते पुण्यात आले. आपले चुलते अच्युत प्रभू यांच्या विदर्भ मराठवाडा बुक कंपनीत त्यांनी प्रारंभी काम केले. १९७१ मध्ये विद्या एजन्सीज् या नावाने स्वत:चे ग्रंथवितरण सुरू केले. शाळा-महाविद्यालयांना मोठ्या प्रमाणावर पुस्तके पुरवू लागले. अल्पावधीतच नव्या पेठेत स्वत:ची वास्तू उभी केली. चोख व्यवहारामुळे प्रकाशकांशी गोत्र जुळवले. त्यामुळे ग्राहकांना उत्तम सेवा देऊन त्यांनी आपला जम बसवला. मितभाषी असूनही सर्वांचा लोभ संपादन केला. त्यांच्या निधनाने एक विश्वासू ग्रंथविक्रेता गेल्याची हळहळ वाटत राहील.

❁ कवी हरिनारायण व्यास

हिंदी कवी हरिनारायण व्यास (वय ९०) यांचे १४ जानेवारी रोजी पुण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली आणि नातू असा परिवार आहे. पुणे, लखनौ, गुवाहाटी येथील आकाशवाणी केंद्रांत त्यांनी नोकरी केली. सध्या ते मुकुंदनगर येथे वास्तव्यास होते.

'मृग और तृष्णा', 'त्रिकोण पर सूर्योदय', 'बरगद के चिकने पत्ते', 'आउटर पर रूकी ट्रेन', 'निद्रा के अनंत में जागते हुए' हे त्यांचे सात कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीने 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार' आणि मध्य प्रदेश सरकारने 'शिखर सम्मान पुरस्कार' देऊन त्यांना गौरविले होते.

◈

बालनगरी

कावळ्यांचा राजा

तो कावळा त्या दिवशी सकाळपासून उंच उंच उडत राहिला. लांबवर जाऊन आला. आधी खाली समुद्र होता. निळेभोर पाणीच पाणी. मग दूरवर पसरलेलं जंगल लागलं. हिरवंगार, मग मोठं वाळवंट लागलं. रेताड आणि भकास.

संध्याकाळी परतून आपल्या घरट्याकडं आल्यावर खरं तर तो दमला होता. परंतु एवढा मोठा पल्ला मारून आल्याबद्दल त्याला खूप अभिमान वाटत होता.

''मी तुम्हा सर्व कावळ्यांपेक्षा अधिक बलवान आहे. माझी ताकद अफाट आहे. मी तुमचा राजाच आहे.'' तो झाडावरच्या इतर कावळ्यांकडे बघत जोरदार आवाजात म्हणाला.

कोणीच त्याला विरोध केला नाही.

त्यामुळे कावळ्याला आणखीनच जोर आला.

''कावळ्यांचाच राजा बनून मला समाधान वाटत नाही. मी सर्व पशुपक्ष्यांचा राजा आहे, असं सर्वांना बजावून सांगतो. माझ्या राजेपणाची मी घोषणा करतो. आजपासून या सर्व प्रदेशावर माझं राज्य चालणार.''

कावळ्यांपैकी कोणीच त्याला विरोध करणार नव्हतं. करील हा कावकाव आणि बसेल गप्प, असं काही म्हाताऱ्या कावळ्यांनी मनात म्हटलं. ''तरुण कावळे मनात म्हणाले, ''हा असाच बढाया मारणार. याला विचारतंय कोण? वाघ-सिंह याला थोडंच आपला राजा मानणार? करू दे बडबड. याच्या नादी लागून काय फायदा?''

''पशुपक्ष्यांचा राजा म्हणून मी पहिलाच फतवा काढतो. यापुढं



कोणाही पक्ष्यानं आकाशात उडायचं नाही. जमिनीवर चालायचं नाही किंवा झाडा-झुडपांवर घरटं बांधायचं नाही.'' तो कावळा दवंडी दिल्यासारखा कावकाव करीत म्हणाला.

आता कावळ्यानं हे फर्मान काढलं तर खरं; पण पक्षी आकाशात उडतच राहिले. विसावा घेण्यासाठी वा भक्ष्य शोधण्यासाठी जमिनीवरही भटकत राहिले आणि त्यांची घरटी झाडांवर तशीच राहिली. आपण एवढं फर्मान काढलं; पण एकही पक्षी आपला हुकूम मानत नाही, हे बघून कावळ्यांच्या त्या राजाला मोठाच धक्का बसला. आपण एवढे पक्ष्यांचे राजे, आपला हुकूम पक्ष्यांनी पाळला नाही. तर आपलं हसं होणार, हे असं होता कामा नये.

तेव्हा कावळ्यानं दुसरा फतवा जारी केला. ''पक्ष्यांच्या अर्जविनंत्यांचा विचार करून मी मूळ आदेशात काही सवलती जाहीर करत आहे. अजून काही काळपर्यंत पक्ष्यांना आकाशात उडण्यास, जमिनीवर चालण्यास आणि झाडांवर घरटी बांधण्यास खास मेहेरबानी म्हणून मी परवानगी देत आहे. सर्वांच्या भावभावनांची कदर करणारा मी दयाळू राजा आहे.''

परंतु या दुसऱ्या फतव्याची कोणाही पक्ष्याने दखल घेतली नाही

किंवा कावळ्याचे आभारही मानले नाहीत. ते आपलं नित्याप्रमाणे आभाळातून भराऱ्या मारत राहिले; जमिनीवरचे किडे-कीटक टिपत राहिले आणि झाडांवरच्या घरट्यात विसावत राहिले. कावळ्यांच्या त्या राजाला वाटलं, ''आपण एवढे उदार राजे; परंतु हे कावळे आपल्याला काहीच किंमत देत नाहीत. आपले गुणगान करीत नाहीत. उलट आपली उपेक्षाच करतात. हे काही खरं नाही. आपलं राजेपण सर्वांनी मान्य करायला हवं.''

तेव्हा त्यानं तिसरा फतवा काढला. ''कावळ्यांचा दयाळू राजा म्हणून मी आदेश देतो की, कावळ्यांना आकाशात उडण्यास, जमिनीवर चालण्यास आणि झाडांवर घरटी बांधण्यास उदार मनानं मी परवानगी देत आहे.''

त्या कावळ्याचं ते फर्मान ऐकून इतर कावळे मनातल्या मनात हसत राहिले.

''मोठमोठे हुकूमशहाही अव्यावहारिक असे कडक कायदे जाहीर करतात आणि आपण उदार आहोत म्हणत त्या कायद्यात सवलती जाहीर करतात. लोकांचं स्वातंत्र्य हिरावून घेतानाही ते स्वत:च्या उदारपणाची महती गात असतात. त्यांच्या डोक्यात गोंधळ असतो; स्वत:च्या मोठेपणाच्या भ्रामक कल्पना असतात आणि आपल्या प्रजेला छळण्यासाठी निरनिराळ्या कल्पना ते राबवत असतात. प्रजा हे कायदे फारसे मानत नाही. त्यामुळे हुकूमशहा सवलती दिल्याचं जाहीर करत राहतात. अधूनमधून कोणाला तरी दहशत धाकदपटशा दाखवत राहतात; परंतु शेवटी जनता जशी वागते, तशीच राज्यपद्धत त्यांना स्वीकारावी लागते. तात्पुरती त्यांची दडपशाही लोक चालवून घेतात; पण माणसाच्या मूळ प्रवृत्तीमध्ये कुठलाही बदल घडवून आणण्यास हे हुकूमशहा असमर्थ असतात.'' एका बुजुर्ग कावळ्याने या घटनेवर आपले मत मांडले. तो कावकाव दैनिकाचा संपादक होता.

– शंकर सारडा

९८२३२६१०२३

ओळखा पाहू

यंदाचा लाभसेटवार पुरस्कार मिळालेले कवी

.....

विजेत्यास २००/-रु. किंमतीचे पुस्तक भेट म्हणून पाठवण्यात येईल.

आपली उत्तरे दिनांक १५ मार्च २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.

निकाल एप्रिल २०१३ च्या अंकात जाहीर होईल.

'डिसेंबर' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

दूरदर्शनवर विनोदी किस्से सादर करून अफाट लोकप्रियता मिळवलेला मिस्किल विनोदकार : **जसपाल भट्टी**

स्पर्धेचे विजेते - सौ. सुमेधा पोळ

११२६, मैत्र, समाधान हॉस्पिटल जवळ, राईट टाऊन. जबलपूर- ४८२००२

दादा पालवे- मनमाड, चंद्रकांत खरे- मुंबई, भीमराव गुंड - सोलापूर, हेमा नरगुंदे, रमेश थेटे, प्रभा बावडेकर- पुणे, सुरेश कात्नेश्वरकर- नांदेड, गजानन शेळके - अमरावती, बा. रा. पालेकर- कराड, अपर्णा नंन्दापुरे- लोणी, वसंत गायधनी, दिगंबर गाडगीळ - नाशिक, सुरेखा हावळ - मुरगूड, आदिती कुलकर्णी - बेळगाव, योगेश नार्वेकर- रत्नागिरी

- उत्तरे पाठविण्याचा पत्ता -

मेहता पब्लिशिंग हाऊस, मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.